

# काँग्रेस पक्षातील अतिशहाणा तयाचा--?


रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २६ नोव्हेंबर २०२३


पाच राज्याच्या विधानसभा निवडणूक काँग्रेसच्या प्रचाराची भीस्त गांधी परिवारावर आहे. कारण त्यांचे आडनाव गांधी, तेही बनावटी! गांधी नेतृत्वामुळे पक्ष बुडत चालला, तरी इतर नेत्यांना चिंता नाही. या गांधी परिवाराला पक्ष व पक्षाला परिवाराशिवाय पर्या नाही. गांधी आडनाव लावून हा परिवार देशाला मूर्ख बनवतोय! हा परिवार ना! महात्मा गांधींचे वंशज आहेत! ना ! त्यांचे नातेसंबंध ! या आधुनिक गांधी परिवारातील नेत्यांना भारताचा इतिहास, संस्कृती, हिंदू धर्माचे ज्ञान नाही. त्यांना लिहून दिलेले टिप्पण म्हणून भाषण म्हणून करतात. दगडला शेंदूर लावला की त्याला देव म्हणून पूजा केले जाते! खर तर! प्राणप्रतिष्ठाशिवाय दगडात देवपण येत नाही. त्याप्रमाणे राजकारणात विविध क्षेत्रातील ज्ञान, अभ्यासू व्यक्तीला नेता म्हटले जाते. काँग्रेस नेते गांधी परिवाराला देव मानून पूजा करतात. याच काँग्रेस पक्षाने परराष्ट्रात जन्मलेल्या महिलेला भारताचे पंतप्रधान करण्याचा मनसुबा रचला होता! पण शरद पवारांनी विरोध केल्यामुळे तो धुळीला मिळाला. पवारांमुळे देश वाचला! असेच म्हणावे लागेल. गांधी परिवाराने काँग्रेस पक्षाचे माजी पंतप्रधान मनमोहनसिंघ यांचा कधी सन्मान केला नाही. त्यांच्या संवैधानिक पंतप्रधानपद व संस्था संस्थाचे सन्मान करणे चुकीचे आहे. गांधी परिवाराचे कर्तृत्व काय तर ! यांचे आडनावात गांधी आहे. प्रियंका वाड्रा या श्रीमती इंदिरा गांधी यांचे सारख्या दिसतात! म्हणे! मराठवाड्यातील काँग्रेस नेत्यांने राज्याचे नेतृत्व केले, त्यांना म्हणे! वाड्रासोबत प्रचाराला जाण्याचे भाग्य लाभले! याचे व भूषण म्हणून वृत्त दिले गेले!




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


देशातील चापुलशी पत्रकार प्रियंका वाड्रांना व गांधी या आडनावाने मोठेपण देत असतात. देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात काँग्रेस पक्षाचा एकही नेता फासावर अथवा जेलमध्ये गेलेला नाही. तर श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधीची यांची धोरणामुळे हत्या झाली. काँग्रेस नेते त्यांनी देशासाठी 'बलिदान' दिले, असे म्हणतात! मग स्वातंत्र्यासाठी जे फासावर गेले! जेलमध्ये गेले! ज्या कुटुंबांनी प्रचंड यातना भोगल्या. त्यांचे बलिदान व योगदान व्यर्थ मानायचे काय? उलट गांधी परिवाराने राजकारणात येवून करोडाची माया जमविली आहे. यांचा राजकारणशिवाय दुसरा व्यवसाय नाही. काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी २०१४ मध्ये प्रथम मोदींना 'मौत सौदागार' म्हटले. त्यानंतर या पक्षात मोदी यांना शिव्यांची स्पर्धा सुरु झाली आहे. विशेषतः गांधी परिवार मोदी व्देषातून लक्ष्य करतो आहे! याचे कारण मोदीमुळे काँग्रेसची सत्ता गेली व राहुलचे पंतप्रधानांचे स्वप्न भंगले. तसेच भ्रष्टाचारावरुन त्यांचेवर कारवाई केली गेली. हा राग आहे. काँग्रेसच्या नेत्यांनी नीच ते कबर खोदण्यापर्यंत शब्दांचा प्रयोग केला. काँग्रेसप्रमाणे भाजपा व इतर पक्षात सुध्दा वाचाळवीर आहेत. पण काँग्रेस पक्षाचा म्होरक्या वाचाळवीर आहे.

लोकशाहीसाठी सत्ताधारी व विरोधी पक्ष दोन्ही महत्वाचे आहेत. यात सत्याधारी व विरोधी पक्षाला परस्पर विरोधी टीका करण्याचा पूर्णपणे अधिकार आहे,पण त्या टीकेला मर्यादा आहे. सरकारच्या धोरणावर व निर्णयावर बोट ठेवून सरकारला घेरले पाहिजे. ते सोडून गांधी परिवार सतात मोदीवर व्यक्तीगत टीका- टिप्पणी व शिव्या, आरोप करत असतो. त्यात हिंदू धर्म.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची चीड आहे.त्यांचेवर आगखड करत असतात! हा गांधी परिवार कट्टर इस्लामी संघटना तसेच अतिरेकी संघटनाच्या विरोधात तोंड उघडत नाही. तो त्यांच्या राष्ट्रविरोधी कृत्याला पाठबळ देत असतो! त्यामुळेच भारतात इस्लाम धार्मिक कट्टरता वाढते आहे. स्वातंत्र्यानंतर एका दशकापर्यंत राजकीय पक्षांनी या मर्यादा पाळल्या. पण १९६९ मध्ये देशाची व काँग्रेस पक्षाची सूत्रे श्रीमती गांधी यांचेकडे आल्यानंतर देशात एकाधिकारशाही आणि भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा मिळाला. यातून सत्ता प्राप्तीसाठी वाटेल करण्यापर्यंत मज्जल गेली. याला इतिहास साक्षीदार आहे. तेव्हा विरोधी पक्ष नेत्यांनी श्रीमती इंदिरा गांधी यांचेवर जे आरोप केले. ते वस्तुस्थितीवर आधारित होते. हा गांधी परिवार आपली प्रतिमा राष्ट्रप्रेमी, निष्कलंक, लोकशाहीवादी धर्मनिरपेक्ष आहे, असे दाखविण्याचा

आधुनिक केसरी

**देशातील विधानसभा निवडणुकीत गांधी परिवाराने टीका करण्यात मर्यादा आलोडंली आहे. हा गांधी परिवार हिंदुत्व, प्रभू श्रीराम, लोकशाही आणि राष्ट्र'यावर ज्ञान देत आला आहे. राहुल गांधीनी तर पंतप्रधान मोदी यांना 'पनवती' आणि 'खिसेकापू' म्हटले. त्यांनी 'भारत माता की जय' यावर ज्ञान पाजळले आहे. काँग्रेसचे नेते गांधींना बुध्दीवान समजात!पण अतिशहाणा तयाचा बैल रिकामा', या म्हणीप्रमाणे नेत्यांचे झाले आहे.**


केवीलवाणा प्रयत्न करत आहे. उलट मोदी यांचेकडे नेतृत्व आल्यानंतर भाजपाच्या भूमिकेत बदल झालेला आहे. मोदीमुळे भाजपाला म. गांधी व डॉ. आंबेडकरांना स्वीकारावे लागले. भाजपाने राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्ष (बेगडी नव्हे) विकासाची कास धरली. तर काँग्रेसने राष्ट्रवादाला तिलांजली दिली. भाजपा केवळ हिंदू व मुस्लिम याचे राजकारण करतो, असा गांधीचा आरोप आहे.पण काँग्रेसचे छूपे मुस्लिम प्रेम लपलेले नाही. स्वत':गांधी यांनी केरळच्या वायनाड बहूल मूस्लिम मतदार संघ का निवडला. काँग्रेस पक्षाने हमासला पाठिंबा दिला. तसेच मुस्लिम विरोधी म्हणून अनेक कायद्याला विरोध केला गेला. परवा कोझीकोड (केरळ) येथे काँग्रेस व मुस्लिम लिगने संयुक्त सभा घेतली. याचे उदघाटन काँग्रेसचे महासचिव वेणू गोपाल यांनी केले, पक्षाचे दुसरे नेते शशी थरूर यांचाही सहभाग होता. या सभेत मुस्लिम वॉट बँक, मोदी व भाजपाला लक्ष्य करण्यात आले. यावेळी गाझावर झालेल्या हल्लाची तुलना गुजरात दंगलीशी केली गेली. इस्त्राईलचे पंतप्रधान नेतन्याहू व मोदी यांचेत काही फरक नाही, दोघे सारखेच आहेत, असे म्हटले गेले. देशावर पहिला हक्क मुस्लिमांचा आहे,असे मनमोहनसिंघ म्हणाले होते! याचा विसर पडला काय? काँग्रेसचा भ्रष्टाचार हा मुलभूत अधिकार आहे.काँग्रेस देशातील संवैधानिक तपास यंत्रणा मोडीत काढण्याचे मनसुबे रचत आहे. इतकेच नव्हे, विरोधी पक्ष नेत्यांनी भारतीय सैन्याच्या पराक्रमावर प्रश्न निर्माण केले.परवा तर राहूल गांधी यांनी निवडणूक प्रचारसभेत 'भारत माता की जय' का म्हणायचे ? यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रश्न केला! याचे भारतातील शालेय विद्यार्थ्यांना ज्ञान आहे. गांधीना शिक्षणात राष्ट्रप्रेमाचे धडे दिले नसावेत ! गांधी यांचा हा प्रश्न उपस्थिती करण्यामागे शुध्द नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली आहेत! त्यांनी जातीयगणनेचा आधार देत फूट पाडण्याच्या उद्देशाने हा प्रश्न निर्माण केला.



इंग्रजानी फूट पाडो, राज करो, या नीतीचा अवलंब केला, तीच प्रवृत्ती या गांधी परिवाराची आहे. स्वातंत्र्यापूर्वी १९३७ पंडित नेहरुंनी जाहीरसभेत 'यह भारत माता कौन है,? असा प्रश्न लोकांना विचारलेला होता. त्यामागे त्यांचा राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचा होता. त्यावेळी त्यांनी जमीन, पहाड, नदी, जंगल मैदान यावर सर्वजण प्रेम करता, त्याप्रमाणे या विशाल भारतभूमीवर राहणारे सर्व करोडो जनता तिचे पूत्र आहेत. या सर्वांचा जय हा 'भारत मातेचा जय' आहे. असे म्हणाले होते. या गांधीनी नेहरूंचे (आजोबा)अनुकरण केले. पण नक्कल करण्याला अक्लल लागते! नेहरुंचे काही धोरणे चुकीचे होते. पण किमान ते विध्दान तरी होते. हे गांधी तर ना विव्दान, अभ्यासू नेते नाहीत. त्यांनी भारत माते जय' घोषाला जातीय जनगणनेचा आधार जोडला आहे. देशात सरकारच्या धोरणावर मतभेद असू शकतो. मोदीवर जातीयतेचे आरोप केला जातोय! माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या तर जातीव्यवस्थेच्या विरोधात होत्या. मग आधुनिक गांधी परिवार तर जातीय जनगणेची मागणी करतो आहे.

भारतीय वेदात ' माताभूमिःपुत्रोऽ हं पृथ्वीव्या' म्हटले आहे. म्हणजे 'भूमी हा माता आहे, मी पृथ्वीचा पूत्र आहे. तर वाल्मिकी रामायणात 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' माता आणि जन्मभूमिला स्वर्गपेक्षा उंच स्थान दिले आहे. स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह करणाऱ्यांसाठी 'भारत माता जय'हा घोष स्फूर्तीदायक होता. १८७३ मध्ये किरण चंद्र बंदोपाध्याय यांनी भारत माता नाटक प्रकाशित केले.१८८२ मध्ये बंकीम चटोपाध्याय यांचे आनंद मठ कांदबरीत 'वंदे मातरम्' गीताचा समावेश केला. हे गीत स्वातंत्र्यगीत म्हणून म्हटले जायचे. १९०५ मध्ये अवनिंद्रनाथ ठाकूर यानी भारत माताचे चार हाताचे चित्र रेखाटले. त्यात केसरी वस्त्र परिधान केले असून हातात पुस्तक व माळ, धान्याची पेंडी आहे. वाराणशी येथे भारत मंदिर उभारले गेले व या मंदिराचे १९३६ मध्ये म. गांधी यांनी उद्घाटन केले. देशात भारत मातेचे अनेक मंदिरे आहेत. त्यात हरिव्दारचे भारत माता मंदिर प्रसिध्द आहे.स्वातंत्र्यानंतर भारत मातृदेवीच्या म्हणजे भारत मातेच्या स्वरुपात रेखाटले गेले. यात भारत माताने नारंगी रंगाचे वस्त्र, हातात तिरंगा ध्वज, मागील बाजूस सिंह व भारताचा नकाशा आहे. ती भारत पूत्रांना आशीर्वाद देत आहे, असे दाखविलेले आहे. या गांधीना 'भारत माता जय.चा'इतिहास माहित नाही. या अर्धवटरावां'नी अपूर्ण माहिती देऊन लोकांत संभ्रम निर्माण केला. राजकीय निवडणूक प्रचारात दरम्यान भाजपा सरकारच्या विरोधात व्देष आणि मतांचे ध्रुवीकरण करण्याच्या उद्देशाने 'भारत माता की जय' आधार घेतला, हे दुर्देव आहे. या गांधी परिवाराला राजकीय सल्लागाराने लिहून दिलेले नीट वाचता येत नाही. त्यामुळे त्यांची अनेकवेळा फजिती होते. परवा प्रियंका वाड्रा यांना तर 'न्युनतम समर्थन मुल्य' ( एमएसपी) हे सांगता आलेला नाही. गांधी यांना 'विश्वेश्वरैय्या' शब्द उच्चारता आला नाही. गांधी परिवाराच्या भाषणांचे विनोदी किस्से समाजमाध्यमावर पहावयाला मिळतील. तसेच देशात मोबाईलचा 'मेड इन चायना' अधिक असल्याचा उल्लेख केला. काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात देशात २० हजार कोटी मोबाईलची निर्मीती होत असे! आता मोदी सरकारच्या कारकिर्दीत ३.५ लाख कोटी मोबाईलची निर्मीती होत असून विदेशात मोबाईल मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे. यावरुन पंतप्रधान मोदींनी राहुल गांधी याचे नाव घेता 'मूर्खों के सरदार' कोणत्या जगात वावरत आहेत, असे म्हणत बोचरी टीका केली. तेव्हा काँग्रेस पक्षाचे नेते शेपटीवर पाय पडल्याप्रमाणे किंचाळू लागले. कारण त्यांना देशापेक्षा गांधी परिवार मोठा वाटतो! गांधींनी राष्ट्राची बदनामी केल्याचे हे एकच उदाहरण नाही. ते विदेशात जाऊन भारताची बदनामी करतात त्यांना लोकशाही मान्य नाही. भारत हे राष्ट्र मान्य नाही ते राज्याचा संघ असे म्हणतात! 'मेड इन इंडिया नव्हे 'रेप इन इंडिया'चा संबोधले. मणीपूर घटनेवरुन भारत मातेचे तुम्ही हत्या करण्यात आली, असे वक्तव्य केले. गांधीने पीम. एम म्हणजे मोदी पनौती (अपशकून ) म्हटले. हे तर शिवी आहे. तसेच अदानी प्रकरणावरुन मोदींना लक्ष्य करतो आहे! हा प्रश्न संसदेत हा विषय वारंवार उपस्थित केला गेला. मोदी सरकारने याचे समर्थक उत्तर दिली. जर अदानी जर लुटारू आहेत.वाड्रा व गहिलोत यांचे अदाणीबरोबरचे काय सबंध आहेत? ते का लपविले जातेय! त्यांनी अदानी प्रकरणात 'खिशकापू' कृत्याचे वर्णन करत मोदी व शहा यांना खिसेकापू म्हटले आहे. यामुळे काँग्रेसचे नुकसान होईल ते स्वतः अडचणीत येवू शकतात. खर तर! गांधी घराणे हताश झाले आहे. ईडीने नॅशनल हेराल्ड प्रकरणात त्यांच्या मालकीची ७७१ कोटी रू.ची संपत्ती जप्त केली आहे. दासबोधात मूर्ख माणसाची लक्षणे सांगितली आहेत! त्यात 'तोचि येक मूर्ख' यावर ओव्या आहेत. मूर्ख हे अज्ञानी, अडाणी, अर्धवट व्यक्तीला म्हंटले जाते. पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल काहीही लागो. राहूल गांधी परिवाराने पंतप्रधान मोदीबद्दल शब्द वापरले ते निंदनीय आहेत! पण काँग्रेस व धार्जीणे पत्रकार मात्र गांधी यांचे बचावासाठी मोदी व भाजपाशी तुलना करतो आहे.

मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

खरंच निसर्गात आणि मानवी मनात किती एकवाक्यता आहे ! आकाश विशाल आणि सागरही विशाल. अथांग खोलाई आणि निळाई.

पण आपल्याला किती दिसते ? हिमनगासारखे ! हिमनगाचा एक अष्टांश भाग आपल्याला फक्त दिसतो. आणि बाकी पाण्याखाली असतो. वरवर पाहून अंदाज येत नाही. मनाचं सुद्धा तसंच आहे. आपल्याला वाटतं मन आपल्याला कळलं. पण जे कळलं ते फक्त हिमनगासारखं असतं . एका प्रसिद्ध हिंदी गीतात म्हटलं आहे की ' आकाश के उस पार भी आकाश है '. खरंच असेल का असं ? की त्यात अजून खोलवर काही अर्थ आहे ? मनाचंही असंच असेल का ?
खरं तर असं म्हणतात की मनुष्य देहातच ही सगळी पंचमहाभूतं वसत आहेत. नव्हे आहेतच. हा देहच पंचमहाभूतांचा बनलेला आहे. आकाशाचा विस्तीर्णपणा, सागराची गहराई, सूर्याचं तेज, पाण्याचं जीवनदायी तत्व, वायूची शक्ती आणि धरित्रीची नवनिर्मितीची क्षमता. हे सगळं आपल्यात नाही का ? पण खरंच आपण कधी पाहतो का त्याकडे लक्षपूर्वक ? जेअध्यात्मात उच्चपदाला पोहचलेले साधक असतात ते तर असं म्हणतात की आपल्या देहात केवळ पंचमहाभूतेच नव्हे तर सगळे ब्रह्माण्ड सामावले आहे. असं म्हणतात की कृष्णानं आपल्या मुखातूनच विश्वरूप दर्शन घडवलं होतं . जे पिंडी ते ब्रह्माण्डी ! तर असं हे सगळं ब्रह्माण्ड सामावलेलं आपलं मन आणि शरीर.

पण खरंच आपलं मन असतं का असं आकाशासारखं विशाल ? असतं पण आपणच त्याला संकुचित करतो. मी, माझं म्हणून. मग हे मनरूपी वस्त्र जेव्हा आपण शरीरावर ओढून घ्यायचा प्रयत्न करतो तेव्हा ते अपुरं पडतं . तोंडावर ओढून घ्यावं तर पाय उघडे पडतात आणि पाय झाकावे तर तोंड उघडं पडतं . खरं तर ते एवढं मोठं होऊ शकत की स्वतःबरोबरच इतरांना सुद्धा पुरून उरेल ! पण आपली नजर नेहमी दुसऱ्याच्या वस्त्राकडे. त्याचेही वस्त्र आपल्या अंगावर असावे असं वाटतं . मग कसं होणार ? समाधान कसं मिळणार ? इतरांना देण्याचा जो आनंद आहे तो काही औरच असतो. तो अनेक पटींनी आपल्याकडे परत येतो. आपला चेहरा आनंदाने उजळवून टाकतो. आत्मदीप प्रकाशला की भोवतालचं जग उजळतंच .



# आनंदी पहाट

## चारित्र्यगुणांचा प्रसार म्हणजे शिक्षण

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्ये आणि चारित्र्यगुणांचा प्रसार असे म्हणता येईल. तिची नेमकी व्याख्या विवादित आहे आणि शिक्षणाची उद्दिष्टे काय आहेत तसेच गंभीर विचारसरणीला प्रोत्साहन देऊन शिक्षण किती प्रमाणात वेगळे आहे; याबद्दल देखील अनेक मतभेद आहेत. हे मतभेद शिक्षणाचे प्रकार कसे ओळखायचे, मोजायचे आणि सुधारायचे ह्यावर परिणाम करतात. शिक्षण हा शब्द सुशिक्षित लोकांच्या मानसिक स्थिती आणि गुण त्याचप्रमाणे शैक्षणिक घटनांचा अभ्यास करणाऱ्या शैक्षणिक क्षेत्राचा देखील संदर्भ घेऊ शकतो. शिक्षणाचे अनेक प्रकार आहेत; औपचारिक शिक्षण हे सार्वजनिक शाळांसारख्या काही विशिष्ट धाटणीच्या संस्थात्मक चौकटीत होते. अनौपचारिक शिक्षण देखील संरचित आहे; परंतु ते औपचारिक शालेय शिक्षण प्रणालीच्या बाहेर होते. अनौपचारिक शिक्षण म्हणजे दैनंदिन अनुभवातून असंरचित शिक्षण होय. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण हे ह्या दोन स्तरांमध्ये विभागले गेले आहे.
त्यामध्ये बालपणीचे शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि उच्च स्तरीय शिक्षण यांचा समावेश होतो. अनेक वर्गीकरणे ही अध्यापन पद्धतीवर लक्ष केंद्रित करतात, जसे की शिक्षक-केंद्रित आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण होय. विज्ञान शिक्षण, भाषा शिक्षण आणि शारीरिक शिक्षण यासारख्या विषयानुसार शिक्षणाचे स्वरूप देखील ओळखले जाऊ शकते. शिक्षण सांस्कृतिक मूल्ये आणि नियम शिकवून मुलांना समाजात सामील करते. हे त्यांना समाजाचे उत्पादक सदस्य बनण्यासाठी आवश्यक कौशल्यांसह सुसज्ज करते. अशा प्रकारे, ते आर्थिक वाढीस उत्तेजन देते आणि स्थानिक त्याचप्रमाणे जागतिक समस्यांबद्दल जागरूकता वाढवते. संघटित संस्था शिक्षणाच्या अनेक पैलूंवर परिणाम करत असतात. शिक्षण यशस्वी होते की नाही; यावर अनेक घटक प्रभाव टाकतात. मनोवैज्ञानिक घटकांमध्ये प्रेरणा, बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्व यांचा समावेश होतो. सामाजिक घटक, जसे की सामाजिक- आर्थिक स्थिती, वांशिकता आणि लिंग, अनेकदा भेदभावाशी जोडलेले असतात.

# निसर्ग ...

आधुनिक केसरी

"निसर्गाची करणी, नारळात पाणी " अशा कितीतरी गोष्टी आहेत ज्या निसर्गाने आपल्याला भरभरून दिल्या आहेत. राहायला जागा आहे. सुंदर सुंदर झाडे ,फुले, पक्षी ,प्राणी, डोंगर, नदी ,धबधबे ,झरे, समुद्र डोळ्याला आणि मनाला सुख देणाऱ्या अतिशय सुंदर अशा या गोष्टी आहेत .अशा या सुंदर निसर्गाचा ऱ्हास होता कामा नये .आपण निसर्गाची काळजी घेतली पाहिजे. निसर्गाचे फक्त ओरबाडे घेऊ नका. नवीन निसर्ग सुद्धा तयार करूया .निसर्गाशी मैत्री करूया. मैत्री केली म्हणजे निसर्गावर वार करता येणार नाही .मित्रावर कोणी वार करतं का? नाही ना!!!! जळणासाठी ,घरासाठी, रस्त्यांसाठी, फर्निचर साठी, घरे बांधण्यासाठी, कारखान्यासाठी बऱ्याचदा मोठे जंगले तोडले जातात. सुंदर असा दिसणारा निसर्ग भयान होतो. पुन्हा नव्याने या निसर्गाची निर्मिती व्हायला पाहिजे. निसर्गाने भरभरून दिलेले दान कधीच कमी पडत नाही. खरंतर जे निसर्गनिर्मित आहे ते आपण कधीच निर्माण करू शकत नाही. त्यामुळे निसर्गाचे जतन केले पाहिजे. रक्षण केले पाहिजे. निसर्गनिर्मित जे आहे ते तर जपलेच पाहिजे. पण मानवनिर्मित निसर्ग सुद्धा तयार केला पाहिजे. छान सुंदर हिरव्यागार निसर्ग असेल तर पाऊस देखील खूप पडतो. व पर्यावरण सुद्धा चांगले राहते. मानवाला फक्त ओरबाडायची सवय आहे. जोपासण्याची सवय कमी आहे. किती सुंदर निसर्गनिर्मित झरे नद्या समुद्र झाडे फुले डोंगर आहेत. अगदी नयनरम्य. पण मानव आपल्या स्वार्थासाठी हे सर्व नष्ट करत आहे. ठीक आहे... गरज असेल तर रस्ते धरण तलाव तयार करा.त्या वेळी तोडलेली झाडे पुन्हा नव्याने त्यांची निर्मिती करूया. निसर्ग हा निसर्गच असतो. मोकळ्या निसर्गात आजारी लोक सुद्धा विना औषध बरे होतात,. निसर्गाने जसं मानवाला भरभरून दिलं, तसेच मानवाने निसर्गाचे रक्षण करूया, निसर्ग जपूया ,त्याची काळजी घेऊया.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.२५



# निरुपण


आधुनिक केसरी

स्त्रीकारणें लोलंगता । स्त्रीकारणें अतिनम्रता ।
स्त्रीकारणें पराधेनता । अंगिकारिली ॥५२॥
स्त्रीकारणें लोभी जाला । स्त्रीकारणें धर्म सांडिला ।
स्त्रीकारणें अंतरला । तीर्थयात्रा स्वधर्म ॥५३॥
स्त्रीकारणें सर्वथा कांहीं । शुभाशुभ विचारिलें नाहीं ।
तनु मनु धनु सर्वही । अनन्यभावें अर्पिलें ॥५४॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

भवसागर नर देह का, दिशा प्रदर्शक यंत्र ।
सत्संगति सब मूल है, सब ज्ञानन पर मंत्र
।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय)
०५/०५/५०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
या भवसागरात मनुष्याला सत्यज्ञानरूपी दिशा दाखवणारे यंत्र सत्संग आहे, जे सर्व ज्ञान आणि मंत्रांचे मुळ आहे. सत्संगतीद्वारेच मनुष्य यथार्थ कर्तव्याला जाणून उचीत सन्मार्गावर चालतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

.............................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# समर्थ रामदास

सज्जनगडाच्या पायथ्याला समर्थांना एक बाग तयार करायची होती.




या बागेत कोणकोणती झाडे लावावयाची आणि ती कशी लावावीत या संबंधीचे समर्थांचे स्वतंत्र प्रकरण आहे. यावरून त्यांचा वनस्पतीशास्त्राचा किती अभ्यास होता याची कल्पना येते. बाग प्रकरण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कवितेत समर्थांनी सुमारे ३५० वनस्पतींची नवे दिली आहेत. आश्चर्य म्हणजे यादी देताना पालेभाज्या, फळभाज्या, फळ, फूल, औषधी वनस्पती यांची व्यवस्थित वर्गवारी आहे.
सज्जनगडावर दोन वर्षे राहून समर्थ शिवथरघळीत आले. तिथे त्यांनी समर्थ संप्रदायाचा श्रीमद दासबोध हा प्रधान ग्रंथ लिहिला. या ग्रंथात समर्थांनी प्रपंच, राजकारण, संघटन, व्यवस्थापन, व्यवहारचातुर्य, व्यक्तिमत्त्व विकास, सभ्यता आणि शिष्टाचार या सगळ्या गोष्टींचा अंतर्भाव केला आहे. दासबोधातील मूर्खलक्षणे वाचत असताना तर अनेकांना वाटते की, समर्थांनी आपला स्वभाव अचूकपणे

# भगवंत हा प्रपंचासाठी साधन बनवू नये

आधुनिक केसरी

एक मुलगा घरातून पळून गेला. तेव्हा त्याची आई म्हणाली, 'तो कुठेही राहू दे, पण खुशाल असू दे.' तसे, तुम्ही कुठेही राहा पण नामात असा. नाम तेवढे बळजबरीने घ्या. श्रद्धेने घेतले तर जास्त बरे; वृत्ती सांभाळून नामात राहिलात तर त्याहूनही जास्त बरे ! वनस्पतीच्या पाल्याचा रस काढण्यासाठी काही पाल्यांमध्ये मध घालावा लागतो, काहीमध्ये दूध, तूप किंवा पाणी घालावे लागते. तसे भगवंताचे प्रेम लाभण्यासाठी आणि नामात गोडी उत्पन्न होण्यासाठी, त्या नामामध्ये थोडी श्रद्धा घाला. ' मी ब्रह्म आहे ' या अनुभवातसुद्धा मीपणा आहे. नाम त्याच्याही पलीकडे आहे. म्हणून भगवंताच्या नामाचे सतत स्मरण ठेवावे; त्यामुळे प्रपंच सोपा जातो. नामाची सत्ता फार बलवत्तर आहे. जगात असे कोणतेही पाप नाही की जे नामासमोर राहू शकेल. नाम हे त्याच्या शत्रूलाही मदत करते, तर ते आपल्याला मदत करीलच. रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. सत्याला काही रूप दिल्याशिवाय



आज आपल्याला त्याचे अनुसंधान ठेवता येत नाही. नाम हे त्याचे रूप आहे, म्हणून नामाचे सतत अनुसंधान ठेवावे. भगवंताच्या नामात मोबदल्याची अपेक्षा नाही, म्हणून ते अपूर्ण नाही. अडाणी लोकांना नाम घ्यायला सांगितले तर ते लगेच घेणे चालू करतात, परंतु विद्वान् लोक मात्र ' नामाचे प्रेम असेल तरच मी नाम घेईन ' असे म्हणतात. विषयरूपी सापाचे विष उतरलेले नसल्याने भगवंताचे अमृतासारखे गोड नाम आपल्याला गोड लागत नाही. याकरिता या क्षणापासूनच नाम घ्यायला सुरुवात करावी. आपण रामाचे व्हावे आणि त्याला जे आवडते ते करावे. रामाला जाणतेपणाने शरण न जाता नेणतेपणाने शरण जावे. भगवंताला अनन्य शरण जाऊन अनुभव घ्यावा. नीतीने वागावे, भक्ती चांगली करावी, मग राम प्रसन्न होतो. ज्ञान श्रेष्ठ खरे, पण ते भक्तीशिवाय जगू शकत नाही; कारण भगवंताहून कधी विभक्त नसतो तो भक्त होय, आणि ज्ञानामध्ये भगवंताशी एकरूपत्व असते; म्हणून भक्तीमधून ज्ञान उत्पन्न होते आणि ते भक्तीवरच जगते. खरा भक्त ज्ञानीच असतो. भगवंतासाठी भगवंत पाहिजे म्हणून भक्ती करणारा लाखांमध्ये एखादाच असतो. खरी भक्ती ती हीच समजावी. नामाकरिता आपण नाम घ्यावे; राम ठेवील त्यात समाधान मानावे. भगवंत हा प्रपंचासाठी साधन बनवू नये, तो साध्य असावा. ज्याने भगवंताच्या नामात आपल्या आयुष्याचा व्यय केला, त्याने जन्माला येऊन सर्व काही साधले आणि जन्माचे सार्थक करून घेतले.

# शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

आपण कित्येक वेळा फसतो समोरचा माणूस ज्ञानी आहे सज्जन आहे असे आपण समजतो. पण जेव्हा त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतो तेव्हा त्याच्या शून्य ज्ञानाविषयी समजते. आपण तर समोरच्याला परब्रम्हाची उपमा देऊन ठेवतो. परंतू जेव्हा सुक्ष्म अभ्यास केला तर कळते की आपला भ्रमनिरास झाला आहे.



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

खरं तर शून्यातून प्रांत हा सूक्ष्माचा प्रांत आहे.परब्रम्हाच्या दर्शनामध्ये येणारा शुन्यातून अडथळा हा सूक्ष्म असतो. तो अत्यंत बारकाईने अभ्यासपूर्वक बाजूला करावा लागतो. याठिकाणी समर्थांनी राजहंसाचे उदा, दिले आहे. पाण्यामध्ये मिसळलेले दूध राजहंस वेगळे करतो, त्यामधील दुध पितो व पाणी टाकून देतो.त्याचंप्रमाणे विवेकी साधक शून्य बाजूला सरकवून केवळ ब्रम्हस्वरूपाला जवळ करतो.

रविवार, २६ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १०८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक




●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 26 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-108 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# कोयनेचे पाणी पेटले

## पालकमंत्री - खासदारात ठिणगी

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली : कोयनेच्या पाण्यावरून भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यात वाद निर्माण झाला असून राजकारण चांगलेच पेटले आहे. साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आडमुठी भूमिका घेऊन सांगली जिल्ह्यावर अन्याय केला आहे. मसुदा समितीमध्ये घेतलेल्या ठरावावर सही न करता शंभूराज देसाईंनी अधिकाऱ्यांना दमबाजी करत चुकीची भाषा वापरल्याचा आरोप सांगलीचे खासदार संजयकाका पाटील यांनी केला आहे. त्याचबरोबर शंभूराज देसाई यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार आहे.**

यामध्ये सुधारणा झाली नाही तर राजीनामा देणार असल्याचा इशारा पाटील यांनी दिला. जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. यंदाच्या वर्षी पाऊस कमी झाल्याने कृष्णा नदी कोरडी पडली आहे. भाजपचे खा. संजयकाका पाटील यांनी आक्रमक भूमिका मांडत मंत्री शंभूराज देसाई याच्यावर सडकून टीका केली आहे. यावेळी बोलताना संजयकाका पाटील म्हणाले, सांगलीत कोयनेच्या पाणी प्रश्नावरून कालवा सल्लागार समितीची बैठक झाली. या बैठकीत काही ठराव करण्यात आले. त्या ठरावावर सांगली, कोल्हापूर, सोलापूर च्या पालकमंत्र्यांनी सही केली. मात्र, साताऱ्याच्या पालकमंत्र्यांनी आडमुठी भूमिका घेत त्यावर सही केली नाही. सांगली जिल्ह्याला वेठीस धरण्याची भूमिका घेऊन राजकारण करत आहेत का ? याबाबत आम्हाला शंका आली. पाटबंधारे विभागाचे अधिकारी त्यांना भेटण्यासाठी गेले असता त्यांना आरेरावीची भाषा वापरून अधिकाऱ्यांना दमबाजी केली. आम्ही आमच्या हक्काचे पाणी मागत आहे आमही भीक मागत नाही. साताऱ्याच्या पालकमंत्र्यांनी आडमुठी भूमिका घेतली याचा आम्ही निषेध करत आहोत. याची तक्रार आम्ही केंद्रातील अमित शाह, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. घाणेरडे राजकारण आम्ही खपवून घेणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. कोयना धरण तुमच्या मालकीचे आहे का? आमच्या हक्काचे पाणी आहे, कोणी दान आणि भीक देत नाही, असंही संजयकाका पाटील म्हणाले.



दिवाळी सुटीनिमित्त जेजुरीगडावर भाविकांची प्रचंड गर्दी- महाराष्ट्राचे लोकदैवत जेजुरी खंडोबा देवाला दिवाळी सुटीनिमित्त लाखो भाविकांनी दर्शनाकरिता गर्दी केली होती यामुळे संपूर्ण गड परिसर भाविकांनी फुलून गेला होता. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# आ. गोपीचंद पडळकरांची जरांगे-पाटलांवर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जातीयवादी पिलावळ आरक्षण मागत आहे. पण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही घेण्यास तयार नाहीत, असे म्हणत गोपीचंद पडळकरांनी जरांगे-पाटलांना लक्ष्य केले आहे. गोपीचंद पडळकर म्हणाले, धनगर आरक्षणासाठी न्यायालय, रस्त्यावर लढाई सुरू असतानाच सरकारकडेही पाठपुरावा सुरू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात आम्हाला आरक्षण दिले होते. काही पुरोगामी नेत्यांनी जातीयवादी पिलावळ तयार केल्या आहेत. ही पिलावळ आरक्षण मागत आहे. पण ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सन्मान करत नाहीत. अथवा बाबासाहेबांचे नावही घेण्यास तयार नाहीत. मात्र, यांना आरक्षण पाहिजे असे कसे चालेल? असा सवाल गोपीचंद पडळकरांनी उपस्थित केला. ७० वर्षे आमच्यावर अन्याय केला गेला. अनेकजण आयएसएस, आमदार, खासदार झाले असते. पण, यापासून आम्ही मुकलो आहोत. आता आमची एकजूट झाली आहे, असे गोपीचंद पडळकरांनी म्हणाले.










# सांस्कृतिक एकता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**एकतेत सलोखा तर अनेकतेत दुहीचे बीज विद्यमान असते. ही एकता टिकून रहावी, वाढावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होणे ही आजच्या राजकारणाची खरी गरज आहे. मनुष्यमात्रांच्या कल्याणासाठी, सुखी आणि संपन्न आयुष्य प्रदान करण्यासाठी आणि निरोगी, निरामय तसेच सुरक्षित आयुष्य प्रदान करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन केलेली कृती म्हणजे राजकारण असे ढोबळमानाने म्हणता येईल. विशेषतः आधुनिक जीवनमूल्ये स्वीकारानंतर सर्वांठायी समत्वबुद्धी ठेऊन कार्य करणे अवश्य असते. आपणांस कोणी चांगले म्हणावे म्हणून नाटकीपणे चांगल्याचा आव आणणे वेगळे आणि अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी या संतोक्तीप्रमाणे चांगले असणे निराळे.**



## क्षितिजापल्याड

इतर कोणत्याही व्यवस्थेपेक्षा लोकशाही निश्चितच चांगली, परंतु त्याअंतर्गत चालणारे सांस्कृतिक राजकारण मात्र अखिल मानव्यपूरक आहे का? हा खरा प्रश्न आहे. आपण ज्या काळात अस्तित्वात असतो तो काळ चांगला किंवा वाईट या रीतीने कसेही वर्णन करता येईल. प्रश्न केवळ काळाचा किंवा विश्लेषणाचा नसून मानवी प्रगतीच्या भौतिक-अभौतिक स्थितीचा आहे. हेही दिवस जातील, या वाक्याप्रमाणे काळ तर मोठा कठीण आला, हे वाक्य आपण कोणत्याही काळासाठी वापरू शकतो. भौतिक प्रगती आज किंवा उद्या काळसुसंगतपणे होईल. राजकारणाचा मोठा भाग त्याकडे लक्ष देऊन असतो. सामान्य माणूसही रस्ते, वीज, पाणी, दवाखाने, शिक्षणाच्या आणि दळणवळणाच्या पुरेशा सोयी असतील आणि आटोक्यात असणारी महागाई असेल तर फार आकांडतांडव न करता जीवन व्यतीत करण्यात मशगुल असतो. चाणाक्ष राजकारणी नेमका याच गोष्टींचा फायदा उचलू शकतात. प्रमाणशीर इतिहासापेक्षा लोकस्मृतींना आवाहन करून हव्या तशा स्मृती निर्माण करण्याचे आणि त्यांचा फैलाव करण्याचे गुपीत तर कधी उघड कटकारस्थान होत असते. सत्ता मिळवणे आणि मिळालेली सत्ता टिकवणे या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. काहींना फक्त सत्ता मिळते पण टिकवता मात्र येत नाही. कारण ती सत्ता टिकविण्यासाठी ज्या काही युक्त्या-प्रयुक्त्या करायच्या असतात त्या ही मंडळी करत नाहीत किंवा त्यात कमी पडतात. ही गोष्ट चांगली की वाईट हे त्या त्या काळानुसार ठरत असले तरी, समाजाच्या विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जोपासण्यासाठी सत्तापक्ष नेहमीच सांस्कृतिक क्षेत्रात हस्तक्षेप करताना दिसतात. प्रस्थापित व्यवस्थेला धोका पोहचू नये किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या बहुसंख्याकांना आपलेसे करण्यासाठी संस्कृतीचा वापर आयुधांसारखा करणे हे सत्तापक्षाला काही नवीन नसते. समाजात जेव्हा चंगळवाद आणि तांत्रिकता वाढत जाते तेव्हा कोणत्याही सरकारला शासन करणे सोपे होत जाते. कारण जनमानसाला एका भ्रममूलक अवस्थेमध्ये जगायची सवय यामुळे वाढीस लागते. जनतेच्या हिताच्या नावाखाली अनेक अनुत्पादक गोष्टी त्याआडून करता येतात. या माध्यमातून स्वकमाई आणि स्वार्थ साधता येतो, हे हेरले जाते. वैयक्तिक स्वार्थपरायणता सामाजिक गैरमार्गाने साधणे हे एकमेव उद्दिष्ट होऊन बसते. तोमासो कंपानेला हा एक इटालियन तत्त्वज्ञ होऊन गेला. त्यांच्यावर प्लेटोच्या आदर्श राज्याचा भरपूर प्रभाव होता. कंपानेला म्हणतात की, वैयक्तिक संपत्ती संचय हा सामाजिक विकासासाठी सर्वात मोठा अडसर ठरतो. त्यासाठी व्यक्तीच्या सामाजिक विकासाच्या वाढीची सर्व जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे. या प्रकारच्या साम्यवादी विचारांच्या कंपानेलाचा प्रभाव पुढे चालून ग्रामशीवर पडला. अंतोनिओ ग्रामशी यांच्या विचारांचे नावीन्य म्हणजे मार्क्सवादाला सांस्कृतिक परिप्रेक्षाची दिलेली देण होय. आपल्या कारावासातील वास्तव्यात ग्रामशीने सांस्कृतिक अंगाने समाजाचे विश्लेषण मोठ्या प्रमाणात केले आहे. जवळपास तीन हजार पृष्ठांच्या लेखनातून समाजाची व शासनाची सांस्कृतिक अंगाने चिकित्सा केली आहे. सभ्यता आणि संस्कृतीचा प्रवाह अखंडपणे खळाळता असावा असे आपण म्हणतो. त्यात बहुसंख्यांकांची किंवा जेत्यांची संस्कृती हे छुपेपणे अंतर्भूत असते. आधुनिक काळात ज्यांना आपण माध्यमे म्हणून संबोधतो त्या वर्तमानपत्र, दूरचित्रवाणी सारख्या माध्यमातून तसेच समाजमाध्यमांतून शासन आपणांस हवे तसे जनमत तयार करू शकते. सांस्कृतिक राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सपाटीकरण होय. प्रत्येक प्रांताची, भाषेची, लोकव्यवहाराची एक रीत असते, परंतु राजकारणाच्या सोयीसाठी त्याचे एकरेषीकरण करण्यावर सांस्कृतिक अधिसत्तेचा भर असतो. यावर एकमेव उपाय म्हणजे शिक्षण. कंपानेला यांनीही शिक्षणास अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. आपल्याकडे महात्मा फुले यांनी देखील शिक्षणास फार महत्त्व दिल्याचे



आपण पाहतो. या द्रष्ट्या महानुभवांस शिक्षणाचे महत्त्व माहीत होते. शिक्षणाने विवेकवादी विचार वाढला पाहिजे, बुद्धिवादी विचार वाढला पाहिजे. आपल्या कार्यासाठी शारीरिक श्रमापेक्षा बुद्धीचा वापर करणाऱ्यास आपण बुद्धिवादी म्हणतो. खरेच शिक्षणातून बुद्धिवाद वाढतो का? परजीवी कारकुनी बुद्धिवाद आणि स्वयंसिद्ध सर्जनशील बुद्धिवाद यात फरक करावा लागेल. शासन सर्वांना शिक्षण देताना ते यापैकी कोणत्या प्रकारचे शिक्षण देते यावर आपले सांस्कृतिक पुढारलेपण अथवा मागासलेपण अवलंबून असते. सर्वांना मोफत शिक्षण दिले तर समाजाच्या हिताचे होईल पण विशिष्टांच्या दूरगामी दृष्टीने गैरसोयीचे होईल. मग अशावेळेस शासन शिक्षणाच्या बाजारीकरणावर भिस्त ठेवते. पैशाअभावी सामान्य जनतेची मुले दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहतात. अशा शिक्षण व्यवस्थेतून फक्त कारकुनी बुद्धिवाद विकसित होऊ शकतो, जो की कोणत्याही काळात, कोणत्याही व्यवस्थापकांना हवा असतो.

प्रयत्नपूर्वक समाजाची चौकट टिकवून ठेवणे आणि त्यापायी कुछ लोग मरते है तो मरणे दों, कुछ बसे जलती है तो जलने दों याप्रकारची वृत्ती वाढीस लागते. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर राष्ट्राचे म्हणून एकसामायिक ध्येय आपल्यासमोर असायला पाहिजे होते, ते किमान तयार करणे गरजेचे होते, ते आम्ही करण्यात असफल ठरलो आहोत. कुटुंबातील सदस्यांना काही कामे नसतील तर वाद-कलह वाढतात, त्याप्रमाणेच देशाचेही आहे. देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी सांस्कृतिक एकोपा टिकवून ठेवणे, सामाजिक दुरी वाढविणाऱ्या सांस्कृतिक एककांची हद्दपारी आपणांस एक भारत - अखंड भारत घडविण्यास मदत करणारी ठरू शकते.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# बेरोजगारी एक भीषण समस्या



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून 76 वर्षे पूर्ण झाली आहेत.येवढ्या कालावधीत भारतीयांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे.पण या काळात भारताला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. पूर, भूकंप, दुष्काळ अशा अनेक नैसर्गिक समस्यांना भारत एकजूटीने व एक दिलाने सामोरे गेला आहे आणि कठीण परिस्थितीवर त्याने मात केली आहे. पण मानवनिर्मित समस्या मात्र राष्ट्रप्रगतीला विघातक ठरत आहेत. त्यापैकीच एक भीषण समस्या म्हणजे बेरोजगारी.आज भारतात कोट्यवधी माणसे सुशिक्षित-अशिक्षित, कुशल-अकुशल, कारागीर व स्त्री-पुरुष हे बेरोजगार आहेत.**

उद्योग, नोकरी, कामधंदा हे करण्याची इच्छा असूनही त्यांना मनाजोगी नोकरी वा कामधंदा भेटत नाही.तेव्हा त्यांच्या पदरी निराशा येते.पण एकेकाळी असा समज होता की, शिक्षण घेतले तरच आपल्याला नोकरी मिळेल. पण आजची वस्तुस्थिती काय दिसते? लक्षावधी सुशिक्षित, पदवीधर बेकार आहेत. असे का? याचे उत्तर म्हणजे सतत वाढत जाणारी आपली अफाट लोकसंख्या हे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिकणाऱ्यांचे प्रमाण वाढले आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर आपल्याला नोकरी मिळावी अशी सर्वांची अपेक्षा असते. पण सुशिक्षित बेकारांच्या तुलनेत नोकऱ्यांची संख्या अल्प प्रमाणात झाली. त्यामुळे सुशिक्षित बेकारांची संख्या सतत वाढत चालली आहे.अशा या भीषण अवस्थेत बेकार तरुण बेभान होत आहेत.रिकामे डोके सैतानाचे घर या म्हणीप्रमाणेच, सांगायचा मूद्दा काय तर बेकारीतून गुन्हेगार निर्माण होतात. अलिकडच्या काळात तर असे लक्षात आले आहे की, सीमेवरच्या दहशतवाद्यांमध्ये आणि शहरातील गुंड टोळीमध्ये हे बेकार तरुण सामील होतात, यालाही बेकारीच कारणीभूत आहे. असे म्हटले तर



वावगे ठरणार नाही आणि या बेकारीतून देशाचे होणारे मोठे नुकसान म्हणजे, आपल्या देशातील बुद्धिमान तरुण परदेशात शिक्षण घेण्यासाठी जातात आणि तेथेच स्थायिक होतात. त्यामुळे आपल्या देशातील बुद्धिमत्ता आपल्या देशाच्या उपयोगी येत नाही तर इतर देशांच्या उपयोगी पडते. ही बेकारी नष्ट करायची असेल, तर आपण उदरनिर्वाहासाठी नोकरीवर अवलंबून राहणे थांबवले पाहिजे. जास्तीत जास्त लोकांनी स्वयरोजगाराकडे वळले पाहिजे.

येथे एक लक्षात घेतले पाहिजे की, आपल्याला इतर कोणीही स्वयरोजगार आपल्या हातात आणून देणार नाही. आपण आपल्या समाजातील व्यवहारांचे बारकाईने निरीक्षण केले पाहिजे. लोकांच्या गरजा कोणत्या आहेत, त्यांच्या अडचणी काय आहेत, हे शोधले पाहिजे आणि त्यातूनच आपला स्वयरोजगार उभा केला पाहिजे. दुसरा एक महत्वाचा मार्ग म्हणजे आपण ग्रामीण भागाकडे वळले पाहिजे. तेथे शेतीवर आधारित अनेक व्यवसाय आपली वाट पाहत आहेत. कुक्कुटपालन, शेळीपालन, गोपालन, मधूमक्षिकापालन वगैरे अनेक व्यवसायांची येथे उदाहरणे देता येतील. फळे, फुले, दूध, औषधी वनस्पती आदींच्या निर्मिती मधूनही मोठमोठे व्यवसाय उभे करता येतील. या व्यवसायांसाठी आपल्याला शासनही भरपूर साहाय्य करण्यास तयार आहे. शासकीय पातळीवर करता येतील असेही काही उपाय आहेत. त्यासाठी शासनाने जास्तीत जास्त रोजगार निर्माण करणाऱ्या उद्योगधंद्यांना परवानगी दिली पाहिजे. रस्ते, विहिरी, पाझर तलाव यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणारी कामे हाती घेऊन रोजगार निर्माण केला पाहिजे. अशा प्रकारे चहूबाजूंनी प्रयत्न केल्यास देशापुढील बेकारीची समस्या नष्ट होऊन आपला भारत देश प्रगतीचे एक दमदार पाऊल टाकेल. बेरोजगारी हा मानव विकासाचा एक प्रमुख आर्थिक निकष आहे. कारण तो निरोगी, शिक्षित आणि आजीविका मिळविण्यासाठी इच्छुक व्यक्तींची क्षमता (किंवा अक्षमता) दर्शवितो. सेवानिवृत्ती, अपंगत्व, उच्च शिक्षण घेणे इत्यादी विविध कारणांमुळे काम करण्यास असमर्थ असलेल्या लोकांना यातून वगळण्यात आले आहे. देशाचा बेरोजगारीचा दर जितका जास्त असेल तितकी त्याची आर्थिक वाढ कमी उत्पादक आहे, असे मानले जाते.

रोजगार नसतानाही लोक संसाधनांचा सतत वापर करतात. देशाच्या अर्थव्यवस्थेला व्यवहार्य फायदेशीर योगदान न देता ही संसाधने केवळ वापरली जातात. सतत उच्च बेरोजगारीचा दर हा देशातील आर्थिक संकटाचा एक महत्त्वपूर्ण सूचक आहे आणि त्याचे सामाजिक आणि राजकीय परिणाम देखील असू शकतात ज्यामुळे अंतर्गत संरचनेचा ऱ्हास होतो.दुसरीकडे, कमी बेरोजगारीचा दर अर्थव्यवस्थेत उपलब्ध श्रमाचा जास्तीत जास्त वापर, उच्च वेतन वाढ आणि जीवनमानात एकूण वाढ दर्शवते. देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी एक आदर्श राज्य म्हणजे त्याच्या संभाव्य कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त उत्पादन घेणे. तथापि, अल्प बेरोजगारीचा दर हा अर्थव्यवस्थेवरील ताणाची निदर्शक असते, ज्यामुळे चलनवाढ होते आणि अतिरिक्त मजुरांची गरज असतानाही नियोक्तांना त्यांना सामावून न घेता यावे अशी प्रतिकूल परिस्थिती त्यातून निर्माण होत असते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये १५८ विद्यार्थ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचालित छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात सिव्हील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी झालेल्या कॅम्पस इंटरव्हुमध्ये १५८ विद्यार्थ्यांची निवड झाली. यात महाविद्यालयाच्या सिव्हील विभागातील ३५ विद्यार्थ्यांची 'कोअर प्रोजेक्ट इंजिनियर्स अँड कन्सल्टंट प्रायव्हेट लि.' या नामांकित कंपनीत निवड झाली व इतर सहभागी झालेल्या सर्व महाविद्यालयातील १२३ विद्यार्थ्यांची निवड झाली. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्षरणजीत मुळे, सचिव पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख डॉ. संदीप अभंग, स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. सोहेल अली यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच इंटरव्हु च्या यशस्वीतेसाठी डॉ. प्रशांत जाधव, प्रा. संजय कुलकर्णी , प्रा. सतीश मनाळ, डॉ. मनोज मते, प्रा. अजय बूटवाणी, प्रा. केशव काळे आदींनी परिश्रम घेतले.

# वृद्ध दाम्पत्याचा अपघात, दोन ठार, एक जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** आज दुपारी बारा वाजता झालेल्या अपघातात माजी प्राचार्य नीलिमा हरिदास पाटील तसेच कार चालक संजय भानुदास गेडाम यांचा मृत्यू झाला. तर माजी जि. प.सदस्य असलेले हरिदास पाटील हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पाटील कुटुंब हे आपल्या कारने नातलगाच्या तेराव्यासाठी यवतमाळ येथे चालले होते. त्यांच्याच मागे त्यांचा पुतण्या व श्रमिक संघर्ष दैनिकाचे संपादक दिनेश उर्फ चारू पाटील हे दुसऱ्या कारने सोबतच चालले होते. त्यांनी दिलेल्या तक्रारी नुसार भरधाव वेगात असलेली कार अनियंत्रित झाल्याने हा अपघात घडला. देवळी समोर भिडी येथील



दुभाजकावर कार आदळली. त्यात कारचा चेंदामेंदा झाला. श्रीमती पाटील, ७० या जागीच ठार झाल्या.

# रेल्वेगाड्या धावताहेत ताशी १३० किमी वेगाने

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** बडनेरा ते वर्धादरम्यान आता ३० रेल्वेगाड्या प्रतितास १३० किलोमीटर वेगाने धावत आहेत. गाड्यांचा वेग वाढवण्यासाठी अनेक विभागांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्या जात आहेत. यामध्ये एका विभागात अनेक ट्रॅक टाकणे, ओव्हर हेड इक्विपमेंट रेग्युलेशन, सिग्नलची कामे आणि इतर तांत्रिक कामांचा समावेश आहे. या कामांमुळे मध्य रेल्वेला या बडनेरा ते वर्धा दरम्यान ताशी १३० किमी वेगाने रेल्वेगाड्या चालवता आल्या आहेत. मध्य रेल्वे सध्या एकूण १२०६.७३ किमी म्हणजे ९५.४४ किमी, इगतपुरी-नाशिक-भुसावळ-अकोला-बडनेरा मार्गावर ५२६.६५ किमी, पुणे ७५९ किमी असे एकूण १२०६.७३ किमी अंतर कापून १३० किमी प्रतितास वेगाने गाडया चालवत आहे. सुरक्षेच्या सर्व बाबी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तांत्रिक तपासणी केल्यानंतर या गाड्यांचा वेग वाढवण्यात आला आहे. वेग वाढविण्यात आलेल्या एक्स्प्रेस गाड्यांमध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस-हटिया सुपर फास्ट द्वि-साप्ताहिक एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस-विशाखापट्टणम सुपर फास्ट साप्ताहिक एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस-पुरी सुपर फास्ट साप्ताहिक एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस-भुवनेश्वर द्वि-साप्ताहिक एक्स्प्रेस, छत्रपती



शिवाजी महाराज टर्मिनस-हावडा गीतांजली एक्स्प्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हावडा साप्ताहिक सुपर फास्ट एक्सप्रेस, पुणे-संत्रागाची-पुणे साप्ताहिक हमसफर एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस-कामाख्या कर्मभूमी साप्ताहिक एक्स्प्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- हावडा दुरांतो, गोंदिया-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विदर्भ एक्स्प्रेस, नागपूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दुरांतो, लोकमान्य टिळक टर्मिनस-शालिमार टर्मिनस ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक टर्मिनस-पुरी टर्मिनस साप्ताहिक एक्स्प्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हावडा टर्मिनस सुपर फास्ट, आणि लोकमान्य टिळक टर्मिनस-शालिमार समरसता द्विसाप्ताहिक एक्स्प्रेसचा त्यात समावेश आहे.




# चंद्रपूर जिल्ह्यात बनावट दारूचे तस्कर सक्रिय


आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वरोरा शहरात बनावट मद्य तयार करणाऱ्या दोन आरोपींस अटक करण्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाला यश आले आहे. अनिलसिंग अजबसिंग जुनी ऊर्फ पिंटू सरदार व आशीष पुरुषोत्तम मडावी, असे अटकेतील आरोपींचे नाव आहे. गुप्त माहितीच्या आधारे २४ नोव्हेंबरला पहाटेच्या वेळी आनंदवन चौक वरोरा येथे आरोपींना वाहनासह ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून ९० मिलीच्या ६०० देशी मद्याच्या बनावट बाटल्या असा एकूण १ लक्ष १६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे वरोरा तालुक्यातील बनावट देशी मद्य विक्री करणारा मुख्य सूत्रधार पकडला गेला. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून न्यायालयात हजर केले असता आरोपीस तीन दिवसाची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. सदर कारवाई संजय पाटील यांच्या मार्गदर्शनात विकास थोरात, सचिन पोलेवार, दुय्यम निरीक्षक भगीरथ कुडमेथे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक जगदीश मस्के, जवान-नि-वाहनचालक विलास महाकुलकर यांनी पार पाडली.




महाराष्ट्र Business Katta









# नीती-निर्देशक तत्त्व, राज्यांचा आदर्श मापदंड



भीमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाचे प्रारूप पूर्णत्वास जाऊन ते भारतीय लोकांनी स्वतः प्रत अंगीकृत केले. २२ प्रकरणांमध्ये विभागलेल्या ३९५ अनुच्छेदांसह बारा परिशिष्टांचा हा दस्तऐवज २६ जानेवारी १९५० पासून राज्य व त्यांच्या संस्थांचे विधीनियमन करू लागला. भारतीय संविधान हा दस्त निर्जीव असला तरी, त्यामध्ये निहीत अधिनियमांन्वये पर्यावरणातील सजीव, निर्जीव झाडे-झुडपे, वेली, पशु-पक्षी, डोंगरदऱ्या तथा नदी-नाल्यांसह त्यातील गौण खनिजांची काळजी वाहण्या इतपत तो सक्षम आहे. एवढेच नव्हे तर त्याद्वारे देशातील काही एकाधिकारवादी, भांडवलवादी, मनुवादी, ब्राह्मणवादी लोकांच्या मुसक्या आवळून त्यांच्याद्वारे निर्मित काही काळे कायदे, जे मानवतेला काळीमा फासणारे व मानवी व्यक्तिमत्त्वाला न्यूनता आणणारे होते त्यांनाही टाच बसली.**

भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांच्या दोनशे वर्षांच्या गुलामगिरीतून बंधमुक्त झाला. त्या प्रदीर्घ कालावधीमध्ये इंग्रजांची पिळवणूक व मनुवाद्यांची छळवणूक यामुळे देशात मोठ्या प्रमाणात विषमतेसह अठराविश्व दारिद्र्य, पराकोटीची गरीबी, भुकमरी, धर्मांधता, जातीयता, अस्पृश्यता, आदिवासींचे अलगीकरण महिलांची गुलामी, अंधश्रद्धा,तथा अनेक समाजविघातक प्रथा, रुढीपरंपरा अस्तित्वात होत्या. या सांस्कृतिक आव्हानांनी प्रगतीच्या मार्गात सर्वात मोठा अडथळा निर्माण होणार होता.

या अडचणींना आणखी सोबत म्हणजे देशाचा विस्तीर्ण विस्तार, प्रचंड लोकसंख्या, १२ धर्म, ६ हजार जाती, ७५ हजार पोटजाती किंवा उपजाती, कित्येक भाषा, अनेक सण-उत्सव, रुढी-परंपरा, प्रत्येक भागातील भौगोलिक परिस्थितीनुरूप पीक-पाणी, खान-पान, राहणीमान, पेहराव, बोली-भाषा, आवडी-निवडी आणि आणि कितीतरी न सुटणाऱ्या समस्या. हे सर्व संविधान निर्मात्यांच्या ध्यानीमनी नव्हते असे नाही, त्यामुळे कल्याणकारी राज्याची निर्मिती हा त्यांच्यासमोर यक्षप्रश्न होता.

भारतीय संविधान हे इतर देशाच्या तुलनेत सर्वात मोठे असून विस्तारित व लिखित आहे. तरीही वैविध्यपूर्ण तथा विविधांगी घटकांच्या प्रत्येक अंगप्रत्यांगाला स्पर्श करण्यास ते असमर्थ ठरते. त्यातच बदलणारी परिस्थिती, प्रत्येक पिढीच्या समस्या, आवडी-निवडी, गरजा या काळानुरूप बदलत्या असून, परिस्थितीवर मात करण्यासाठी उदयोन्मुख असतात. म्हणूनच तर एका पिढीचे विचार दुसऱ्या पिढीवर लादता येत नाही. ही उदात्त भावना डोळ्यासमोर ठेवून अनुच्छेद ३६८ प्रमाणे संविधानामध्ये काही बदल करण्याची प्रक्रिया विकसित केलेली आहे.

स्वातंत्र्यपूर्व विपरीत परिस्थिती तथा विषमतापूर्ण समाजव्यवस्थेवर मात करून, सामाजिक आर्थिक न्यायाच्या दिशेने समानता तथा कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे. तसेच उदारव्यक्तिवादी आणि समाजवादी विचारधारांमध्ये संतुलन, संसाधनांचे समान वाटप, भांडवली व्यवस्थेला पूर्णपणे हटवण्याच्या दिशेने जेव्हा देशाची शासन व्यवस्था कायदे करेल तेव्हा त्यांना भारतीय संविधानातील निती-निर्देशक तथा मार्गदर्शक तत्वे आदर्श, मौलिक, दिशादर्शक व आधारभूत ठरतात.




भारतीय संविधानाने देशातील शासन-प्रशासन व्यवस्थेला कायदे करण्यासाठी संविधानातील भाग चार नुसार अनुच्छेद ३६ ते ५१ पर्यंत निती-निर्देशक तत्व बहाल केलेली आहेत. जी शासन-प्रशासनाचा आदर्श मापदंड ठरू शकतात. संविधानामध्ये समाविष्ट निती-निर्देशक तत्व ही आयर्लंड कडून तर त्यांनीही ती स्पेन कडून आत्मसात केल्याचे दिसून येते. तसेच १९३५ च्या इंडिया ऍक्ट मध्येही त्याची छवी दिसते.

भारतीय संविधानाचा उद्देश हा मानवी मुल्ल्याधारित व कल्याणकारी राज्य निर्माणाचा सहेतू आहे. त्यासाठी मार्गदर्शक तत्व हे महिलांचा दगड असून, त्यानुसार राज्यांना अनेक सकारात्मक तथा हितकारी निर्णय घेणास भाग पडत आहे.

राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार समान न्याय, कायदेशीर मोफत सहाय्य, ग्रामपंचायतीचे संघटन, काम व शिक्षणाच्या बाबतीत लोकसहाय्याचा हक्क, प्रसुती विषयक सहाय्य, कामगारांना निर्वाह वेतन, उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग, एक नागरी संहिता, बालकांकरिता मोफत व सक्तीचे शिक्षण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच दुर्बल घटकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन, नागरिकांचे आरोग्य, कृषी, पशु व पर्यावरण रक्षण व संवर्धन, राष्ट्रीय स्मारकाचे संरक्षण व संवर्धन, न्यायपालिकेची स्वायत्तता, आंतरराष्ट्रीय सहभाग व शांतता यांचे संवर्धन इत्यादी बाबींचा त्यामध्ये समावेश होतो.

थोडक्यात काय तर कायदे निर्मितीची ही आदर्श आचारसंहिता म्हटल्यास वावगे ठेवू नये. या नितीनियमांना डोळ्यासमोर ठेवून जर कायदे निर्मिती झाली तर देशातील प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार, आरोग्य, शिक्षण व शुद्ध हवा-पाणी यांची वानवा उरणार नाही.

मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणी संदर्भात अनुच्छेद ३७ कडे कटाक्ष टाकने गरजेचे आहे. त्यानुसार या तत्त्वांच्या अंमलबजावणीस्तव कोर्टात दाद मागता येत नाही. परंतु कोणताही कायदा करताना ही तत्त्वे लागू करणे हे राज्यांचे कर्तव्य असेल, असे त्यामध्ये नमूद असले तरी शासनप्रशासनात काम करणाऱ्या लोकांची इच्छा व विवेक याला ते आव्हान ठरते. त्या इच्छा तथा विवेकाला अनुसरून लोककल्याणार्थ अमलात आलेल्या काही कायद्यांचा इथे उहापोह करणे योग्य ठरेल. जसे अनुच्छेद ३९ ला अनुसरून जमीन सुधार कायदा व किमान वेतन कायदा अस्तित्वात आला. अनुच्छेद ४० ला पुष्ट करण्यासाठी १९९२ ला ७३ वे संविधान संशोधन करून गाव, तालुका व जिल्ह्याला पंचायत राज व्यवस्था निर्माण केली गेली. अनुच्छेद ४३ नुसार कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी काही बोर्डांची स्थापना करण्यात आली. अनुच्छेद ४५ ला अनुलक्षून २००९ मध्ये ८६ व्या सुधारणे अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करण्यात आला. तसेच त्यांच्या दुपार भोजणाची व्यवस्था करण्यात आली. अनुच्छेद ४७ नुसार ग्रामीण रोजगार हमी योजना अमलात आली. नागरिकांच्या आरोग्यासाठी प्रधानमंत्री स्वास्थ्य योजना ग्रामीण स्वास्थ्य योजना इत्यादी कायदे अमलात येऊन समाजातील गरीब श्रीमंतीची दरी दूर करण्यासाठी संसाधनांचे समान वाटप, स्त्री-पुरुष समानता, शिक्षण, आरोग्य, व्यवसाय व कुपोषण थांबवणे इत्यादी मध्ये क्रांतीच्या दिशेने हे पाऊल असल्याचे लक्षात येते. वरील सर्व कायद्याकडे पाहिले तर काहींची पूर्णपणे तर काहींची अंशतः अंमलबजावणी झाल्याचे लक्षात येईल. त्यामुळे हे पाऊल अपुरे असल्याचे सिद्ध होऊ शकते. तथापि विकसित आणि विकसनशील देशाच्या मानाने भारत खूप मागे असल्याचे दिसून येते. गेल्या काही वर्षात अनेक नकारात्मक बाबींनी उच्चांक गाठून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची पत घसरल्याची बोलले जाते. म्हणून शिक्षण व स्वास्थ्य यांच्यामध्ये क्रांतिकारी बदल व त्यांचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर बेरोजगारिने उच्चांक गाठलेला, आहे जागतिक भूकबळीच्या ११७ देशांच्या तालिकेमध्ये भारताने १०५ व्या स्थानावर मजल मारली आहे. लोकशाहीने वाटचाल करणाऱ्या देशांच्या यादीतील क्रमांकही काही समाधानकारक नाही. देश विकसनशील राहिला नसून, त्याने अविकसित देशांच्या यादीसोबत सहसंबंध प्रस्थापित केले आहेत. अशी एक ना अनेक उदाहरणे देता येतील. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या म्हणण्याप्रमाणे संविधान किती श्रेष्ठ आहे; यापेक्षा त्याला राबवणारे हात प्रामाणिक आहेत की अप्रमाणिक? यावरून त्याची श्रेष्ठता आकार घेते. जे हात संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे सामाजिक व आर्थिक न्यायाच्या दिशेने वाटचाल करून प्रामाणिकपणे, मानवीमूल्याधारीत व लोककल्याणकारी शासन निर्माण करत नसतील. ते हात वेळीच थांबवले पाहिजे. अन्यथा लोकशाहीसह संविधान व त्यांनी निर्मिलेल्या संस्था तथा सर्वसामान्यांचे जीवन उद्ध्वस्त होण्यास अवधी लागणार नाही!

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आधुनिक केसरी

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण २६ नोव्हेंबर रोजी देशाच्या सर्वोच्च न्यायालयात होणार आहे ही ऐतिहासिक घटना तमाम आंबेडकरी जनतेसाठी आणि आंबेडकरी अनुयायांसह सर्व भारतीयांसाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची आहे. जगामध्ये सर्वत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे आहेत. गावोगावी सुद्धा मोठ्या दिमाखात ते उभे आहेत. जनतेचे बाबासाहेबांबद्दलचे प्रेम आणि अभिमान याची साक्ष हे पुतळे देत असतात. मानवतेच्या महासागरांना आणि विश्वाच्या कानाकोपऱ्याला बाबासाहेब सतत महासूर्यागत प्रेरणा देत उभे असतात.**

याचवर्षी १४ एप्रिल २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला, अधिवक्ता-ऑन-रेकॉर्ड प्रतीक बोंबार्डे यांनी भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना निवेदन दिले होते, ज्यामध्ये त्यांनी सुप्रीम कोर्टात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्याची मागणी केली होती. ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनीही सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवण्याची मागणी केली होती. तसेच यावर्षीच्याच सप्टेंबरमध्ये सुप्रीम कोर्ट आर्ग्युइंग कौन्सेल असोसिएशननेही पुतळा बसवण्याची मागणी केली होती. एवढेच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात संविधानाच्या शिल्पकाराचा पुतळा बसवण्याची मागणी वकिलांनी यापूर्वी अनेकदा केली होती. खरे तर १९७० च्या दशकापासून ही मागणी होत होती. आता आंबेडकरवादी वकिलांच्या एका गटाने केलेल्या मागणीनंतर बाबासाहेबांचा पुतळा बसवण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे. १९७० च्या दशकात राजकारणी, समाजसेवक आणि आंबेडकरांचे अनुयायी असलेल्या दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी जनतेला बाबासाहेबांचा पुतळा संसदेत बसवण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्यानंतरची पुढील पाच दशकं हा संघर्ष या निमित्ताने सुरू राहिला, आणि जो आता पूर्णत्वास येत आहे, याचा प्रचंड आनंद होणे स्वाभाविक आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाच्या प्रांगणा घटनाकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्यात येणार आहे. २६ नोव्हेंबरला संविधान दिनी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुतळ्याचं लोकार्पण होत आहे. देशातील कोणत्याच न्यायालयाच्या प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा नाही. मात्र, आता थेट सर्वोच्च न्यायालयाच्या प्रांगणात पुतळा विराजमान होणार आहे. आपल्याच देशात म्हणजे हरियाणातील मानेसर इथं पुतळ्यांचं काम पूर्ण करण्यात आलेलं आहे. प्रसिद्ध शिल्पकार नरेश कुमावत यांनी या पुतळ्याचे शिल्प तयार केले आहे. ७ फूट उंचीच्या या पुतळ्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वकिलाचा पोशाख आणि हातात संविधानाची प्रत धारण केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात समोरच्या हिरवळीवर आणि बागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसविण्यात येत आहे. ब्रिटिश संसदेने भारताच्या स्वातंत्र्याचा ठराव १५ जुलै १९४७ रोजी स्वीकृत केल्यानंतर ३ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांची नावे जाहीर झाली. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कायदे व न्यायमंत्री म्हणून नियुक्ती होती. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान समितीचे अध्यक्ष आणि कायदा व न्याय मंत्री अशी दुहेरी जबाबदारी पार पाडत होते. १५ ऑगस्टला देश स्वतंत्र झाल्यावर पंतप्रधान नेहरूंच्या नेतृत्वाखाली सप्टेंबर १९४७ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले



कायदेमंत्री म्हणून डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी पदाची शपथ घेतली होती. बाबासाहेबांनी सप्टेंबर १९४७ ते ऑक्टोबर १९५१ दरम्यान या पदावर कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय बहुआयामी विद्वान आणि तत्त्वज्ञ होते. ते न्यायशास्त्रज्ञ म्हणजेच कायदेतज्ज्ञ, समाजसुधारक, लेखक, अर्थतज्ज्ञ आणि राजकीय नेते होते. त्यांनी संविधान सभेतील मसुदा समितीचे नेतृत्व करून भारतीय संविधान निर्माण केले. त्यांनी पहिले केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री तसेच राज्यसभेचे सदस्य म्हणूनही काम केले. हिंदू धर्माचा त्याग केल्यानंतर दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली. त्यांना १९९० मध्ये मरणोत्तर 'भारतरत्न' हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला होता. सुप्रीम कोर्टात बाबासाहेबांचा पुतळा स्थापन होणे ही अत्यंत महत्त्वाची आणि समस्त भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. आधुनिक भारताच्या शिल्पकाराचा हा एक राष्ट्रीय गौरव आहे. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही की, संविधान दिनी २६ नोव्हेंबरलाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा १२५ फूट उंच पुतळा आंध्र प्रदेशच्या विजयवाडा शहरामध्ये स्थापन होत आहे. हा पुतळा जगातील सर्वात उंच बाबासाहेबांचा पुतळा असेल तसेच भारतातील सर्वात उंच पुतळ्यांमध्ये चौथ्या क्रमांकावर असेल. जुन्या संसद भवन परिसरामध्ये सुद्धा बाबासाहेबांचा भव्य पुतळा उभा आहे. यासोबतच नवीन संसद भवनामध्ये सुद्धा वल्लभभाई पटेल यांच्यासोबत बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य भित्तीचित्र साकारण्यात आले आहे. दिल्लीमध्ये बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक पुतळे स्थापन करण्यात आले आहेत. परंतु या पुतळ्यांमध्ये संसदेतील पुतळा आणि सर्वोच्च न्यायालयातील पुतळा विशेष असणार आहे, हे निश्चित. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतातील कोट्यवधी उपेक्षित लोकांचे मुक्तिदाता म्हणूनच नव्हे तर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणूनही आदरणीय आहेत. भारताच्या जडणघडणीत बाबासाहेबांचे योगदान अनमोल असे आहे. राष्ट्राची ही संकल्पना विकसित होण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मदत झाली. पण 'राष्ट्रीयत्वा'ची भावना आपल्या देशात ती पूर्ण झालेली नसल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले होते. स्वतःस राष्ट्र म्हणविणाऱ्या सर्व लोकांचा संवाद, सहभाग आणि भागीदारी यांतून आलेली सामाजिक एकोप्याची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व.' राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे, हे सामाजिक जीवनात समता आणि बंधुता किती आहे, यावर ठरते. देशात आर्थिक व सामाजिक पातळ्यांवर मोठी विषमता असताना आणि अलिकडच्या काळात आंतर-जातीय, वांशिक आणि धर्मीय तणाव वाढत असताना 'राष्ट्र' विकसित होण्यासाठी आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्यक्षात दिसण्यासाठी आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून शिकवण घेतली पाहिजे. 'एक व्यक्ती एक मूल्य' किंवा सर्वांना समान मूल्य, हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. राजकीय लोकशाहीत 'एक व्यक्ती एक मत' या नियमाने हे तत्त्व आचारणात आणले जाते. पण राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक पातळ्यांवरही सर्वांना समता आणि स्वातंत्र्य हवे. 'सामाजिक आणि आर्थिक लोकशाही हे राजकीय लोकशाहीच्या पेशी आणि तंतूंसारखे आहेत' असे त्यांचे मत होते. परंतु जातिव्यवस्थेमुळे एकतर सामाजिक आणि त्यामुळे आर्थिक लोकशाही नाकारली जाते आणि राजकीय लोकशाहीचे स्वरूप जातीय किंवा जाती-आधारित बनते. म्हणून राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा, सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर भर होता. त्याचप्रमाणे लोकशाही बळकट करण्यासाठी अहिंसक मार्गाचा वापर ही त्यांनी पूर्वअट मानली होती. 'कोणत्याही रक्तपाताविना क्रांतिकारक बदल घडवून आणणारी शासनपद्धती म्हणजे लोकशाही', असे बाबासाहेब म्हणतात. परंतु आज जातीनिहाय जमावाचा हिंसाचार वाढत असताना त्यांची शिकवण साऱ्यांनी घ्यावी, अशी वेळ आली आहे. अशा या महामानवाचे जगभरातून लक्षावधी पुतळे आणि स्मारके उभारण्यात आलेली आहेत. भारतात सर्वात जास्त पुतळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. हे पुतळे वेगवेगळ्या स्वरूपाचे आहेत आणि त्यांना त्यांचे विशेष महत्त्व सुद्धा आहे. तीन वेगवेगळ्या भारतीय राज्यांमध्ये बाबासाहेबांचे हे विशाल पुतळे आहेत, ज्यापैकी दोघांचे काम पूर्ण झाले आहे तर एकाचे काम अजून चालू आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आतापर्यंतचे सर्वात उंच पुतळे आहेत. काम चालू असलेला पुतळा जेव्हा २०२६ मध्ये पूर्ण होईल, तेव्हा तो जगातील पहिल्या ५ सर्वाधिक उंचीच्या पुतळ्यांमध्ये स्थान प्राप्त करेल. समाजामध्ये बाबासाहेबांच्या पुतळ्याबाबत साधारणतः दोन प्रवाह आहेत. निव्वळ पुतळे उभारुन काही होणार नाही तर त्याऐवजी ग्रंथालये आणि रुग्णालये उभारली पाहिजेत, असा एक प्रवाह आहे. तर दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य लोकांनी पुतळे बसवूनच येणाऱ्या पिढीला शिक्षण घेण्याची, संघटित होण्याची आणि हक्क अधिकारांसाठी लढण्याची प्रेरणा दिली. आजपर्यंत बाबासाहेब पुतळ्यांच्या स्वरूपात सतत आमच्या पाठीशी उभे राहिले. शाळा, महाविद्यालये, विद्यापिठे, ग्रंथालये किंवा रुग्णालये उभारलीच पाहिजेत पण त्यासमोर बाबासाहेबांचा भव्य पुतळा हवा, असा एक मतप्रवाह आहे. खरं तर फार पूर्वीच हे व्हायला हवे होते. आता बाबासाहेबांच्या साक्षीने राज्यघटनेवर चालणाऱ्या सर्वोच्च न्यायालयात न्यायनिवाडा होत राहील ही बाब कोण आनंद देणारी आहे!

प्रज्ञाधर ढवळे, नांदेड.
मो. ९८९०२४७९५३

# आपले संविधान!आपला अभिमान!

आधुनिक केसरी

**आज संविधान दिन २६ नोव्हेंबर १९४९ ला आपल्या भारताची राज्यघटना लिहून पूर्ण झाली आणि त्याची अंमबजावणी ही २६ जानेवारी १९५० रोजी सुरू झाली. आणि खऱ्या अर्थाने प्रजेची सत्ता अमलात आली, म्हणुन आपण शाळा, महाविद्यालयात आपण या दिनानिमित्त प्रजासत्ताक दिन साजरा करतो, या घटनानिर्मिती साठी खूप भटकंती करावी लागली, म्हणजेच एकंदरीत ६० देशांच्या घटनेचा अभ्यास करुन भारताची राज्यघटना लिहिण्यात आली. व ६४ लाख रुपये या साठी खर्च झाला होता,दुसरी महत्त्वाची बाजु म्हणजे या घटना निर्मिती साठी २ वर्ष ११महिने १८ दिवस इतका कालावधी लागला.**

आपल्या भारताला जगातील सर्वात मोठी राज्यघटना लाभली. भारताच्या राज्यघटनेच्या वैशिष्टये याचा विचार केला असता तळागाळतील व्यक्ती पासून ते राष्ट्रपती व प्रधानमंत्री पदा पर्यंत सर्वांना न्याय देणारी घटना आहे. परुंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटना स्वीकृतीच्या वेळी त्यांनी काढलेले विधान सर्वात महत्वाचे ठरते, ते म्हणजे "संविधान कितीही चांगले असले तरी, त्यांला चालवणाऱ्या व्यक्ती  जर खराब असतील तर संविधान शेवट पर्यंत चांगले राहू शकत नाही, व जर व्यक्ती चांगल्या असल्या तर संविधान शेवटपर्यंत चांगले ठरेल. असे उद्गार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काढले. होते, त्या विधानाचा अमल चांगल्या पद्धतीने झाला. तर निशचितपणे भारताची राज्यघटना चांगलीं ठरेल. व आपले संविधान! आपला अभिमान! ठरेल. आपल्या भारताच्या संविधानाचा विचार केला असता, भारतीय संविधानातील मुलभूत हक्क कलम १२ ते ३५ मध्ये दिलेले आहेत, व कलम ३५ ते ५१ मुलभूत कर्तव्य दिलेली आहेत. या कर्तव्याचे पालन करणे म्हणजे आपल्या संविधानाचा आदर करण्यासारखे आहे. आणि सगळ्यात मोठी तरतूद भारतीय राज्यघटनेमध्ये केलेली आपल्याला दिसून येते ती म्हणजे भारतीय संविधानानुसार जर एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कावरती गदा येत असेल तर प्रत्येक व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयामध्ये दाद मागण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेच्या कलम 32 नुसार दिलेला आहे म्हणजेच भारतीय संविधानातील कलम 32 नुसार आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करू शकतो ही सगळ्यात मोठी तरतूद मूलभूत हक्क संबंधित केलेले आपल्याला दिसून येते म्हणून मला माझ्या भारतीय राज्यघटनेचा अभिमान वाटतो त्याचबरोबर कलम १४ कायद्यापुढे समानता भारतीय संविधानातील या कलमानुसार झोपडीत राहणारा गरीब व देशाचा राष्ट्रपती हा कायद्यासमोर समान असतो. म्हणजेच कायदा हा सर्वांसाठी समान भारतीय राज्यघटनेमध्ये दिलेला आहे तसे पाहायला गेले तर कायद्याच्या बाजूचा विचार केला असता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की १०० गुन्हेगार सुटले तरी चालतील परंतु एका निराप्राराध व्यक्तिला सजा झाली नाही पाहिजे. अशा पद्धतीचे संविधान आपल्या भारत देशाला लाभले आहे म्हणून मला माझ्या भारतीय संविधानाचा अभिमान वाटतो. आदर वाटतो दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय संविधानातील कलम १५ या कलमावर ती "आर्टिकल फिफ्टीन" असा एक मध्यंतरी चित्रपट सुद्धा आला, म्हणजेच एका कलमावरती एक चित्रपट बनू शकतो. यातूनच आपल्या भारतीय राज्यघटनेची व्यापकता आपल्याला जाणवते आणि विशेष करून कलम १५ चां विचार केला असता धर्म ,वंश, जात ,लिंग,भेद या कुठल्याही कारणावरून व्यक्तीला पदावरून दूर केले असता, संबंधित व्यक्तीवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल होतो. व ती व्यक्ती गुन्ह्यास पात्र ठरते. अशा पद्धतीची तरतूद भारतीय संविधानातील या कलमांमध्ये केलेले दिसून येते, म्हणून भारताची राज्यघटना ही एक सामाजिकभान जपणारी राज्यघटना आहे .खऱ्या अर्थाने विचार केला असता आपल्या भारतीय संविधानाकडे लोकशाही शासन प्रणाली म्हणून बघितलं गेलं आहे. त्या व्यतिरिक्त लोकशाही समाज प्रणाली म्हणून या भारतीय संविधानाकडे बघितले गेले पाहिजे,. तरच आपल्या संविधानाचा आदर ठेवण्यासारखे आहे. आपल्या मूळ संविधानाचा विचार केला असता, या मुळ भारतीय राज्यघटनेमध्ये सुरवातीला



३९५ कलमे,८ परिशिष्ट, २२ विभाग होते. या सर्व कलमांचा विचार केला असता, भारताची राज्यघटना ही विस्तृत राज्यघटना असल्याचे जाणवते. त्याचबरोबर सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे २० व्या भागात कलम ३६८ मध्ये दिलेली घटना दुरुस्तीची पद्धत त्यामूळे भारतीय संविधानात आपल्याला दुरूस्ती करता येते. परंतू घटना बदलता येतं नाही. आपल्या भारतीय राज्यघटनेचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे  न्यामंडळाचे स्वातंत्र्य. या न्यामंडळाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आर्थिक प्रलोभनाला न्यायलाय बळी पडू नये, म्हणून त्यांच्या सेवा, शर्ती,वेतन, भत्ता ,घटनेने ठरवून दिलेले आहे, जेणेकरून न्यायालय आर्थिक प्रलोबनाला बळी पडू नये, व योग्य व्यक्तीला योग्य व लवकरात लवकर न्याय मिळावा अशी तरतूद घटनेत केली आहे, म्हणुन भारताचे संविधान हे आदर्श संविधान ठरते, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकन या न्यायालयीन पुनर्विलोकनाचा विचार केला असता न्यायालयीन पुनर्विलोकन असे सांगते की कायदेमंडळाचा कायदा किंवा शासनाचा आदेश हा घटनेची विसंगत आहे की सुसंगत आहे याची तपासणी करण्याचा अधिकार जर तो विसंगत असेल तर त्याला रद्दबातर ठरवण्याचा अधिकार म्हणजेच न्यायालयीन पुनर्विलोकन होय अशा पद्धतीची तरतूद कायदेमंडळाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी केलेली आपल्याला दिसून येते. भारतीय संविधानाची दुसरे महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे धर्मनिरपेक्षता या धर्मनिरपेक्षते मध्ये भारतातील विविधतेतील एकता जपण्याचा प्रयत्न या धर्मनिरपेक्षता या अटीमुळे होतो म्हणजेच भारतात वेगवेगळ्या पद्धतीचे धर्म आहेत तरीसुद्धा विविधतेत एकता दिसून येते म्हणून आपल्या भारतीय संविधानाचा अभिमान आपणास वाटतो. आणि लोकशाही शासन प्रणाली चां विचार केला असता, यामध्ये लोकांनी लोकांसाठी लोकांच्या हितासाठी चालवलेले शासन म्हणजे लोकशाही असा आपल्या लोकशाहीचा उपयोग संपूर्ण भारतामध्ये होतो त्यामुळे संपूर्ण जगातील इतर घटनेपेक्षा आपल्या भारताची राज्यघटना महत्वाची ठरते कारण या घटनेमध्ये कलम १९ नुसार बोलण्याचे स्वातंत्र्य आपल्याला दिलेले आहे. आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. म्हणुन आपल्या भारतीय संविधानाचा अभिमान वाटतो. आपल्या भारतीय संविधानाचा वापर खेड्यातील पारापासुन भारतातील राजकीय वर्तुळापर्यंत आपल्याला दिसून येतो. या व्यवस्थेला व्यवस्थित करण्याचे योगदान या संविधानाचे कायमस्वरूपी आपल्याला लाभले आहे. म्हणुन मला भारतीय संविधानाचा अभिमान, आदर, वाटतो. या सर्व बाबी विचारात घेता एक भारताचा कर्तव्यदक्ष नागरिक म्हणुन आपण आपल्या भारतीय संविधानाचा आदर करावा.

**प्रा. मगर बालाजी हरीभाऊ**
मो.नं. ९३२२९८८७९३
इतिहास विभाग, बाबुरावजी घोलप कॉलेज सांगवी, पुणे.

# आणि शब्द जेव्हा मुके होतात!

आधुनिक केसरी

**ती 26/11 ची  काळरात्र अजुनही मनःपटलावरून हटत नाही. जेवण झाल्यावर टिव्ही समोर काही मालिका बघत बसलो होतो. अचानक फटाकांच्या आवाजासारखे आवाज यायला लागले सुरूवातीला वाटले महानगरी मुंबापुरीत रोज काही ना काही कार्यकम होतच असतात त्या आनंदाक्षणी फटाक्याचे बार उडत असतील परंतु, काही क्षणातच त्याची तिव्रता भयावह वाटु लागल्याने टिव्हीवरच्या ब्रेकिंग न्यूज वर नजर गेली आणि मनात धस्स झाले. आनंदाची परिसिमा कधी पुसल्या गेली समजलेच नाही. उरल्यात फक्त भिती, दहशत व मृत्युचे तांडव करणारी थरारकता!  जीवन-मृत्युतली दरी काही क्षणाचीच.**

क्षणागणिक मनामध्ये काहुर उठत होते, संताप येत होता. काही नराधम नृसंशपणे बंदुकीच्या गोळयांनी निरपराध लोकांच्या देहाची चाळण करत होते. त्यात त्यांनी ना वृध्द पाहीले, ना महिला बघीतल्या, ना निरागस कोमल बालकांना बघीतले. एवढेच नव्हे तर 'शांतीदुत' समजल्या जाणा-या कबुतरांना गोळयांचे लक्ष केले. जनतेचे खरे संरक्षक पोलीसवाले या नराधमाशी  झुंज देता देता जिवाची पर्वा न करता धारातिर्थि पडत होते. जीवन हे सुंदर असतं हे आपण एखादया पुस्तकात वाचतो प्रत्यक्षात अनुभवतो  परंतु काही क्षणातच सुंदरतेच रूप परिधान केलेलं जीवन हया माथेफिरूच्या गोळयांनी जिर्ण-जिर्ण होत होतं. रक्ताच्या थारोळयात छिन्न विछिन्न देह, विव्हळणारे जखमी, प्रिय व्यक्तीच्या शोधात भरकटणारे स्वकीय, विमनस्क स्थितीत वावरणारे आप्तजण मनं गलबलून जात होतं.




जखमी अवस्थेत विव्हळणा-या लोकांना बघुन डोळयाच्या कडा आपसुक ओलावल्या होत्या. अचानक मन हेलावणारी बातमी आमच्या कानावर आली, हे नराधम  आमच्याच परिसरात घुसले होते व अंधाधुंद गोळीबार करीत होते तेव्हा खरोखरच काळजाचा थर्रकाप उडाला. क्षणभर काहीच सुचेना. जीवन आणि मृत्यु यांच्यातला लपंडाव आम्ही अनुभवत होतो. साधारण चाळीस ते पंचेचाळीस मिनिटे चाललेला थरार आजही अंगावर काटा उभा करतो. प्रत्यक्षात अनुभवलेलं भयनाटय जेव्हा संपतं तेव्हा वास्तव समोर येतं. लाडक्या मुंबईवर काही माथेफिरूने हल्ला करून मुंबईला रक्तबंबाळ केले होते. सर्वसामान्य नागरीकांसह पोलीस सुध्दा छातीचा कोट करून शहीद झाले.नराधमांच्या बेछुट गोळीबारात कर्तव्यनिष्ठ व तल्लखबुध्दीचे पोलीस अधिकारी, शिपाई शहीद झाले. या हल्ल्यात ३४ परदेशी नागरिकांसह कमीतकमी १९७ जण ठार झाले, तर ८०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले होते.नराधमाशी झुंज देता देता मरण यावे ही महाराष्ट्राची तसेच देशाची फार मोठी हानी झाली होती. तुम्ही आमच्यासाठी, आपल्या लाडक्या मुंबईसाठी ढाल बनुन आलात तुमच्या जाण्याने आज देश पोरका झाला आहे. तुमचे ते शौर्य बघताना आपसुकच हात जोडले जातात. मुखातुन येणारे शब्द मुके होतात, साश्रू नयनांनी आपोआप सहवेदनाप्रकट होतात. बलिदान तुमचं वाया जाणार नाही...  तुमच्या स्मृती आजही ताज्या आहेत...  आणि राहतील... कायमच...! श्रद्धांजली वाहताना मनात एकच ध्यास असतो की,जगात चाललेल्या विध्वंसक कारवायाविरूध्द, हया भ्याड हल्याविरूध्दसर्व भारतीयांनी,जगानी कटीबध्द व्हायलाच हवं, सतर्कतेनं,  सावधानतेनं आणि एकजुटीनं लढायलाच हवं.२६ नोव्हेंबर २००८चा मुंबईवरील मुंबईच्या इतिहासातील महाभयंकर असा हल्ला झाला होता त्या घटनेला आज 15 वर्षे झालीत त्याची सह्रदयी आठवण आजही मनातून हटत नाही.

**वसंत राठोड, मुंबई.**

# प्रगल्भ चिंतनाचा ठेवा : 'आजची मराठी बालकविता'

आधुनिक केसरी

**अतिशय जिव्हाळ्याच्या आणि आवडीच्या बालसाहित्य सागरात मनसोक्त अवगाहन करून  तळातील रत्नराशी रसिकांना देण्याचा डॉ. सुरेश सावंतसरांचा प्रांजळपणा, निर्मळपणा सर्वपरिचित आहे. सातत्याने गुणवत्तापूर्ण लेखन करून त्यांनी बालसाहित्यात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. अर्धशतकी साहित्यकृती निर्माण करून सरांचा हा प्रवास शतकोत्सवाकडे घोडदौड करतो आहे. नुकताच त्यांचा 'आजची मराठी बालकविता' हा समीक्षाग्रंथ पुण्याच्या  संस्कृती प्रकाशनाने सिद्ध केला आहे. सदर ग्रंथात २४ लेख आहेत. बालसाहित्याचा सखोल अभ्यास, मनन व चिंतनातून या ग्रंथाची अद्वितीय अशी निर्मिती झाली आहे. प्रत्येक लेखात त्या कवितासंग्रहातील कवितेचे  सौंदर्य उलगडून दाखवले आहे. त्यामुळे वाचकाला कवितेचे आकलन अतिशय सुलभपणे होते.  डॉ. सावंत यांची अध्ययनशीलता आणि गुणग्राहकता लक्षवेधी आहे.**

**(मागील अंकावरून)** 'वीरभद्राने फुलविली आनंदाची फुलबाग' हा वीरभद्र मिरेवाड यांच्या 'आनंदाची फुलबाग' या कवितासंग्रहावरचा लेख उल्लेखनीय आहे. मिरेवाडांची कविता मुलांच्या मनाचा ठाव घेते. आजी-आजोबा आणि नातवांच्या नात्याचे महत्त्व  आणि संस्कारशील संदेश यातील कविता देतात. तसेच ही कविता शहरी  आणि ग्रामीण बालवाचकांनादेखील आपलीशी वाटेल, अशी आहे, असा गौरवपूर्ण उल्लेख या लेखात केलेला आहे.आनंद पपुलवाड हे मोजके पण, कसदार लेखन करणारे साहित्यिक असून त्यांचे 'सुंदर हे जग' या कवितासंग्रहावरचा लेखदेखील  महत्त्वाचा आहे. मुग्धाच्या कविता या कु. मुग्धा उमेश घेवरीकर हिच्या  कवितासंग्रहावरचा लेख वेगळ्या विश्वाची ओळख करून देतो. 'जीवनभाष्य करणाऱ्या मुग्धाच्या कविता' या लेखात ग. ह. पाटील यांनी बालपणात कवितालेखन करून पुढे मोठे कवी झाल्याचे सुंदर उदाहरण दिले आहे.  मुग्धादेखील पुढे फार मोठी कवयित्री होईल, हा आशावाद या लेखामध्ये ठळक होतो. 'हिंगोली जिल्ह्यातील प्रतिभेचे नवे क्षितिज' हा बबन शिंदे यांच्या 'नामदेवाची लेकरं' ह्या संपादित पुस्तकाविषयीचा लेख आहे. या प्रयोगशील लेखकाने भावी पिढीतील प्रतिभावान कवी पारखून ३५ बालकवींच्या कविता या पुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. अतिशय कौतुकास्पद उपक्रम केल्याबद्दल लेखकाने त्यांचे  हार्दिक  अभिनंदन  केले आहे. अशा एकंदरीत २४ लेखांमधून निवडक  कवींच्या पुस्तकांवर लेखकाने अतिशय रसाळ आणि सुलभ भाषेत समीक्षा केलेली आहे. 'आजची मराठी बालकविता' हा समीक्षाग्रंथ सिद्ध करून मराठी बालसाहित्यात मोलाची भर घातली आहे.

**पुस्तक परिचय : नारायण खरात पाटील,**
**अंबड जि.जालना. पिन:४३१२०४ मो.नं: ९४०४६२६७८४**
**'आजची मराठी बालकविता' (समीक्षा)**
**लेखक : डॉ. सुरेश सावंत प्रकाशन: संस्कृती प्रकाशन, पुणे**
**मुखपृष्ठ: संतोष घोंगडे पृष्ठे:१२८ किंमत :२०० रु.**

**नारायण खरात, अंबड, जि. जालना.**



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# अरे गिळिले हो संसारे । काही तरि राखा खरे ।

आधुनिक केसरी

**संत तुकाराम महाराजांचा संसार आणि परमार्थ ह्या एकाचा नाण्याच्या दोन बाजू! अनेकांनी अनेक प्रकारची भक्ती आणि परमार्थ सांगितला, परंतु तूकोबांनी संसाराची फारकत घेऊन परमार्थ करण्याचा प्रयत्न करूनही त्यांना संसार सुटला नाही आणि तो सुटणे महाकठीण आहे! अगदी बोटावर मोजण्या एवढ्या लोकांना सर्वसंग परित्याग करून परमार्थ करता आला. बाकीचे भले भले संसाराच्या महापुरात वाहून गेले. परंतु त्यात सर्वच वारकरी संत संसार-परमार्थ याची सांगड घालण्यात यशस्वी झाले. ज्ञानदेवादी भावंडे, संत जनाबाई, संत कान्होपात्रा आदि आद्य संतांनी संसार केल्याचे कुठे संदर्भ नाहीत. बाकी नामदेवांपासून ते जगद्गुरू संत तुकोबांपर्यंत जवळपास सर्वच वारकरी संत हे संसारिक आढळतात. याचा परिणाम असा झाला की; सर्वसामान्य माणसांना हे सर्वच संत आपलेसे वाटतात. त्यांचे जीवन आणि अभंग लोकांना आपल्याच जीवनाशी निगडीत असलेले वाटतात.**

एवढेच काय अगदी भगवान बुद्धांनी सुद्धा आपला उभा संसार सोडून अनेक प्रश्नाच्या शोधार्थ प्रस्थान करत राहिले आणि शेवटी श्रमण होऊनच परतले! अशी क्रांती करणारा एखादाच महापुरुष असतो, त्यात भगवान बुद्ध आद्य आणि अग्रेसर ठरतात! याच जोडीने महानुभाव संप्रदायाच्या महात्मा चक्रधर स्वामींनी सुद्धा नैष्ठिक ब्रह्मचर्य आणि भ्रमंती यावरच भर देऊन आपल्या आचरणाने विचारांचा प्रचार-प्रसार केला. लिंगायत धर्माचे गुरुवर्य महात्मा बसवेश्वर मात्र संसारिक होते. संसारिक-असंसारीकांचे एवढे दाखले देण्याचे कारण म्हणजे वर्तमानात आपण सर्वजण संसारिक असून तिथेच राहून प्रत्येकाला आपला संसार (प्रपंच) आणि परमार्थ आनंदाने कसा घालवता येईल(?) याची सर्वच उत्तरे संत तुकाराम महाराजांच्या आजच्या निवडलेल्या अभंगात सापडतात. संसाराच्या होळीतून होरपळून निघालेल्या संत तुकोबाराय संसाराचा **अरे गिळिले हो संसारे । काही तरि राखा खरे । दिला करुणाकरे । मनुष्यदेह सत्संग ॥१॥**
**येथे न घली न घली आड । संचितसा शब्द नाड । उठाउठी गोड । बीजे बीज वाढवी ॥धृ॥**
**केले ते क्रियमाण । झाले ते संचित म्हण । प्रारब्ध जाण । उरवरीत उरले ते ॥२॥**
**चित्त खोटे चालीवरी । रोग भोगाचे अंतरी । रसना अनावरी । तुका म्हणे ढुंग वाहे॥३॥(अ.क्र. १२०९)**


**तुकारामनीती**
**भाग -७२**

असा संदर्भ देऊन सतराव्या शतकापासून ते आजतागायत संसारीकांना स्वानुभूतीने सावध करताना दिसतात.
अभंगाचा अर्थ अगदी सरळ आणि सोपा आहे. यातून तुकोबाराय आपल्याला मनुष्य देह ही एक अनमोल देणगी लाभली असून त्याद्वारे आपण आपल्याला हवे ते प्राप्त करू शकतो. माणसाला संसाराने गिळंकृत केले असून त्याच्या मागे पळता पळता सर्वांची अक्षरशः दमछाक होते. संसार म्हणजे "संसरति इति संसारः" संसार म्हणजे गतिशीलता, नियमितता. जन्माला येणे आणि मरेपर्यंत सतत कार्यरत राहणे म्हणजे संसार. ही गतिशीलता म्हणजेच माणसाचा जिवंतपणा. त्यासाठी नेहमीप्रमाणेच तुकोबाराय आपल्याला या अभंगात जागे करतात. आपल्याला संसार रोज एका एका दिवसाने गिळंकृत करत असतांना आपण मात्र सावध नाहीत. एक एक दिवस घालवताना आपण काय शिल्लक ठेवतो आहोत? त्यातील किती बरे आणि किती बुरे आहे? याचा लेखाजोखा आपण ठेवायला हवा. जे बरे आहे तेच खरे आहे. आपल्याला ईश्वराने म्हणजेच सृष्टीने दिलेला अनमोल नरदेह मोठ्या जबाबदारीने वापरला पाहिजे. नेहमी सत्याची कास धरावी. यातूनच आपले कल्याण साधणार आहे. शरीराच्या कल्याणापेक्षा मन, बुद्धी, विचाराद्वारे आत्मकल्याण करून जीवन सत्कारणी लावावे. सत्कर्म, सत्य, खऱ्या कर्मासाठी कोणतीही संसारिक बाब आड येता कामा नये. ज्याचं त्याचं संचित असे म्हणून माणसं सत्य कर्मापासून पळवाट काढतात. ही पळवाट चुकीची असून थोड्या थोड्याने सत्कर्म रुपी बीज वाढवत जावे. आपल्याला माहित असून जाणीवपूर्वक केलेल्या सत्कर्माला क्रियमाण कर्म म्हणतात. ते हळूहळू वाढवत जावे. तेच भविष्यात संचित कर्म होत असते. हे सत्कर्म म्हणजे बँकेत ठेवलेल्या ठेवी सारखे आहे. हळूहळू ते वाढायला हवे. असे सत्कर्म करणे सुरु असूनही जर संकटांची मालिका थांबत नसेल तर त्याला प्रारब्ध म्हणायचे. त्याद्वारे आपल्यावरील भूतकाळातील कुकर्माचे ओझे हलके होत असून वर्तमानातील संकटांमुळे मागील बचतीची वजाबाकी होत आहे. माणसाचे कर्म हे सावली सारखे सतत सोबत असते. त्यासाठी आत्तापर्यंत झाली नसेल तर आत्तापासून सत्कर्माची बचत करायला शिका, म्हणजे तुमच्या ठेवी वाढतील. जगद्गुरू तुकाराम महाराजांनी या अभंगाचा शेवटी माणसाच्या सर्वच कर्माची गोळाबेरीज केली आहे. तुकोबाराय हे माणसाच्या जीवनाचे उत्तम गणिती आहेत! स्वानुभवाचे आणि जनानुभावाचे मोठे गाठोडे त्यांच्या गाठीशी आहे. त्यातूनच ते माणसाचे चित्त खोट्या, वाईट गोष्टींकडे लवकर आकर्षित होते असे सांगतात. त्यासाठी त्याला आवर घालणे अत्यावश्यक आहे. वासना आणि रसना ह्या दोन्ही भयंकरच! या दोन्ही अनावर झाल्या की माणसाला अनंत विषारी व्याधी विळखा घालतात. त्यासाठी माणसाने या संसाररुपी अजगराला लवकर ओळखावे. एकएक दिवस आपण मृत्युच्या समीप जात असतांना सावध राहून प्रारब्धाचा स्विकार करून क्रियमाण-संचिताचे लवकरात लवकर नियोजन करावे. असे झाल्यास उतरत्या काळात आपल्यावर मागे पाहून पश्चाताप करण्याची वेळ येणार नाही!
जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे त्यांचे अभंग आणि त्यातूनच तावून सुलाखून निघालेले त्यांचे कीर्तन म्हणजे तुमच्या माझ्या हाती लागलेला अनमोल महाखजाना! आज स्वार्थासाठी माणूस कोणत्याही थराला जायला तयार असतांना दुसरीकडे आपल्या चिंतनाचे संपूर्ण बाड इंद्रायणीत बुडवल्या बद्दल तुकोबाराय तब्बल तेरा दिवस अन्न पाण्याविना इंद्रायणी नदी किनारी असणाऱ्या एका



दगडावर फक्त 'विठ्ठल विठ्ठल' नामस्मरण अनुष्ठान करतात. कुणाला बोलंत नाहीत, अन्न नाही, पाणी नाही, काही नाही! "आता हा मरणार" असे लोक चर्चा करतात. बायको, लेकरं भवताल येऊन आकांत करतात. तुकोबांना काही दिसत नाही, ऐकू येत नाही. त्यांच्या चित्तात केवळ आणि केवळ श्री विठ्ठल आणि बुडवलेल्या अभंगाच्या वह्या एवढेच आहे! तुकोबा डोळे बंद करून देवाशी संवाद साधतात. त्यांची कुणाकडेच आणि कुणाविषयी अजिबात तिळमात्र तक्रार नाही. एकुलत्या एक, लाडक्या लेकराच्या विरहाने आई-वडील सुद्धा असे अन्न पाणी त्यागणार नाहीत, परंतु त्याहीपेक्षा इथे जिव्हाळा आणखी खोल आहे! आत्तापर्यंतच्या इतिहासात आपल्या लेखन-विचारांवर एवढी प्राणांतिक निष्ठा कुठेच वाचायला अथवा ऐकायला मिळाली नाही आणि पुढे मिळणारही नाही! सातव्या आठव्या दिवशी इंद्रायणी तीरी त्या दगडावर निपचित पडलेल्या तुकोबांना 'मेलाय का जिवंत आहे?' हे पाहण्यासाठी लोक हात लावून पहायचे, जवळ कान लावून ऐकायचे; तेंव्हा, तुकोबांचा श्वास सुरु आणि अत्यंत क्षीण आवाजात "विठ्ठल विठ्ठल" सुरु होते. जिवंत आहे म्हणून सगळीकडे वार्ता जायची. भजन-अभंग-कीर्तनाने सर्वश्रुत झालेले तुकोबाराय पंचक्रोशीत सगळीकडे चर्चा आणि आणखीनच आस्था-जिव्हाळ्याचा विषय बनले! लोक तुकोबांसाठी आणि त्यांच्या वह्यासाठी प्रार्थना करू लागले. सगळीकडे एकच चर्चा आणि ती म्हणजे तुकोबांचे अनुष्ठान आणि बुडवलेल्या अभंग वह्या! तुकोबांच्या वह्या तरल्या! कोणताही चमत्कार जरी झाला नसला तरी सामान्य माणसांना मुखोद्गत असणारे हजारो अभंग लोकवाणीने तेरा दिवसानंतर अक्षरशः सामान्य जनमाणसात तरले. तुकोबांची कीर्ती दिगंतराला गेली! पुन्हा एकदा तुकोबाराय सर्वांच्या कळवळ्याचा विषय बनले!

माय-बाप वाचकहो, आपण सर्वांनी जीवनात एकदा तरी संत तुकोबांची गाथा वाचायलाच हवी. तुकोबांची गाथा हेच तुकोबांचे खडतर आत्मचरित्र आहे. त्यांचा एकएक अभंग त्यांच्या अनुभूतीचे अनमोल प्रकटीकरण आहे. तुकोबांचे जीवन ही एक अत्युच्च जीवन नीतीच आहे! त्यांच्या अभंगातील अनमोल विचार आणि त्यांचे आचरण म्हणजे आधुनिक काळातील दिव्यत्वच! त्यांची प्रार्थना आणि त्यांचे शब्द हे आपल्याला नित्य नित्य जागे करून जातात. आज आपण वर्षातील सर्वांत सुंदर आनंदोत्सव दीपावलीच्या माध्यमातून साजरा केला आहे. हे प्रकाश पर्व साजरे करतांना सद्विचारांचे आदान-प्रदान करणे काळाची गरज बनली आहे. क्षणा क्षणाला भोवताल बदलत असून त्याचा सर्वांवर खोलवर प्रभाव जाणवतो आहे. अशा कठीण काळात आपण आपल्या विचार, कृती आणि शब्दांवर बारकाईने लक्ष ठेवून त्यांचा आवश्यक तेवढाच वापर करायला हवा! त्यासाठी अन्य विचारांचा उहापोह करण्याऐवजीसंत तुकोबांच्या गाथ्यातील एकातरी अभंगाचे जरूर चिंतन करावे. असे झाल्यास आपले भरकटणारे मन आणि विचार एका विषयावर स्थिर होतील. विचारांचे स्थैर्य म्हणजेच मनाचे स्थेर्य! मनाचे स्थैर्य म्हणजेच जीवनाचे स्थैर्य! ज्यासाठी आपल्या सर्वांची अहोरात्र धडपड असते ती धडपड, तळमळ तुकोबांच्या एका अभंगाने स्थिरावू शकते! एवढी अलौकिक शक्ती असणारे, भक्ती रसाने ओतप्रोत असलेले तुकोबांचे अभंग आपल्या सर्वांना आनंदी, निरोगी, सुखी, समाधानी, शांत करतील! असे होणे म्हणजेच खरी दिवाळी संपन्न होणे होय! हेच तर तुकोबांच्या अभंगांचे गुपीत आणि त्यांच्या अभंगावरील या 'तुकाराम नीती' लेखन हमालीचे इंगित! जय तुकोबाराय!



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# 70 तास गाळा घाम..फक्त काम

आधुनिक केसरी

**हा सल्ला तरुण पिढीला दिलाय श्री नारायण मूर्ती यांनी! ते इन्फोसिसचे सर्वेसर्वा. त्यांनी आपल्या तरुण काळात हे केले. एव्हढी मोठी कंपनी उभारली. आधी स्वतः केले मग सांगितले हे या विधानाचे वैशिष्ट्य.. त्याच्या समर्थनार्थ आपले माननीय पंतप्रधान देखील २४*७ काम करतात, एकही सुटी घेत नाहीत, हे देखील जोडले जाऊ शकते. पण हे किती योग्य आहे, व्यवहार्य आहे हे तपासणे गरजेचे आहे. अमेरिके सारख्या देशात पाच दिवसाचा ठराविक तासाचा आठवडा अन् दोन दिवस सुटी, कुटुंबासोबत मजा हे सूत्र आहे.**

अमेरिकन कंपनीत काम करणारे भारतीय आय टी वाले इकडे सुटीच्या दिवशी देखील कॉल अन् ई मेल वर बिझी असतात.अन् पर्यायाने बायकोचा(नवऱ्याचा) रोष ओढवून घेतात!
प्रश्न कामाच्या तासाचा नाहीच मुळी..दिलेल्या ठराविक वेळेत तुम्ही किती प्रामाणिकपणे ,कसे काम करता हा खरा प्रश्न आहे. आपल्या कडे ब्यांक,सरकारी ऑफिस ,विद्यापीठ प्रशासन,इथले कामकाज बघा..तिथे दिलेले काम सोडून इतर काही चालते.. फायलीचे ढीग साचलेले. उद्या या, परवा या हे ठरलेले..खरे तर या बहुतेक ठिकाणी प्रत्येकाने आपले नेमून दिलेले काम वेळेवर प्रामाणिकपणे हाता वेगळे केले तर बराच फावला वेळ शिल्लक राहील.पण कामातील दिरंगाई, टाळाटाळ हेच यांचे घोष वाक्य असल्यामुळे वेळेवर काम,निर्णय होत नाही. ब्यंकेत आपण एफ डी काढायला जातो. म्हणजे खरे तर त्याच्यावर उपकार करीत असतो.. पैसे जमा करून! पण हे क्षुल्लक काम देखील अर्धा पाऊण तास वाया घातल्या शिवाय होत नाही! परदेशात पैसे विनिमयाचे काम दोन मिनिटात होते हे मी अनुभवले आहे. आपल्याकडे वृद्ध मंडळींना देखील ताटकळत ठेवतात. त्रास देतात.. खूप आधी आलेला अनुपम खेर चा सारांश आठवा. म्हणजे समजेल!
७० तास काम याचा अर्थ दिवसाला १२ तास काम असा होतो.. शब्द जरा कठोर वाटेल.पण १२ तास का याला हमाली म्हणतात. कारण एव्हढा वेळ काम करण्या इतके ज्ञान,कौशल्य, योग्यता प्रत्येकात आहे का ,हा प्रश्न जास्त महत्वाचा..एरवी तुम्ही इतके तास काय करणार,टाईम पास कसा करणार, हाही प्रश्नच आहे.शिवाय यामुळे वाढणारा मानसिक ताण, घरी वेळ देऊ शकत नसल्याने कुटुंबाची नाराजी,त्याच्या तक्रारी या समस्या वेगळ्या असतात. मुलं मोठी असताना त्यांना वेळ देणे, त्यांच्या प्रगतीत,अभ्यासात लक्ष घालणे, त्यांना फिरायला घेऊन जाणे,या सर्व गोष्टी जगण्याच्या दृष्टीने तितक्याच महत्वाच्या असतात. एरवी कौटुंबिक स्वास्थ्य बिघडले, घरात वाद, कटकटी सुरू झाल्या की तुम्ही करियर क्षेत्रात कितीही प्रगती करा, कितीही पैसा मिळवा,कशाला काही अर्थ नसतो.कारण एकदा मन स्वास्थ्य बिघडले, कुटुंबाची गाडी रुळावरून घसरली की सावरणे कठीण होऊन बसते..
जगणे म्हणजे फक्त पोटासाठी काम नव्हे. अन् तसे पाहिले माणसाच्या पोटा पाण्याच्या अन् इतर मूलभूत गरजा मुळातच कमी असतात.पण आजच्या चंचल वादी, मेटरियालिस्टीक जगात हे घेऊ का ते घेऊ अशी हावरट वृत्ती वाढीला लागली आहे.



शिवाय आपापसात स्पर्धा आहे.. तंत्रज्ञानाने माणसाला आळशी बनवले आहे..साहजिकच आपले खर्च वाढले आहे. ज्याची गरज नाही तेही केवळ बाजारात उपलब्ध आहे म्हणून खरेदी करण्या कडे कल वाढला आहे. ई कॉमर्स, ऑन लाईन शॉपिंग याची (दारू सारखी) नशा आहे.त्यासाठी अधिकाधिक पैसा हवा आहे. गरज नसताना मुलांना महागड्या शिकवण्या ,क्लासेस लावायचे, सो कॉल्ड इंटरन्याशनल (प्राथमिक वर्गाची फी लाखात,अन् इंजिनियरिंग मेडिकलची फी तितकीच!) स्कूल मध्ये प्रवेश, मग परदेशी उच्च शिक्षणासाठी पाठवण, या साऱ्याला पैसा लागतोच.. शिवाय पार्ट्या, लग्न सोहळे, आउटिंग हे लाखोतले खर्च वेगळे.. यासाठी पैसा हवा..जास्तीत जास्त तास काम करायला हवे.. कमवायला हवे. हे सारे कशाच्या बदल्यात?
तर स्वतःच्या कुटुंबाला दुखवून.स्वतःच्या आवडी निवडी, छंद, त्यातला आनंद बाजूला ठेऊन!खरेच घरातले सारे सुखी होतात का तुमच्या बारा तास काम केल्याने? तुमच्या वार्षिक वीस पंचवीस लाखा च्या प्याकेज ने? मुळीच नाही.. घटस्फोट वाढले आहेत.घरातली भांडणे वाढली आहेत..मानसिक ताण, त्यापोटी आत्महत्या, निराशा.. आजार.. वृद्धा चे प्रश्न..सारे सारे वाढले आहे.. शारीरिक आजारासाठी डॉकटर आहे.पण मानसिक आजाराचे काय? सायकियाट्रीस्टिक कडे जायला लोक घाबरतात! थोडक्यात आठवड्याला ७० तास काम करायचे की ५० तास हे तितके महत्वाचे नाहीच. तुम्ही दिलेले,तुम्हाला करायचे काम कसे, कोणत्या पद्धतीने करता, त्यात सृजनता किती,नाविन्य किती, कुणाला लाभ किती हे सारे महत्वाचे असते.स्वतःची जबाबदारी ओळखणे, त्याप्रमाणे वागणे जास्त महत्वाचे असते. कुणालाही दिलेले काम, प्रोजेक्ट, जबाबदारी याचा नीट अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल की हे दिलेले काम व्यवस्थित, वेळेच्या आत, करून देखील आपल्याकडे भरपूर वेळ शिल्लक राहतो. हा माझा अनुभव आहे. प्रत्येक जण म्हणतो मी बिझी आहे! लेझी, आळशी माणूस बिझी असतो! कामात तत्पर, प्रामाणिक, योजना बद्घ आखणी करणारा माणूस शांत असतो. त्याला तुमचे एकायला, प्रश्न सोडवायला वेळ असतो. तो कधी वैतागलेला नसतो. उलट ज्याच्या टेबल वर फायलीचा ढीग आहे, ज्याच्याकडे खूप पेंडींग प्रोजेक्टचे काम आहे, ज्याला काय करावे , कसे करावे हे कळते, तो कधीही वैतागलेला नसेल. गोंधळलेला नसेल.. तणावग्रस्त नसेल..
आपण जे काम करतो ते एकट्याचे काम नसते. ते परस्परावलंबी असते. म्हणजे आपण कुणावर तरी अवलंबून असतो. कुणीतरी आपल्या कामावर अवलंबून असते. या चेन मध्ये एखादी साखळी जरी तुटली तरी सगळा डोलारा ढासळतो.. म्हणून टीम वर्क महत्वाचे असते. एकमेकाशी बोलणे वागणे, समजून घेणे महत्वाचे असते.आपल्या हलगर्जी पणाने अनेकांचे नुकसान होत असते. कामात ही जाणीव महत्वाची असते.. कामाला ओझे समजू नये.. शिक्षकाच्या कामाला टीचींग लोड संबोधले जाते. मी प्रशासनात असताना हा शब्दच प्रयोगातून बाद केला होता! टीचिंग, शिकवणे हे ओझे कसे असू शकते? तो तर निखळ आनंद असतो..असायला हवा..
कुणी किती तास काम केले हे मोजण्या पेक्षा उपलब्ध वेळात कामाच्या जागी किती सृजनशील योगदान दिले, त्याने कुणाचा किती, कसा फायदा झाला हे जास्त महत्वाचे..

# इस्रायलचा तिसरा डोळा : 'मोसाद'



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**इस्रायलवर हमासने केलेल्या अकस्मात हल्ल्याने खुद्द इस्रायलची जशी झोप उडाली तशी संबंध जगाची दबदबा असलेल्या मोसाद या इस्रायलच्या गुप्तचर संघटनेच्या क्षमताबाबत शंका वाटू लागली. पण खरे तर मोसादच्या यशापयशाचे मूल्यमापन करताना या संघटनेच्या क्षमताकडे दुर्लक्ष करता कामा नये. संबंध जगातील पहिल्या क्रमांकाची गुप्तचर यंत्रणा म्हणून मोसादने नावलौकिक मिळविला आहे. गेल्या ७५ वर्षांतील मोसादची वाटचाल पाहता या संघटनेच्या कामगिरीचा आलेख डोळ्यासमोर येतो. तो तिच्या रचना आणि पद्धतशीर कामगिरीमुळे. इस्रायलचे प्रगत लष्कर, भक्कम सरकार या बरोबरच त्या राष्ट्राची जीवनरेखा असलेली मोसाद ही संघटना म्हणजे इस्रायलचा तिसरा डोळा होय.**

या संघटनेच्या कार्याची ओळख करून घेताना तिच्या नावापासून कामापर्यंतचा आढावा घ्यावा लागेल.

मोसाद या संघटनेचा हिब्रू भाषेतील शब्दाचा अर्थ असा होतो की, गुप्तचर आणि अन्य विशेष मोहिमा चालविणारी राष्ट्रीय संस्था इंग्रजीमध्ये तिचे नामांतर इन्स्टिट्यूट फॉर इंटेलिजन्स ॲण्ड स्पेशल ऑपरेशन्स असे केले जाते. मोसाद हा ज्यू लोकांच्या हिब्रू भाषेतील एक छोटासा शब्द होय. परंतु अत्यंत गोपनीय पद्धतीने शत्रूंच्या गोटात शिरून माहिती गोळा करणे, गुप्त कारवाया करणे आणि दहशतवाद विरोधी कार्यासाठी अत्यंत जबाबदारीने पावले टाकणे हे या संघटनेचे अंगभूत कार्य आहे. या संघटनेचे संचालक अन्य कोणाला नव्हे तर थेट इस्रायलच्या पंतप्रधानांना जोडलेले असतात. त्यांचे उत्तरदायित्व, कर्तव्य हे पंतप्रधानांशी निगडीत असते. देशाच्या हित व सुरक्षेविषयी अत्यंत सक्षमतेने काम करणाNया या संघटनेला त्यामुळे इस्रायलची जीवनरेखा असे म्हणणे यथार्थ ठरेल. मोसादच्या रचना व कार्य पद्धतीमध्ये कमालीची गुप्तता पाळली जाते. तसेच संकलित माहिती केवळ देश हितासाठी वापरली जाते. मोसादच्या मुक्त कृती योजनांची यादी अभ्यासली असता या संघटनेने जोखीम पत्करून एकापेक्षा अधिक मोहिमा यशस्वी केल्याचे दिसून येते. बुद्धीमत्ता, चातुर्य आणि गोपनीयता याचा सुरेख संगम म्हणजे मोसादचे कार्य होय. मोसादच्या कार्यप्रणालीचा राष्ट्रीय सुरक्षा आणि आपल्या राष्ट्राचे हित हा प्रमुख प्राधान्यक्रम आहे. इनसायक्लोपीडिया, ब्रिटानिकामध्ये या संघटनेच्या कार्याचा गाभा स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, ही संघटना संरक्षण व गुप्तचर मोहिमामध्ये उच्च, व्यावसायिक दर्जा व सक्षमता यांना प्राधान्य देते. तिच्या उभारणीचे श्रेय संस्थेचे पहिले संचालक शिलीह यांना देण्यात येते. १९६० मध्ये या संघटनेने आपल्या नैपुण्य आणि आत्मविश्वासाचा पहिला प्रत्यय आणून दिला.

**मोसादची प्रारंभिक वाटचाल**

मोसाद या संघटनेने इस्रायलच्या स्थापनेपासून म्हणजे १९४८ पासून पहिल्या २५ वर्षांतील कार्याचा आढावा घेतला असता असे दिसते की, या संघटनेने आपल्या प्रारंभिक वाटचालीत अनेक महत्त्वाचे पायंडे पाडले. तसेच आदर्श कार्यपद्धतीची चौकट निर्माण केली. पहिले संचालक शिलीह १९५२ मध्ये निवृत्त झाले आणि त्यांची जागा हॅरील यांनी घेतली. हॅरील यांनी अगोदर शिन बेट या प्रकल्पाचे प्रमुख म्हणून काम केले होते. मोसादला ११ वर्षांच्या कार्यकाळात १९५२ ते १९६३ या कालावधीत जगभरातील अनेक मोहीमा करण्यास सक्षम पावले टाकली. उच्च दर्जाच्या व्यावसायिक कार्यात त्यांनी उंची गाठली. मोसादने अनेक अरब आणि इस्लामी राष्ट्रांमध्ये आपल्या कार्यपद्धतीचा जबरदस्त ठसा उमटविला. त्यांनी काही महत्त्वाच्या दोन तीन मोहिमा यशस्वीपणे राबवून शत्रूंवर आणि परदेशात राहणाNया नाझी युद्ध गुन्हेगारांवर जबरदस्त यशस्वी कामगिरी पार पाडली. १९७२ साली म्युनिक ऑलिंपिक क्रीडा उत्सवाच्या वेळी इस्रायली खेळाडूंचे हत्याकांड युरोप, मध्यपूर्व आणि उत्तर आप्रि*केतील पॅलिस्टेनी नेत्यांच्या हत्या करण्यात मोसाद या



संघटनेने आपली चतुराई सिद्ध केली. आंतरराष्ट्रीय पातळीवर हेरगिरी, गुप्त मोहिमा एजंट आणि प्रतिनिधींद्वारे सायबर हेरगिरी या बाबतीत पहिल्या दशकातच या संघटनेने निर्णायक यश मिळविले. आरंभीच्या काळात या संघटनेने आपल्या बुद्धिमत्तेचा स्थर नेहमीच उच्चा दर्जाचा ठेवला आणि संघटनेचा स्वभावही एक दर्जेदार व जबाबदार संघटना असा प्रस्थापित केला. लष्करी बुद्धिमत्ता आणि हेरगिरी, क्षेपणास्त्रांचा उपयोग याबरोबरच प्रगत तंत्रज्ञानाच्या विकासाबाबत बुद्धिमत्तेचे स्रोत विकसित करताना सांघिक कार्यपद्धतीने जाळे कसे तयार करावे, हे त्यांनी प्रस्थापित केले. हवाई मार्गाने संचार करून तसेच नभोवाणी संप्रेषण तंत्राचा उपयोग करून गुप्त क्रियाकल्पांचा विकास करण्यात या संघटनेने यश मिळविले. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत विविध हेर कार्यपद्धतींचा अभ्यास करून त्यांचे उपयोजन करण्यात अभूत यश मिळविले.

**आधुनिक काळातील तंत्राचा विकास**

पहिल्या २५ वर्षांत आपले स्थान प्रस्थापित केल्यानंतर राष्ट्रीय गुप्तचर प्रणाली दर्जेदार कार्य करण्यात संस्थेने पुढे दमदार पावले टाकली. २१ व्या शतकात अमेरिकेच्या सीआयए व रशियाच्या केजीबी या गुप्तचर यंत्रणांपेक्षाही आपला दर्जा अधिक अग्रेसर व श्रेष्ठ ठेवण्यामध्ये या संघटनेला यश आले. सोविएत रशियाचा पोलादी पडदा आणि त्यांची तंत्रे तसेच इंग्लड, प्र*ान्स, जर्मनी, चीन यांच्यापेक्षाही आपल्या कार्यपद्धती अधिक चांगल्या ठेवण्यात संघटनेला यश आले.

इस्रायलची गुप्तचर यंत्रणा म्हणून परराष्ट्र व्यवहारात देशहिताचे रक्षण करण्यामध्ये मोसादला अपूर्व यश आले. नाझी जर्मनीने ज्या चुका केल्या, त्या न करता मोसाद स्वतंत्रपणे वाटचाल करत राहिली आहे. तसेच क्युबा, इराक, इराण तसेच पाकिस्तान इत्यादी संघटनांपेक्षाही आपले वेगळेपण जपले आहे. तसेच समविचारी देश भारत, तैवान, दक्षिण कोरिया इत्यादींशी कठीण समयप्रसंगी मोसादने त्यांना साह्यही केले आहे. समान हितसंबंध व समान शत्रू यांचा विचार करता मोसादने आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक महत्त्वाच्या प्रसंगी विविध लोकशाही राष्ट्रांना दहशतवादाच्या विरोधात कारवाई करण्यास सहकार्य केले आहे.

**यशा-अपयशाचे मूल्यमापन**

हमासने इस्रायलवर ७ ऑक्टोंबर २०२३ रोजी रविवारी मध्यरात्री केलेल्या रॉकेट हल्ल्याचा व सीमा ओलांडून केलेल्या दहशतवादी हल्ल्याचा अंदाज मोसादला कसा आला नाही? म्हणून टीका करणाNया राजकीय पंडितांचे विश्लेषण अपुरे असे आहे. कारण मोसादने अशा हल्ल्याची पूर्वकल्पना इस्रायल सरकारला दिली होती. परंतु विभागलेल्या आणि गाफील राहिलेल्या राजकीय व्यवस्थेला भान नसल्यामुळे कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागले. पंतप्रधान बेन्जामिन नेत्यानोहू यांचे नेतृत्व बहुपक्षिय आघाडीचे आहे व ते विभागलेल्या जनमतांवर आधारलेले आहे. त्यांच्या गैर व्यवहारामुळे आणि न्यायालयीन सुधारणेतील गफलतीमुळे त्यांची लोकप्रियता घसरली व त्यांच्यावरचा विश्वास उडाला. सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या साठमारीमुळे देशहिताचा व सुरक्षेचा विसर पडला. त्यासाठी मोसादला जबाबदार धरणे गैरवाजवी ठरते. या संस्थेमध्ये ७ हजार कर्मचारी असून दरवर्षी सुमारे २.७३ अब्ज डॉलर्स एवढे या संस्थेचे वार्षिक बजेट आहे. पंतप्रधान कार्यालयाशी थेट निगडीत असलेली ही संस्था केवळ माहितीच देत नाही तर विविध मोहिमा आखते आणि दहशतवादाशी थेट सामना करते. तसेच या संस्थेमध्ये सुमारे ७ हजार लोकांना रोजगार दिला जातो. त्यामुळे जगातील सर्वात मोठी हेरगिरी करणारी संस्था म्हणून ती काम करते. १३ डिसेंबर १९४९ या दिवशी इस्रायलचे पंतप्रधान डेव्हिड बेन कोरियन यांच्या काळात मोसादची स्थापना करण्यात आली. तिच्या कार्याचे खरे यश अंतर्गत सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण कारवाईमध्ये आहे. अंतर्गत सुरक्षा सेवा, परराष्ट्र धोरणाची कारवाई, राजकीय विभाग, प्रत्यक्ष कृती विभाग अशा तिच्या उपशाखा आहेत. १९५१ मध्ये तिची पुर्नरचना करण्यात आली आणि कामकाजात थेट वें*द्रीकृत दर्जा देण्यात आला. सखोल कारवाई हे लक्ष्य ठरविण्यात आले. १९९० च्या दशकात अलिझा मोर्गन आरोनी यांनी मोसादच्या इतिहासात सर्वोच्च कामगिरी केली. त्यांनी अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत महत्त्वाची भूमिका पार पाडली. या संघटनेचे उपविभाग, रचना आणि कार्यपद्धती पाहता वें*द्रीभूत नेतृत्व हे तिचे वेगळेपण होय. मोसादच्या रचनेमध्ये झोनेट हा महत्त्वाचा भाग असून या भागामध्ये काम करणारे कर्मचारी जोखमीची कामे बजावतात. सिझेरिया या दुसNया भागात विशेष ऑपरेशन काम चालते. केशेल या तिसNया भागास इंद्रधनुष्य असे नाव देण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाळत ठेवण्याचे काम करतो. तसेच मोसादची मानवी संसाधने वापरण्याची पद्धतीही अद्भूत वैशिष्ट्यपूर्ण आहे. भांडवली गुंतवणूक आणि कर्मचाNयांचे प्रशिक्षण तसेच उच्चस्तरीय जबाबदारीचे कामे करणाNया यंत्रणा मदतनीस सहाय्यकांची भूमिका ही सर्व एक वेगळी रचना होय. इंग्लंड आणि अमेरिकेत अनुक्रमे ४००० ते १६००० प्रतिनिधी या संघटनेच्या वतीने काम करतात.

या संघटनेचे बोधवाक्य हिब्रू भाषत्े असून त्याचा अर्थ असा आहे की, कारण आमच्या ज्ञानी मार्गदर्शनामुळे तुम्ही युद्ध करू शकता. त्यांनी आपल्या प्राचीन परंपरेतील नीती सूत्रांचा उपयोग करून ही बोधवाक्ये तयार केली आहेत. अलीकडचे बोधवाक्य असे आहे की, जेथे मार्गदर्शन नसते तेथे राष्ट्र अधोगतीस जाते. परंतु समुपदेशकाच्या विपुलतेमध्ये सुरक्षितता असते. हे बोधवाक्य अर्थपूर्ण असून संघटनेच्या यशाचे द्योतक आहे. आतापर्यंत या संघटनेचे १३ संचालक झाले असून डेव्हिड बर्निया हे २०२१ पासून मोसादचे संचालक आहेत. या संघटनेने आशिया, आप्रि*का तसेच युरोप आणि अमेरिकेत सुद्धा अनेक कृती योजना यशस्वी केल्या आहेत. जगातील अनेक राष्ट्रे दहशतवादाच्या विरोधात लोकशाही रक्षणासाठी मोसादचे सहकार्य घेतात. जगातील आंतरराष्ट्रीय पातळीवर सक्रिय असलेले राक्षसी कृत्य करणारे दहशतवादी सुद्धा मोसादचे नाव घेताच कापू लागतात. त्यावरून जगामध्ये या गुप्तचर संघटनेचा किती दरारा आहे, ते लक्षात येते. प्रत्यक्ष शत्रूंच्या गोटात शिरून आपणास हव्या असलेल्या मोस्ट वॉन्टेड दहशतवाद्याचा काटा काढण्याचे सामथ्र्य व चतुराई मोसाद संघटनेत आहे, हेच तिच्या यशाचे खरे गमक होय. जरी वरवर पाहता हमासने केलेल्या हल्ल्यामध्ये मोसादला माहिती देण्यात यश आले की नाही, याबद्दल शंका वाटत असली तरी हे लक्षात घेतले पाहिजे की अपयश मोसादचे नसून इस्रायलच्या वर्तमान राजकीय व्यवस्थेचे आहे. गुप्तहेर यंत्रणा जेव्हा चांगले समुपदेशन करते तेव्हा राष्ट्र युद्ध जिंवू* शकते. जगातील विविध दूरदर्शन मालिका, चित्रपट आणि साहित्यातील मोसादचे चित्रण या संघटनेच्या लौकिकात भर टाकणारे म्हटले पाहिजे. काळाचा इतिहास पुढे जातो, परंतु मागे उरतात चांगल्या कामगिरीचे सुवर्ण प्रवाह. तेच मोसादचे खरे यश होय.

# भारतीय संविधानाचा प्रेरणादायी इतिहास



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**भारतातील विविध भाषा, संस्कृती, धर्म, जात, वंश ,पंथ ,चालीरीती, रुढी परंपरा, वेषभूषा,खानपान या सर्वांना एका सूत्रात बांधणारा ग्रंथ म्हणजे संविधान होय, संविधानाने स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क ,धार्मिकतेचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क ,शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क हे मूलभूत हक्क राज्यघटनेने नागरिकांना दिले. काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंत पसरलेल्या आपल्या देशातील सर्व लोकांना एकात्मतेच्या सूत्रात ओवणारे आपले संविधान सर्वश्रेष्ठ आहे. त्याचा सन्मान आपण राखला पाहिजे. आज ही वाटचाल सुरू आहे. याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटतो. आपल्या पवित्र संविधानाची जन्मकथा आपण सर्वांनी जाणून घेणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे. कारण आपला देश विविधतेने नटलेला आहे .भारताला स्वातंत्र्य मिळण्या अगोदर त्याच्या संविधान निर्मितीच्या प्रक्रियेला कशी गती मिळाली हे आपण समजून घेऊ.......**

भारतीय लोकांना संविधानाची आवश्यकता का वाटू लागली? कारण संविधानामध्ये नागरिकांचे हक्क व अधिकार आणि त्यांच्या स्वातंत्र्याचा उल्लेख असतो. शासनालाही हे हक्क सहजासहजी काढून घेता येत नाहीत. कारण नागरिकाचे हक्क व स्वातंत्र्य सुरक्षित ठेवावे लागतात. नियमाच्या चौकटीत राहूनच राज्यकारभार करावा लागतो. त्यामुळे त्यांना मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करता येत नाही. म्हणून संविधानानुसार राज्यकारभार करणे अतिशय महत्त्वाचे आहे. संविधानानुसार राज्यकारभार केल्यामुळे जनतेचा विश्वास वाढतो. त्यामुळे जनता त्यामध्ये सहभागी होते. संविधानामुळे आपल्या जीवनाला दिशा मिळते. जागतिक शांतता, सुरक्षितता, मानवी हक्काचे संवर्धन या सर्व गोष्टी संविधानामध्ये सुरक्षित असतात म्हणून संविधान ही हा राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताच्या संविधान निर्मितीला 1946 पासूनच सुरुवात झाली .ब्रिटिशांनी तयार केलेला कायदा आता भारतीयांना चालणार नाही तर आपल्या देशाचे स्वतः संविधान असावे; यासाठी संविधान समिती नेमली गेली आणि त्यानुसार त्या संविधानात एकूण 299 सदस्य होते. डॉ.राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. जर देशाला संविधान नसेल तर काय होईल? असे आपणाला वाटते तर राष्ट्राचा राज्यकारभार संविधानानुसारच चालायला हवा जर एखाद्या देशाला संविधान नसेल तर तेथील राज्य, कार्यकर्ते मनमानी पद्धतीने त्या देशाचा राज्यकारभार करतील ; लोकांना मिळणारे अधिकार काढून घेतील, किंवा नष्ट करतील राज्यकर्ते आपल्या सोयीनुसार सत्तेचा उपयोग करतील. तसेच समाजातील अल्पसंख्यांक, दुर्बल घटक ,महिला यांच्यावर काही प्रमाणात अन्याय होईल ,अनियंत्रित सत्ता गाजवून जनतेवर अन्याय व जुलूम करतील जर संविधान असेल तर त्या देशाला संविधाना नुसारच चालावं लागते. संविधान जर नसेल तर वरील गोष्टी कारणीभूत होतात म्हणून संविधान हे अतिशय महत्त्वाचे आहे संविधान लिहून पूर्ण करण्यासाठी दोन वर्षे 11 महिने आणि 18 दिवस इतका कालावधी लागला .मूळ संविधानामध्ये 22 भाग 395 कलमे आणि आठ परिशिष्टे आहेत. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संविधान लिहिण्यासाठी दिले, डॉ.बाबासाहेबांनी विविध देशाच्या संविधानाचा सखोल अभ्यास व चिंतन करून संविधानाचा मसुदा तयार केला, कलमवार चर्चा केली. विचारलेल्या सर्व प्रश्नांना समर्पक उत्तर दिले आणि प्रत्येक तरतूद निर्दोष करण्याचे काम त्यांनी केले. त्यामुळे भारताच्या संविधान निर्मितीतील या योगदानामुळे त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात. संविधान सभेने 26 नोव्हेंबर 1949 रोजी त्यांना मान्यता दिली म्हणून 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो

.आणि त्यानुसार 26 जानेवारी 1950 पासून संविधानातील तरतुदीनुसार आपल्या देशाचा राज्यकारभार करण्यास सुरुवात झाली, तेव्हापासून भारत हे प्रजासत्ताक राज्य झाले. भारतीय संविधान सभेत डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर. सरदार वल्लभ भाई पटेल, सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख ,जी बी कृपलानी ,बी एन राव, राजकुमारी अमृत कौर, मौलाना अबुल कलाम आझाद या कायदे तज्ञाची नेमणूक केली होती. थोडक्यात सांगायचे म्हणजे आज संविधान म्हणजे मानवी शरीरातील श्वास आहे. भारतीय संविधानातील मूळ उद्देशिका आम्ही, भारताचे लोक, भारताची एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांसः, सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जाची आणि संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्प पूर्वक निर्धार करून; आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, 1949 रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. भारताचे संविधान भारतातील लोकांनी निर्माण केले आहे. त्याला कायद्याचे स्वरूप त्यांनीच दिले आहे. आणि ते स्वतःवर बंधनकारक म्हणून आहे. 26 जानेवारी 1950 मध्ये संविधान स्वीकृत झाल्यावर 1952 मध्ये लोकसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. भारतामध्ये सामाजिक न्याय खऱ्या अर्थाने प्रस्थापित करायचा असेल तर प्रत्येकाच्या मालमत्तेचे वाटप समान न्याय पद्धतीने झाले पाहिजे .श्रीमंत लोकांकडे असणाऱ्या उत्पादनाची साधने फक्त थोड्या लोकांच्या हाती आहेत . सर्वांना समान वेतन मिळावे .मुली आणि महिला यांच्या हितसंबंधाची जपवणूकच व्हावी अल्पसंख्याक व दुर्बल घटकांना इतरांबरोबर विकसित होण्याची संधी मिळावी. भारतातील आर्थिक आणि सामाजिक विषमता कमी होत होत ती नष्ट व्हावी, असे केल्यास सर्वाकडे समानता निर्माण होईल ,कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ हे संविधानानुसार चालावे त्याची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी, भारत हा खंडप्राय विशाल देश असल्यामुळे त्याचे संविधान काटेकोरपणे आणि लिखित स्वरूपाचे आहे,.प्राचीन काळापासून येथे आचार- विचार एकत्रित नांदत आहेत. सर्व भारतीयांना एकात्मतेच्या सूत्रात गुंफण्याचे किचकट कार्य संविधान पार पाडत आहे. ही फार मोठी यशाची गोष्ट आहे. भारतीय संविधानात राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान राखणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम ठेवणे ,कर्तव्याची जाणीव करून देणे ह्या सर्व गोष्टी सांगितल्या आहेत.

# भारतीय नागरिकांनो संविधान समजून घ्यायला हवे

आधुनिक केसरी

संविधानाने आमच्यासाठी काय केलं? हा सवाल आजही लोकांच्या मनामध्ये उपस्थित असलेली मानसिकता आपल्या अवती भवती दिसुन येते.याच मानसिकतेला नव्हे तर संविधाना पासून कोसो दूर असलेल्या भारतीय नागरिकांनी संविधान समजून घेण्याची गरज होऊन बसलेली आहे. संविधानाला न मानणारी,संविधानाच्या



सुशील गायकवाड
9309474068

विरोधात असणारी लोकं संविधान बदलाच्या दिशेने भूमिका घेऊ लागलेली आहेत.संविधान व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य सर्वांनाच देत असल्याने संविधान विरोधी भूमिका घेणाऱ्या नागरिकांचे स्वातंत्र्य सुद्धा संविधानच अबाधित ठेवत आहे.हे ही संविधानविरोधी भूमिका घेणाऱ्यांनी लक्षात ठेवायला हवे.सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड म्हणतात की,"आपले संविधान फार महत्वाचे आहे. कारण ते त्यांचेही हक्क संरक्षित करते.जे संविधानावर विश्वास ठेवत नाहीत." चंद्रचूड यांनी मांडलेला हा संविधान विषयक विचार खूप महत्त्वपूर्ण वाटतो की,संविधान हे भारतातील प्रत्येक नागरिकाचे आहे.ते प्रत्येकाच्या हक्कांचे संरक्षण करण्याचे काम करते.भारतीय संविधान आहे म्हणून तर आपल्या सर्वांच्या जीवनाला आकार आहे.आपल्या जीवनात संविधानाचे अनन्यसाधारण असे महत्व आहे.संविधान हे प्रत्येक भारतीय नागरिकाच्या जगण्याचा श्वास आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.

संविधानाचे अभ्यासक व लेखक नूरखा पठाण यांनी तर भारतीय संविधानावर आधारित एक पुस्तक लिहिलेले आहे.अन त्या पुस्तकाचं नांवच वाचून आपलं संविधान नक्की काय आहे याचे जाणीव करून देते."आपलं संविधान... राज्यपद्धती नव्हे,तर जीवनपध्दती " असे ते त्या पुस्तकाच्या नावातूनच म्हणत आहेत.

भारत देशात राहणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाचे जीवन घडविण्याची जबाबदारी आपल्या भारतीय संविधानाने अगदी प्रामाणिकपणे, निस्वार्थी भावनेने स्वतःच्या खांद्यावर २६ नोव्हेंबर १९४९ सालीच घेतलेली आहे. परंतु हे संविधान प्रामाणिकपणे राबविण्याची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे.त्यांचे खांदे मात्र संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी करण्यासाठी मानसिकता दाखवत नसल्याने खऱ्या अर्थाने जे संविधान प्रत्येक भारतीय नागरिकांचे हक्क संरक्षित करीत आहे तेच संविधान संरक्षित करण्याची जबाबदारी कोणाची आहे? हे संविधान अजून मजबूत करण्यासाठी कोणी धडपडले पाहिजे? साहजिकच ही जबाबदारी समस्त भारतीय नागरिकांची आहे.त्यामुळेच ही जबाबदारी पेलण्यासाठी भारतीय नागरिकांनीच हे संविधान समजून घ्यायला हवे की हे संविधान नक्की आपल्या साठी कोणती कामगिरी पार पाडत आहे.संविधाना बाबत भारतीय नागरिकांमध्ये जागृती होणे अपेक्षित आहे.जे संविधान आपल्या हक्क अधिकारांसाठी आहे.ते संविधान समजून घेण्याची नितांत गरज होऊन बसलेली आहे. संविधान निर्मितीसाठी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रम घेतलेले आहेत. ते प्रयत्न देशातील प्रत्येक नागरिकाच्या दृष्टीने घेतलेले आहेत. भारताचे संविधान हे भारतीय नागरिकांसाठीच नव्हे तर समस्त मानवतेला

आत्मसन्मानाची जाणिव करून देणारे संविधान आहे.न्याय, हक्क,अधिकार मिळवून देणारे भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ मानले जाते.भारत देशाचा सर्वोत्तम ग्रंथ म्हणून संविधानाकडे पाहिले जाते.आज भारतीय संविधानाच्या माध्यमातून भारत देशात राहणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकांमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव ही बीजे रोवली जात असताना ज्यांच्या वाट्याला हजारो वर्षांची जातीय मानसिकतेची, जुल्मी राजवटीची गुलामगिरी होती.अनेक जोखडबंदाची गुलामगिरी कित्येक वर्षे अस्तित्वात होती.त्या गुलामगिरीला नष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानातून केलेले आहे.

संविधानाने मानवतावाद दिला.माणूस म्हणून जगण्याचं हक्क मिळवून दिले.इथल्या मुक्यांना वाचा दिली,
बहिऱ्यांना कान दिले तर अंधांना डोळे देऊन आपल्या हक्कांसाठी लढण्यासाठी संविधानाची ताकत उभी झाल्याने दबलेला आवाज खऱ्या अर्थाने आज डरकाळीच फोडू लागला.संविधानाने हेच परिवर्तन घडवून आणले.अन्यायाला वाचा फोडताना न्यायाचा संघर्ष करण्याची हिंमत संविधानाने दिलेली आहे.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी हे संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सुपूर्द करीत असताना भारतातील माणसाच्या खऱ्या स्वातंत्र्याची पहाट उगविताना पाहायला मिळाली.आज भारताचे संविधान देशात कार्यरत असताना ज्या संविधानावर हा देश उभा आहे.त्या संविधानाबाबत मात्र देशातील नागरिकांमध्ये अजूनही अज्ञान आहे.नक्की संविधान म्हणजे काय?या संविधानाने आपल्याला नेमकं काय दिलं? आजही हे संविधान लोकांनी समजून न घेतल्यामुळे संविधान विरोधी जे काही घडत आहे.तेच तर आपल्या लोकशाहीला घातक बनत चाललेले आहे.हे संविधान राबविण्याची जबाबदारी ज्यांच्या हाती जाईल तेच जर संविधान विरोधी भूमिका घेणार असतील तर संविधान तरी सुरक्षित कसे राहणार? लोकांमध्ये संविधानाची जागृती करणे गरजेचे होऊन बसलेले आहे.आज संविधानासमोर अनेक आव्हाने येत आहेत. परंतु त्या प्रत्येक आव्हानास सामोरे जाण्यासाठी संविधान समर्थ आहे.त्यासाठी सजग जागरुक नागरिकांची ही आवश्यकता आहे. संविधान तेव्हा आपले रक्षण करेल जेव्हा आपण संविधानाचे रक्षण करू.संविधान नागरिकांच्या प्रत्येक समस्येला,अडचणीला सोडविण्यासाठी सक्षम आहे.प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवून देणे हीच तर संविधानाची भूमिका आहे.सर्व जाती धर्मातील लोकांना संघटित ठेवण्यासाठी भारतीय संविधान खंबीर आहे. परंतु आज आपल्या देशातच काहींकडून भारतीय संविधानाची पायमल्ली करण्याचा प्रयत्न हा वारंवार होत असताना विकृत घटना घडवून आणल्या जात असतात.संविधान समजून न घेता संविधान बदलण्याची भाषा या देशातच होत आहे.

संविधानाची विटंबना करणारे अनेक विकृत लोक हे देशात संभ्रम निर्माण करीत आहेत.इथल्या व्यवस्थेने भारतीय संविधानाला गालबोट लागेल अशा कायम विकृत घटना घडवून आणलेल्या आहेत.ज्यांच्या हाती सत्तेच्या चाव्या दिल्या जात असतात.अशी सत्तेला वेडे पिसे झालेले लोक मात्र संविधानाची काटेकोरपणेअंमलबजावणी करण्यात अपयशीच ठरलेली आहेत. आज जे काही चुकीचे प्रकार घडत आहेत.त्यास पायबंद घालण्यास ही राजकीय यंत्रणेसह प्रशासकीय यंत्रनेची
व्यवस्था किती कूचकामी आहे.हेच पाहायला मिळत आहे. भारतीय संविधानाने या व्यवस्थेला जनतेच्या सेवेसाठी पुढे आणले आहे.परंतु या व्यवस्थेत कार्यरत असलेल्या अनेकांना संविधानाची जाणीवच राहिलेली नाही.ते संविधाना प्रमाणे कामेच करत नाहीत.संविधानाच्या चौकटीत राहून ज्या व्यवस्थेला या देशाचा राज्य कारभार चालविण्यासाठी संविधानाने अधिकार मिळवून दिलेले आहेत.तीच व्यवस्था मात्र या संविधानाच्या विरोधी भूमिका घेत असते.देशात संविधानाची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने व्यवस्थेकडून व्यवस्थित पणे केली जात नाही.एक चांगले संविधान देशात असताना सुद्धा आज संविधाना पुढे अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत.हे भारतीय संविधान,भारतीयांचा आत्मसन्मान आहे.परंतु संविधानिक कायद्याची अंमलबजावणी न करणे त्यानुसार न वागण्याचा व व्यवस्थेचा हुकूमशाही पणा यांमुळे या देशाची लोकशाही जाणीवपूर्वक धोक्यात आणली जाते आहे.म्हणून भारतीय संविधानाच्या जागृतीचे विचारमंथन हे भारतीय नागरिकांमध्ये झाले पाहिजे.भारतीय नागरिकांनी स्वतःहून संविधान समजून घेण्याची वेळ आलेली आहे.भारतीय संविधानाचा सर्वांना न्याय देणारा दृष्टीकोन जागृतीद्वारे जन माणसात पोहचला पाहिजे इथल्या प्रत्येक व्यवस्थेवर संविधाना नुसार हा कारभार चालविण्याची जबाबदारी प्रामाणिकपणे रुजली पाहिजे.भारतीय नागरिक हे संविधान साक्षर होऊन संविधानाची ध्येय धोरणे लोकशाही देशात सफल होण्यासाठी प्रयत्न करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकांनी जबाबदारी पेलायला हवी.

# शोषित पीडित कष्टकऱ्यांच्या प्रश्नांचा 'कबाडा'

आधुनिक केसरी

संसद या पहिल्या - वहिल्या काव्यसंग्रहाने साहित्य क्षेत्रात नावा रूपाला आलेले खानदेशातील मुक्ताईनगर येथील एक आगळे - वेगळे व्यक्तिमत्व म्हणजे दीपध्वज कोसोदे होय . पंचनामा या कथासंग्रहाने दीपध्वज कोसोदे यांना खऱ्या अर्थाने कथाकार म्हणून मराठी साहित्यात ओळख मिळवून दिली .कोसोदे यांनी आवर्जून बालसाहित्यही लिहिले आहे.पिंपळाचं झाड आणि पाण्यावरचा वारकरी ही दोन पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.त्यामुळे नव्या



प्रा. संजय सूर्यवंशी
9420557900

पिढीतील दमदार लेखन करणाऱ्यांपैकी दीपध्वज कोसोदे हे एक नाव आहे, हे विसरून चालत नाही. जळगाव जिल्हा परिषदेच्या सेवेत ग्राम विकासअधिकारी पदावर कार्यरत असल्यामुळे दैनंदिन जीवनात येणारे जीवनानुभव त्यांनी आपल्या कथांचे विषय बनविले आहेत त्यामुळे त्यांच्या कथा अधिक सकस आणि ताकदीने व्यक्त होतात. ग्रामीण भागातील प्रशासनातील सामान्य माणसांच्या समस्या आणि त्या सोडविण्याच्या नावावर त्यांची होणारी कोंडी व त्यातून येणारी हदबलता याचे चित्रण कबाडामधून येते. कबाडा या कथासंग्रहात एकूण पाच दीर्घ कथा आहेत. त्यांनी वापरलेली बोलीभाषा आणि त्यातील लोकोक्ती अतिशय बोलक्या आहेत त्यामुळे कथा वाचकांना अधिक भावते. मुक्ताईनगर, बोदवड, रावेर आणि भुसावळ हा परिसर मराठवाडा, विदर्भ आणि मध्यप्रदेश या भू प्रदेशांना लागून आहे.या परिसरात बोलली जाणारी संमिश्र भाषा दीपध्वज कोसोदे यांनी लेखनात वापरल्याने पात्रे अधिक बोलकी झाली आहेत. कबाडा या कथासंग्रहात मनरेगा, घरकुल , बचत गट, भारत निर्माण , आणि कबाडा अशा एकूण पाच कथा आहेत. या कथासंग्रहातील पात्रांचे मनोविश्लेषण लक्षवेधी आहे. दीपध्वज कोसोदे यांच्या कबाडा या कथासंग्रहाचे वाचक निश्चितपणे स्वागत करतील यात शंका नाही.त्यांच्या भविष्यातील लेखन कार्याला माझ्या मनपूर्वक शुभेच्छा !




**कथासंग्रह - कबाडा**
**प्रकाशन - पद्मगंधा प्रकाशन**
**मूळ किंमत - तीनशे रुपये**
**एकूण पृष्ठे - १६७**

# जन सामान्यांचे युवा नेतृत्व-सुनील (भाऊ) यादव

आधुनिक केसरी

२० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण या विचारांना प्रेरित होऊन लोणंदच्या प्रत्येक सामाजिक कार्यात नेहमी हिरीरिने सहभाग घेणारे एक युवा नेते व जनसामन्याचे नेतृत्व म्हणून सुनिल (भाऊ) यादव यांच्या कडे पाहिले जाते. त्यांच्याकडून सर्वांना सामावून घेत जनसेवेचे कार्य केले जात असते.त्यांनी त्यांच्या सर्वसमावेशक कार्यप्रणालीतून आजपर्यंत अनेकांच्या समस्या सोडविण्याचे काम केलेले आहे.सर्वसामान्यांच्या प्रश्नांना,त्यांच्या समस्यांना न्याय देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केलेले आहेत.विविध राजकीय पक्षातील नेते मंडळी असोत किंवा स्वकीय पक्षातील नेते पदाधिकारी व कार्यकर्ते असोत त्यांच्याशी एक चांगला संवाद साधुन लोकांची कामे कशी करता येतील,करून घेता येतील यासाठी सुनिल (भाऊ) यादव सदैव प्रयत्नशील राहत असतात.शिवसेना म्हटली की शिवसेनेचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांचा राजकारणातच नव्हे तर कोणतीही समस्या सोडवायची असेल तर एक वेगळाच दबाव पाहायला मिळत असतो. शिवसेनेकडून जनसामान्याचे एखादे काम होणार नाही असे कधी होतच नाही.आज त्याच शिवसेनेत काम करण्याची संधी गेली अनेक वर्षांपासून मिळत असल्याचे भाग्यच असल्याचे सुनिल (भाऊ) यादव म्हणत असतात. शिवसेनेचे ते आहेत ना सुनिल यादव अशी ओळखच त्यांच्या नावासमोर येत असते.आज त्याच नावाचा दबदबा,त्याच नावाची ओळख सुद्धा सुनिल (भाऊ) यादव यांची दिसून येते.पक्ष फुटीनंतर पक्षाची वाताहत होऊन सुद्धा सुनिल यादव एकनिष्ठ आहेत. त्याच जागेवर ठामपणे राहण्याची भूमिका सुनिल यादव यांनी घेतलेली समस्त लोणंदकरांनीच नव्हे तर खंडाळा तालुक्यातील शिवसेनेने तसेच इतर पक्षांनी सुद्धा पाहिलेली आहे. एकटे तर एकटे पण स्वतःच्या बुद्धीला जो



सुनिल (भाऊ) यादव वाढदिवस विशेष लेख

योग्य निर्णय वाटेल त्याच निर्णयातून त्यांची वाटचाल आजही चाललेली असते.शिवसेना फुटीनंतर ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या समवेतच सुनिल (भाऊ) यादव यांनी राहण्याचा घेतलेला निर्णय म्हणजे यातून त्यांची पक्षा सोबत व बाळासाहेब यांच्या वारसासोबत असलेली एक निष्ठा पाहायला मिळत आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोणंद शहर प्रमुख म्हणून सुनिल (भाऊ) यादव हे जनसामन्यांचे कार्य करत राहणार असल्याचे ते नेहमी म्हणत असतात. आज अनेक लोकं सत्तेच्या दिशेने गेली परंतु सुनील (भाऊ) यादव ठामपणे एकाच जागेवर राहिल्याने त्यांच्या या एकनिष्ठेबद्दल सुद्धा कौतुक केले जात असते.तुम्ही ठामपणे राहिलात हे खूप चांगलं केलं.याच माध्यमातून जनसामान्य जनतेचे कार्य करत चला हीच तुमची ओळख असल्याचे लोकं सुद्धा सुनिल (भाऊ) यादव यांना म्हणत असतात.लोकांच्या कामांना प्राधान्य देणे,नगरपंचायतीत कुणाचे काम असो किंवा नेते मंडळी यांच्या कडून लोणंद करांच्या हिताच्या दृष्टीने कोणतेही काम करायचे म्हटले तरि पाठपुरावा करण्याचे काम ते पक्षाच्या माध्यमातून करत असतात. जनसामान्यांचा आवाज म्हणून सुनिल (भाऊ) यादव यांच्या कार्यपद्धतीकडे सुध्दा पाहिले जाते.लोणंदच्या बाबतीत एखादी समस्या असेल किंवा कुणी त्या प्रश्नी आवाज उठवत असेल तर अशा लोकांना सुद्धा पाठींबा देत असतात.लोणंदच्या संबधित असलेल्या प्रत्येक ठिकाणी ते आवर्जुन आपली उपस्थिती दर्शवित तिथे स्वतःची भूमिका मांडत असतात. जनसामान्याच्या दृष्टीने हितकारक असणाऱ्या प्रत्येक ठिकाणी रोखठोक भूमिका मांडण्याचे धाडस सुनिल (भाऊ) यादव दाखवत असतात.सामाजिक कार्यातून लोकांची कामे करण्यासाठी तळमळीने झटणारे सुनिल (भाऊ) यादव जनमाणसात परिचित असे नांव आहे.कोरोना काळ हा नागरिकांसाठी भयावह असाच ठरला होता.या काळात सुद्धा लोकांना कशा प्रकारे मदत मिळवून देता येईल या दृष्टीने सुद्धा सुनिल( भाऊ) यादव यांनी मदत कार्य केलेले आहे.दानशूर लोकांकडून अनेक गोर गरीब लोकांपर्यंत मदतीचा हात मिळवून दिलेला आहे. सामजिक कार्य करण्यात खरी जनसेवा मानणारे सुनिल यादव खऱ्या अर्थाने जनसामान्यांचे कार्यशील बांधव बनलेले आहेत.विशेष कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र शासन म्हणून सुद्धा त्यांनी काम पाहताना लोकांना सहकार्य केलेले आहे. शिवसेनेची आंदोलने असोत किंवा विविध सभा असोत आरोग्य शिबिरे असोत अशा प्रत्येक ठिकाणी आपला सहभाग सुनिल (भाऊ) यादव देत आलेले आहेत.जिथे जनसामान्यांचे हित तिथे सुनिल (भाऊ) यादव सदैव पाहायला मिळत असतात.सर्वांना सहकार्य करणे,समाजहिताच्या प्रत्येक लढ्यास ते पाठींबा देत असतात. मराठा समाज मंडळाच्या वतीने लोणंद शहरात शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असतो.या उत्सवात सुद्धा सुनिल (भाऊ) यादव यांच्याकडून एक चांगला सहभाग घेतलेला पाहायला मिळत असतो. हा उत्सव चांगल्या प्रकारे होण्यासाठी सुध्दा ते प्रयत्न करत असतात. सर्व महापुरुषांच्या जयंती उत्सवात ते असतात. गोरगरिबांच्या आरोग्य विषयक अडी अडीचणी सोडविण्यासाठी विविध योजनामधून सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत असतात. पंचायत समिती असो प्रशासकीय कार्यालय असोत प्रत्येक ठिकाणी ते जनसामान्याचे प्रश्न घेऊन जातात.ते सोडविण्याचा प्रयत्न करतात.संजय गांधी निराधार योजना असो,गोर गरिबांचे रेशन कार्डचे काम असो अशी अनेक कामे करण्यासाठी सुनिल(भाऊ) यादव कटिबद्ध असतात.काम करताना त्यांच्या कडून कुठलाही राजकीय पक्ष पाहिला जात नाही.अहोरात्र जनसेवेसाठी वाहून घेतलेला एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून सुनिल (भाऊ) यादव कोणत्याही वेळेस फोन केला तरी मदतीला धावून येत असतात.सर्वसमावेशक भूमिका स्विकारत सर्वांच्या सुख दुःखात सहभागी होण्याची जबाबदारी ते पार पाडत असतात. ही जबाबदारी यापुढेही अशीच पार पाडण्याचा प्रयत्न करत राहीन.असा विश्वास सुनिल ( भाऊ) यादव यांनी व्यक्त केलेला आहे.

सुशिल गायकवाड
लोणंद

# राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाद्वारे वनविभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिवती तालुक्यातील वनक्षेत्रात समाविष्ठ 105 महसुली गांवे व 48 हजार हेक्टर जमिनींच्या डिफॉरेस्टेशन कार्यवाहीकरीता वन व महसुल विभागाद्वारे संयुक्त सर्व्हेक्षण करून 25 दिवसात अहवाल सादर करण्याच्या सुचना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने मुंबई येथे दि. 17 ऑक्टोंबरला घेण्यात आलेल्या सुनावणीत दिल्या होत्या. त्यानुसार आयोगाने चंद्रपूर जिल्ह्याचे मुख्य वनसंरक्षक तसेच अन्य अधिकाऱ्यांना दिल्ली येथील कार्यालयात पाचारण करीत त्यांच्याद्वारे सादर अहवाल व कार्यवाहीचा आढावा घेतला. सदर अहवाल अपूर्ण असल्याने सविस्तर वस्तुनिष्ठ अहवाल तातडीने तयार करून डिफॉरेस्टेशन विषयक कार्यवाही शिघ्रतेने मार्गी लावण्याचे निर्देश आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुकाअंतर्गत असलेल्या 105 महसुली गावांच्या व हजारो हेक्टर जमिनीच्या डिफॉरेस्टेशनकरीता तालुक्यातील भाजप व अन्य सामाजिक संघटनांनी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाकडे लेखी स्वरूपात तकार दाखल केली होती. या तकारीची गांभिर्याने दखल घेत दि. 17 ऑक्टोंबर 2023 रोजी मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृहात आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखाली महसूल व वनविभागाचे प्रधान सचिवांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीविषयी वस्तुनिष्ठ कार्यवाही अहवाल एक महिण्याच्या आत आयोगाला सादर करण्याचे निर्देश यावेळी अध्यक्षांनी दिले होते. या सुनावणीचा आढावा घेण्याकरीता दि. 24 नोव्हेंबर 2023 रोजी नवी दिल्ली येथे आयोगाने फेरसुनावणी घेत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावले होते. चंद्रपूरचे मुख्य वन संरक्षक जितेंद्र रामगावकर व अन्य वरीष्ठ अधिकाऱ्यांनी आयोगाच्या कार्यालयात उपस्थित राहून आयोगाला विषयानुशंगीक अहवाल सादर केला. परंतू सदर अहवाल अपूर्ण असल्याने आयोगाने या अहवालातील त्रुटी दूर करून नव्याने वस्तुनिष्ठ अहवाल तयार करून आयोगाला त्वरीत सादर करण्याचे आदेश दिले. सदर प्रश्न 60 हजाराहून अधिक जनतेच्या जिव्हाळ्याचा असल्याने त्याचे गांभिर्य लक्षात घेवून या कामाला प्राधान्यकम देत कार्यवाहीला गती देण्याचे निर्देशही आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी सुनावणीला उपस्थित संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11%
व्याजदर
* नियम व अटी लागू
© टोल-फ्री : 18004197501 ⊕ rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टैंड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177



# महामार्ग पोलीस केंद्र घोटी व वाहतूक पोलीसांकडून स्मरण दिनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज


**इगतपुरी :** रस्ते अपघातात वाहतुकीचे नियम न पाळल्याने अनेक अपघात होतात. या अपघातात अनेक जणांना जीवाला मुकावे लागते तर अनेकांना कायमचे अपंगत्व येते. मात्र अपघाताच्या वेळी अपघातग्रस्तांना तातडीची मदत मिळाली तर अनेकांचा प्राण वाचू शकतो. म्हणुन ही तातडीची मदत करण्याचे काम मृत्युंजयदूत करीत असतो. अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी अपघाताची गंभीरता व त्यामुळे कुटुंबावर होणारे परिणाम याचे स्मरण व्हावे म्हणून महामार्ग पोलीस केंद्र घोटी व वाहतूक पोलीसांकडून स्मरण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मृत्युंजय दुतांचा तुळशीचे रोप व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. वाहतूक शाखेच्या नाशिक विभागाच्या पोलीस निरीक्षक मृदुला नाईक, इगतपुरी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोपान राखोंडे, महामार्ग पोलीस केंद्राचे उपनिरीक्षक हरी राऊत, जेष्ठ विधितज्ञ जितेंद्र शिंदे, आरटीओ अधिकारी रवींद्र म्हस्के, महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे व्यवस्थापक जयंत इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्मरण दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मृत्युंजयदूत म्हणून महामार्गांवर अपघात ग्रस्तांना मदत करणाऱ्या कसारा येथील आपती व्यवस्थापन टीमचे शाम धुमाळ, दत्ता वाताडे, देविदास वाघ, घोटी सिन्नर फाट्यावर मदत करणारे संजय सोनकांबळे, ज्ञानेश्वर बोराडे, नरेंद्र महाराज मोफत रुग्णवाहिकेचे चालक कैलास गतीर यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन गजानन गोफणे यांनी केले तर आभार पोलीस उपनिरीक्षक साहेबराव पवार यांनी मानले. यावेळी ज्येष्ठ नागरिक, मान्यवर तसेच पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# गोंडवाना विद्यापीठात साजरा होणार संविधान महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापिठाची अधिसभा कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या अधीसभेत डॉ. मिलिंद भगत यांनी संविधान सन्मान महोत्सव साजरा करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाला दीपक धोपटे यांनी अनुमोदन दिले तसेच सर्वानुमते हा ठराव पारित करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेची उद्देशिका हे संविधानाची मूलभूत तत्वे आणि उद्दिष्ट सांगणारे प्रास्ताविक विधान आहे. भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आणले. भारतीय संविधानाची उद्देशिका ही आपल्या संविधानाचे एक संक्षिप्त स्वरूप आहे. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी भारतीय संविधान लागू झाल्याला ७४ वर्ष पूर्ण होऊन ७५ व्या वर्षात म्हणजेच अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण होत आहे. जगात सर्वात मोठा लोकशाहीचा देश म्हणून भारत ओळखला जातो आणि या लोकशाहीचे संवर्धन करून तिला बळकट करण्याचे काम भारतीय संविधान करीत आहे . भारतीय संविधानाने समता, स्वातंत्र, न्याय, बंधुता या शास्वत मुल्यांची देण भारतीयांना केवळ दिलीच नाही तर प्रत्येकात रुजवली आहे. विद्यार्थ्यांमध्ये संविधानीक नितीमत्ता निर्माण करणे हे विद्यापीठाचे उद्दिष्ट असल्याचे विद्यापीठ कायद्यात नमूद आहे, म्हणून अमृत महोत्सवी वर्षात प्रवेश करीत असताना विद्यापीठाच्या नव्याने निर्माण होणाऱ्या शैक्षणिक परिसराच्या किंवा विद्यापीठाच्या दर्शनी भागात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचा शिलालेख उभारल्यास संविधाना प्रती कृतज्ञता व्यक्त करता येईल व संविधानातील नितीमत्ता निर्माण करण्याच्या विद्यापीठाच्या उद्दिष्टाची पूर्तता करता येईल.




# महाराष्ट्रातील सर्व पक्षांचे वाटोळे संजय राऊत यांनी केले : खासदार हेमंत गोडसे

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** शाखा प्रमुख व बुथ प्रमुख आणि शिवदूत हा त्रिसूत्री कार्यक्रम एकत्र राबवला तर जनतेपर्यंत आपला चांगला संदेश देता येतो. त्यामुळे त्यांना ताकद देण्याचे काम शिवसेना करत असुन पक्ष हा विचारांवर आधारीत असतो त्याला वारस नसतो. मात्र वारसदार दोन प्रकरचे असतात त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे विचारांचे व हिंदुत्वाचे वारसदार असून आज संजय राऊत यांनी या राज्यातील सर्व पक्षाचे वाटोळे केले असे प्रतिपादन खासदार हेमंत गोडसे यांनी केले. शिवसेनेचे खासदार हेमंत गोडसे यांच्या नेतृत्वाखाली इगतपुरी तालुका शिवसेना बूथप्रमुख व शाखाप्रमुख यांची आढावा बैठक पाडली येथे पार पडली त्यावेळी खासदार गोडसे बोलत होते. दरम्यान यावेळी ते पुढे म्हणाले की काँग्रेस सोबत युती ही फक्त संजय राऊत यांच्यामुळे झाली असून भाजप बरोबरच आपली नैसर्गिक युती असून आज आपण त्यांच्या सोबत आहे. गेली अडीच वर्ष काँग्रेस सोबत युतीत फक्त फरफट झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. एकनाथ शिंदे हे राज्याचे पहिले मुख्यमंत्री असे आहे की शाखा प्रमुख, बूथ प्रमुख व शिवदूत यांना विश्वासात घेऊन काम करतात. इगतपुरी तालुक्यातील ९० हजार हेक्टर क्षेत्रापैकी जवळपास ५४ हजार हेक्टर क्षेत्र संपादीत झाले असून अजून देखील औद्योगिक क्षेत्रासाठी जमिनी संपादीत होत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी आपल्या प्रकल्पग्रस्त बांधवांना स्थानिक ठिकाणी त्यांना चांगला मोबदला व रोजगार कसा मिळेल यासाठी शासन दरबारी प्रयत्न करून तालुका सुजलाम सुफलाम होईल यासाठी खासदार हेमंत गोडसे प्रयत्न करणार असून येणाऱ्या लोकसभेत त्यांना बहुमतांनी विजयी करून तालुक्यात पुन्हा विकासगंगा आणावी असे मनोगत माजी आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी व्यक्त केले. आगामी लोकसभा निवडणुकीत खासदार हेमंत गोडसे यांच्या विजयासाठी सर्व शिवसैनिकांनी आत्तापासुनच कामाला लागावे. हेमंत गोडसे यांची हॅट्रीक झाल्यानंतर आपल्या जिल्ह्याला मोठे मंत्रीपद मिळेल. म्हणुन सर्व शिवसैनिक पदाधिकारी यांनी कामाला लागावे अशा सुचना तालुका प्रमुख संपतराव काळे यांनी या आढावा बैठकीत दिल्या.

यावेळी व्यासपीठावर खासदार हेमंत गोडसे, जिल्हाप्रमुख अनिल ढिकले, माजी आमदार काशिनाथ मेंगाळ, तालुकाप्रमुख संपत काळे, उपजिल्हाप्रमुख रघुनाथ तोकडे, माजी आमदार पांडुरंग गांगड, युवा सेना जिल्हाप्रमुख सदानंद नवले, महिला तालुका प्रमुख अनिता घारे, विधानसभा प्रमुख देवीदास जाधव, विधानसभा संपर्क प्रमुख कुंडलिक जमधडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी नुकत्याच ग्रामपंचायत निवडणुकीत निवडुन आलेल्या नवनिर्वाचित सरपंचांचा खासदार हेमंत गोडसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आदिवासी आघाडीचे उपजिल्हाप्रमुख हिरामण कवठे, तालुका संघटक संजय आरोटे, संघटक जयराम गव्हाणे, खंडेराव धांडे, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख शंकर गाढवे, तालुकाप्रमुख मनोज सहाणे, बजरंग वारुंगसे, संपर्कप्रमुख कुंडलिक जमधडे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर जमदडे, विश्वास खातळे, अरुण भागडे, भगवान वाकचौरे, गोकुळ जाधव, सोमनाथ जाधव, विश्राम पोरजे, योगेश तांबे, सचिन कुटके, अशोक महाले, गोटीराम धोंगडे आदी उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन विधानसभा अध्यक्ष देविदास जाधव यांनी केले. कुंडलिक जमदडे यांनी आभार मानले.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/वी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



## शिल्पकार

राज्यघटना भारत देशाची
सर्वोच्च असा त्यास बहुमान,
कायदे कानून शिकवते आम्हा
अनमोल हे देशाचे संविधान.!

सांभाळण्या देशाचा कारभार
उपयुक्त हक्क एक मतदान,
निवडावा कारभारी आम्हीच
असेच सांगतेय हे संविधान.!

करारी बाणा भीमा अंगी
अद्भूत आत्मसात केले ज्ञान,
देश चालवितो आज कारभार
तेच त्यांनी लिहले संविधान.!

अवघड घटना मांडली पुस्तकी
भीमा तुझा आम्हा अभिमान,
कायद्यास मिळाली बळकटी
नमूद हेच झाले या संविधान.!

कलमांचा गोषवारा भीमाचा
विचारांनी त्यास केले परिधान,
आदर्श या भारत देशासाठी
यांनीच लिहिले हे संविधान.!

स्वातंत्र्य, न्याय, मूलभूत,
अधिकारांचा आत्मसन्मान,
कायद्यांचे असे हे पुस्तक
जगी मोठे हेच संविधान.!

सत्य-असत्याने वाढली ही
कायद्यांची एकमेव शान,
सर्व सामांन्यानी जाणले
मौल्यवान असे हे संविधान.!

आभारही मानायला हवेत
बाबासाहेबांचा हा एक मान,
चालते देशाची सारी मदार
घेऊन तो आधार संविधान.!

कवी/लेखक:
भूषण सहदेव तांबे
मुंबई

## बदक पिल्लू

तळ्यात उतरले बदकाचे मूल
हसले बघून कमळ फूल

पोहू लागला हलवत पाय
खुश होई पिलाची माय

अवती भवती पुढे - गागे
बदक पिल्लू तुरुतुरु भागे

पाण्यात डुबकी भरभर मारी
चोचीत मासे पकडे भारी

मासे पकडून दुखली मान
घडीभर विसावे घालवी ताण

मासे खाऊन भूक भागली
घरी जायची ओढ लागली

गुलाब बिसेन, गोंदिया
मो. नं. 9404235191



## माझे पप्पा

पप्पा माझ्यासाठी तुमचे अंग
अंगण पटांगण, टेबल आणि
खुर्ची
मांडी तुमची माझ्यासाठी
मऊ गादिहूनी उंची

बोटाला धरून तुमच्या
पहिले पाऊल चालले
खांद्यावरी बसून तुमच्या
जत्रा मेळावे पाहिले

पाठीवरी बसून तुमच्या
केली घोड्याची स्वारी
पायाच्या झुल्याने तुमच्या
नेले उंच नभावरी

डोक्यात सदैव तुमच्या
माझ्या भविष्याचा विचार
पोटामध्ये तुमच्या मजला
अथांग प्रेमाचा सागर

सर्व वार माझ्यावरचे
झेलून घेई तुमची छाती
गाल तुमचे आसुसलेले
माझ्या गोड पापीसाठी
ज्ञानेश्वर ताराचंद सिंदपूरे
कर्कापुर, ता. तुमसर जि.
भंडारा मो. क्र.9657462933



## मतदारा तू जागा हो

सत्तालोलूप सत्तेसाठी
उड्या मारती ईकडून तिकडे
डोळे उघडून बघ जरा तू
मतदारा तू जागा हो ।।

महाराजांचे नाव घेऊनी
सारी कुरणे चरती हे
तिसरा डोळा उघड जरा तू
मतदारा तू जागा हो ।।

लोकशाहीचे नाव घेऊनी
बेबंदशाही करती हे
बघ जरा तू बघ अता तरी
मतदारा तू जागा हो ।।

हक्काचा मतदार असे तू
गृहीत तुजला धरती हे
भोळा बनुनी राहू नको तू
मतदारा तू जागा हो ।।

खोटे बोलून लुटती तुजला
नाव विकासाचे घेऊन्
तुझ्याच हाती यांचे शेपुट
मतदारा तू जागा हो ।।
जयेश अ.माधव
9167710614

## सांज

जराशी सांज रेंगाळे
रात्रीला कापरे भरते
कसा काळोख असतो ते
दिव्याला माहिती नाही
वात नाही तेल नाही
पणतीचे अस्तित्व सरले
रिता कल्लोळ नुसता अन
मनाला माहिती नाही
कुणी थबकू नका येथे
अंगार ये अंगावरी
खरे तर जाळले त्यांनी
जगाला माहिती नाही
निघावे रिक्त हातांनी
आपली गरज ना कोणा
घातली गोळी बघा त्यांनी
पाठीला माहिती नाही
-- प्रसाद दत्त पाठक

## त्या वाटेवर

गजबज किलबिल क्षण ते
किती किती भारावलेले.
जाई जुई चा मंद दरवळ,
आंगन सारे सुखावलेले.
इवलेशे रोप ते उंच डोकावता
थंडी वाऱ्यात जणू पहुडले.
दूर त्या वाटेवर माहित नाही
का पाऊल वेडे थबकले.
पाऊलखुणा मागे टाकत,
डोळ्यांचे कडे ओलावले.
असंख्य आनंदी क्षणांना
डोळयात साठवून मन मात्र राहून राहून
दूरच्या त्या वाटेवर रेंगाळले.
सौ.वैशाली इंदुमती जाधव- महाडिक.
मो. क्र. - ९७६७४३७९२३



## सण दिवाळीचा

सण दिवाळीचा भाव भावनेचा
पणत्या पेटूनी दिवे लावण्याचा
सण दिवाळीचा बहीण भावांचा
कुबेर लक्ष्मी थोरल्या देवांचा
सण दिवाळीचा पै पाव्हण्यांचा
मामा भाचे आणि दाजी मेव्हण्यांचा
सण दिवाळीचा बालगोपाळांचा
फुलबाजा आणि लडी फटाक्यांचा
सण दिवाळीचा फराळ पाण्याचा
उटणे फासून अभ्यंग स्नानाचा
सण दिवाळीचा बाजार हाटाचा
सढळ खर्चाच्या ओढाळ थाटाचा
सण दिवाळीचा ऋतू हिवाळ्याचा
सुका मेव्यासह खिसे भरण्याचा
सण दिवाळीचा गप्पा मैफलिचा
नात्या गोत्यातील माला गुंफण्याचा
सण दिवाळीचा हवा पालटाचा
काही काळासाठी घर सोडण्याचा
सण दिवाळीचा शाळेच्या सुट्टीचा
नवख्या मित्रांशी अनोख्या गट्टीचा
सण दिवाळीचा रंग रंगोटीचा
आकाश कंदील दीप लावण्याचा
सण दिवाळीचा सडा रांगोळीचा
उजाडण्यापुर्वी नित्य अंघोळीचा
सण दिवाळीचा बुलंद खर्चाचा
सालाबादी येतो एकदा वर्साचा
सण दिवाळीचा नागर, ग्रामाचा
श्रम परिहार नित्याच्या कामाचा
भानुदास धोत्रे
परभणी, 7972625086

## कुणबी....

शेती करणारा तो कुणबी
मग तो भूस्वामी असो की भूदास
माझ्या नावाने सात बारा
पण शेतात पाय नाही ठेवला
तर माझ्या शेतात जो खपला
त्याच्या नावाने सात बारा कोरा
तो शेतकरी कुणबी नाही
तो तर शेतीवरचा वेठबिगार...
बैलाला तरी पेरणीच्या वेळी पेंढपाला
पण सालदाराला शिळे कुटके
कधी पाण्याच्या घोटाबरोबर
तर कधी मिठाच्या खड्याबरोबर...
दाताच्या कण्याबरोबर
ओली लाळ पोटात गिळत
ओट अन् पोटातील आतडे ओले करत...
कष्टणाऱ्या कुणब्याची जात कोणती?
कविता : प्रा. यादव गायकवाड



## रुसवा....

माहित आहे कां तू
रुसणार आहेस
आठवणीत मनोमन
हसणार आहेस
पाहून घेशील आल्यावर
एकदा डोळ्यात माझ्या
तु दिसणार आहेस
वळून पाहताना
वेगळीच नजर
जाळ्यात तुझ्याच
तु फसणार आहेस
खुद्कन हसशील
आठवून मला
विसरुन जाणाऱ्यात
नसणार आहेस
समोरून जातांना
वरती मी पहातो
खिडकीत मुद्दाम
तू बसणार आहेस
समोर पाहून वाचणार
मी गझल पहिल्याच रांगेत
तु असणार आहेस
अरे रुसव्या फुगव्याने
प्रेमच वाढते दिलावर काळजात
ठसणार आहेस
बलराज संघई
9420015108

## मराठे

मराठे रस्त्यावर येताना
मी गेलो पुन्हा भूतकाळात
बारा बलुते अन् अठरा
अलुतेदाराचा
भाऊ सापडला संकटात..

एके काळी गावचा
पाटील तो जमीनदार
म्हणत होता अभिमानाने
श्रेष्ठ शेती अन् कनिष्ठ
नोकरदार..

स्वराज्यात शिवरायांच्या
तोच होता बळीराजा
पण आता काळ बदलता
पिडला आमुचा राजा..

नवयुगात शेतीचे
तुकडे झाले फार
शेतीवरती जगणाऱ्यास
दिसते मरणाचे दार..

आज शासन दरबारी
त्यास कुठे हो स्थान?
आरक्षण नाही म्हणुनी
आज उठवीता झाला रान..

दोन-चार मराठे मोठे
म्हणुनी नका करू अपमान
आमच्याही लेकरांना
द्या जगण्याचं वाण..

आमच्याही लेकरांना
द्या जगण्याचं वाण..
ज्ञानेश्वर गायके
खामगांव, कन्नड
मो.९४०३३८४८८९

## ह्या दुःखाच्या कढईची

ह्या दुःखाच्या कढईची गा
अशीच देवा घडण असू दे;
जळून गेल्या लोखंडातहि
जळण्याची, पण पुन्हा, ठसू दे
कणखर शक्ती, ताकद जळकट.

मोलाची पण मलूल भक्ति
जशि कुंतीच्या लिहिली भाळी,
खिळे पाडूनी तिचे जरा ह्या
कढईच्या दे कुट्ट कपाळी
ठोकुनि पक्के, काळे, बळकट.

फुटेल उकळी, जमेल फेस,
उडून जाइल जीवन-वाफ;
तरि सांध्यांतून कढईच्या ह्या
फक्त बसावा थोडा कैफ
तव नामाचा भेसुर धुरकट.

बा. सी. मर्ढेकर

## एक दिवा आनंदाचा..

माझ्या आठवणीतील दिवाळी
पहिला दिवस तयारीचा
धनत्रयोदशी असते दीपदान
धन्वंतरीचे पूजन आयुर्वेदाचा

नरक म्हणजे असे वाईट
मनातील मळभ,कचरा
पहाटे उठून अभंग स्नान
अस्वच्छतेचा करून निचरा

दिवाळीचा दुसरा दिवस
घरोघरी लक्ष्मीपूजन दीपोत्सव
धणे,गूळ बत्तासे,लाह्या
गरिब ते श्रीमंताचा आनंदोत्सव

अंधारातून प्रकाशाकडे
संस्कार धर्म-कर्तव्याचे
फराळांची लुट,मेजवानी
सर्वत्र वातावरण प्रेमाचे

दिवाळीचा चौथा दिवस
भाऊ बहिणीच्या प्रेमाचा
आदरपूर्वक ओवाळणी
अभिमान त्या नात्याचा

एक दिवा आनंदाचा
विसर सोडून दुःखाचा
एक दिवा कल्याणाचा
मंत्र जपूया मानवतेचा

सौ शुभांगी हेमंत पांगरकर,
छत्रपती संभाजीनगर

## मी अशी आहे

चिवड्या सारखी राहते
चकली गत मी बोलते
लाडू गत स्वाभव माझा
दिसायला चेहरा गोड दिसे

विचार माझे अनारसे जसे
कळून न कळावे तुम्हा तसे
शंखर पढ़या गत माझ वागन
जसास तस उत्तर लगेच देण

शेव सारखी बारीक़ दिसते
रूसली तर बोलत नसते
बर्फी सारखा कलर माझा
बघून बघत राहाल असा

क़रंज्यात असत खोबर
विचार करूँन बोला बर
दिसायला दिसते शांत
माझीच मी राहते निवांत
कु. कविता आधार चव्हाण,
म्हसावद जि.जळगाव



## तू अन् मी

तू फुललेला पारिजात,
अन् मी मिटलेली जाई...
गंधाने मोहून तुझ्या रे,
तुझ्यात हरवले जणूं कांहीं ...
शुभ्र पांढरा चाफा तू,
अन् मी लाजरी शेवंती...
वळवाची सर पहिली तू,
अन् मी गंधाळली माती...
तू फुल अन् गंध जणू मी,
तू कला अन् छंद जणू मी...
अतूट जुळला हा स्नेहाचा
धागा, तू जीवन अन् आनंद
जणू मी...
कळले प्रिया मज नाते अपुले,
देह तू अन् श्वास जणू मी...
सुखी आपल्या संसाराची,
माझा तू अन् तुझी आस जणू
मी...
सौ. शारदा श्रीकृष्ण
वानखेडे-चोपडे परभणी
९८२३०६६६०६

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.

हनिमून शब्दाची उत्पत्ती : "मीड" नावाच्या ड्रिंकपासून याची सुरुवात झाली. इंग्लंडमध्ये सुरुवातीच्या काळात लग्नाच्या वेळी जोडप्याला एक पेय दिलं जात असे. ज्यात मुख्यतः भरपूर प्रमाणात मध (हनी) पाणी आणि काही मसाले (स्पायसेस) यांचं मिश्रण केलेलं असे. यामध्ये उत्साहवर्धक आणि जननशक्ती वाढवणाऱ्या घटकांचा समावेश केलेला असे. हे पेय लग्न झाल्यापासून दररोज रात्री पौर्णिमेपर्यंत म्हणजेच चंद्राचे पूर्ण दर्शन होऊपर्यंत दिले जात असे. म्हणून याला हनी म्हणजे मध आणि मून म्हणजे चंद्र, पौर्णिमा असं म्हटलं गेलं. अशा पद्धतीने या हनिमून शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. दैनंदिन धावपळीच्या जीवनातून थोडसं बाजूला जाऊन या लग्नादरम्यान, सगळयांच्या गाठीभेटीतून थोडसं एकांत मिळण्यासाठी तयार करण्यात आलेली एक प्रथा म्हणजे हनिमून. हे फक्त लग्नानंतर एकदाच करायचे असते का ? खरं म्हणजे लग्नाच्या प्रत्येक वाढदिवसाला हा हनिमून साजरा होणं आवश्यक आहे. म्हणजेच खरं हनी आणि खरा मून तयार होत राहील आणि तो आयुष्यभर टिकेल. जेव्हा हनीमधला गोडवा आणि मूनमधील चंद्रकलेत अंतर पडते त्या वेळी मग ग्रहण लागतं आणि तुमच्या आयुष्यातील सुखी जीवनाच्या मंत्राची गुरुकिल्ली काय हे शोधावं लागतं. हनिमूनचे समानार्थी शब्द १. आनंद मास, २. मधु मास, ३. सुहाग मास, ४. सुहाग रात, ५. प्रमोद काल, ६. मधुर चंद्र हनिमूनला गेल्यानंतर काय कराल ? १. एकमेकांना ओळखा, जवळीक वाढवा आता खर तर आजकाल हा प्रश्न येत नाही. कारण बऱ्याच वेळा लग्नाच्या आधी गाठीभेटी होत असतात. त्यात ओळख झालेली असतेच. मात्र जेव्हा तुम्ही हनिमूनला जाल तेव्हा तिथे गेल्यानंतर लगेचच सेक्सची घाई न करता पहिल्यांदा एकमेकांशी बोला, चर्चा करा. एकमेकांच्या आवडी-निवडी, छंद याबद्दल जाणून घ्या. जसं एकमेकांना आवडतं तसं राहण्याचा प्रयत्न करा. खाण्यापिण्याच्या आवडी जाणून तशा पद्धतीचे पदार्थ मागवा आणि अगदी प्रेमानं, आपुलकीने ते ग्रहण करा म्हणजे खा... म्हणजे थोडक्यात जवळीक वाढवा, स्नेह, आदर, आपुलकी, प्रेम हे सर्व आपोआप निर्माण होतं आणि मग हळूहळू दोघांतील अंतर कमी होऊन त्याच रूपांतर शरीर एक होण्यात होतं. २. काहीतरी वेगळं करण्याचा प्लॅन करा. काही तरी वेगळं याचा अर्थ असा आहे की लग्नापर्यंतच्या आयुष्यात जे रुटीन लाईफ तुम्ही जगत आलात त्यापेक्षा काही वेगळं करण्याचा प्रयत्न करा. जे तुमच्यासाठी नवीन असेल.






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

स्विमिंग करत नसाल तर ते करा, एकाच ताटात खाल्लं नसेल तर ते करून पाहा, एकच आईस्क्रीम दोघांत खाऊन पाहा, जे कपडे तुम्ही नेहमी परिधान करता त्यापेक्षा काही वेगळे ड्रेसेस घालून पाहा. सिनेमा, नाटक, मनोरंजनाचे कार्यक्रम असतील तर ते अटेंड करा. या सर्व गोष्टींमुळे तुमच्यातील अनोळखीपणा संपेल आणि तुम्ही एकमेकांच्या अधिक जवळ याल. ३. प्रसन्न वातावरण - ज्या हॉटेल रुममध्ये तुम्ही वास्तव्य केलं असेल त्या रुममधील वातावरण कसं आहे? तिथे तुम्हाला आवश्यक अशा सुखसोई आहेत का? तिथे आवश्यक अशी शांतता आणि एकांत आहे का? अंथरुणं तसेच पांघरुण स्वच्छ आणि पांढरीशुभ्र असावीत. त्यामुळे मन आणखी प्रसन्न आणि प्रफुल्लित होईल. ४. ईट अन्ड ड्रिंक एखाद्या दिवशी कॅण्डल लाईट डिनरचा प्लॅन करा - आवडीचे पदार्थ, ज्यूस, कॉकटेल असं मागवून ते अगदी शांतपणे, गप्पा मारत, एकमेकांना भरवत असं एंजॉय करा. निवांतपणे टी.व्ही., मोबाईल या गोष्टी बाजूला ठेवून पूर्ण वेळ एकमेकांना द्या. म्हणजे त्या कॅन्डल लाईट डिनरची मजा दोघांनाही घेता येईल. ५. वाद, भांडण टाळा. अनेक वेळा जर ती दोघं एकमेकांसाठी अनोळखी असतील तर स्वभाव नीट माहीत नसतात. सवयी हा प्रत्येकाच्या खासगी आयुष्याचा एक भाग असतो. त्या नीटशा माहीत झालेल्या नसतात. अशा वेळी एखादी न पटणारी बाब घडू शकते. त्या वेळी समोरच्या व्यक्तीसोबत वाद किंवा भांडण न करता तिला किंवा त्याला आपली भूमिका, आपलं म्हणणं पटवून देण्याचा प्रयत्न करा. एकमेकांची मनं सांभाळा. आपल्या वागण्यामुळे समोरची व्यक्ती दुःखी होणार नाही, दुखावली जाणार नाही याची काळजी घ्या.

# “तुम आ गए हो नूर आ गया है.”

आधुनिक केसरी

बंगाली चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार सुचित्रा सेन आणि चतुरस्र संजीव कुमार या अव्वल जोडीचा गुलजारदिग्दर्शित `आंधी' (१९७५) हा चित्रपट एक सुखद अनुभव होता. त्या काळातील राजकीय वादाची झळ पोहोचल्यानेही `आंधी' दीर्घकाळ लक्षात राहील.

निर्माते जे. ओम प्रकाश यांनी १९७० साली या चित्रपटाची जुळवाजुळव सुरू करून दिग्दर्शनाची धुरा गुलजार यांच्यावर सोपविली. पटकथा तयार झाली. आरती देवीची भूमिका वैजयंतिमाला यांना देऊ करण्यात आली ; पण ती व्यक्तिरेखा दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे व्यक्तिमत्त्व व खासगी आयुष्य यावर बेतलेली आहे, असा समज करून घेऊन त्यांनी नकार दिला. प्रत्यक्षात आरती देवीचे पात्र तारकेश्वरी सिन्हा आणि इंदिरा गांधी या दोन तडफदार राजकीय व्यक्तिमत्त्वांवरून केवळ प्रेरित झाले होते. मग सुचित्रा सेन यांचे नाव पुढे आले. गुलजार कथा घेऊन कोलकत्याला गेले. सुचित्रा सेन यांनी त्यात काही बदल करण्याचा आग्रह धरला. गुलजार यांनी अर्थातच तसे करण्यास नकार दिला. त्यानंतर काही कालावधी गेला. एव्हाना मुंबईत गुलजार हे प्रस्थ बनले होते. मग मात्र सुचित्रा सेन पटकथेला जराही हात न लावता आरती देवीची भूमिका करण्यास तयार झाल्या. परिणामी चित्रीकरण पूर्ण होऊन चित्रपट प्रदर्शित होण्यास ५ वर्षे विलंब झाला. सुचित्रा सेन यांचा हा अखेरचा हिंदी चित्रपट ठरला; कारण १९७८ साली त्या चित्रपटसृष्टीतून अधिकृतपणे निवृत्त झाल्या. संजीव कुमार यांना `आंधी'साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे `फिल्मफेअर' पारितोषिक मिळाले. १९७५ मधील आणीबाणीत या चित्रपटावर काही काळ बंदीही आली होती. हा चित्रपट नंतर लोकप्रिय झाल्यावर भूमिका सोडल्याचा वैजयंतिमाला यांना पश्चात्ताप झाला.



या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे निसर्गरम्य शहरातील एका हॉटेलचा जे. के. (संजीव कुमार) हा व्यवस्थापक. स्थानिक राजकारण्याची कन्या आरती (सुचित्रा सेन) हिला तो एका बांक्या प्रसंगातून धाडसाने वाचवितो. त्यावेळी आरती मद्याच्या नशेत असते. नंतर ती भानावर येते. तिला घडलेला प्रकार समजतो. ती दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात. साध्या पद्धतीने त्यांचा विवाह होतो. त्यांना कन्यारत्न प्राप्त होते. पण आता त्यांच्यांत मतभेद सुरू होतात. ते वाढतच जाऊन दोघे विभक्त व्हायचे ठरवितात. अनेक वर्षे उलटतात. आता ती प्रख्यात राजकारणी आरती देवी बनलेली असते. जे. के. आणि आरती देवी अनेक वर्षांनी एकमेकांना भेटतात. आजही त्यांचे एकमेकांबद्दलचे आकर्षण कायम असते. पण आपली जनमानसातील प्रतिमा तिला `विभक्त स्त्री' म्हणून मलिन व कलंकित व्हायला नको असते. चित्रपटाचा शेवट काय होतो ? या चित्रपटातील लता मंगेशकर आणि किशोर कुमार यांच्या तीन द्वंद्वगीतांपैकी “तुम आ गए हो नूर आ गया है” या प्रणयगीताचे चित्रीकरण गुलजार यांनी काश्मीरमधे श्रीनगरच्या `परी महल गार्डन्स'मधे इतके बहारदार केले आहे, की प्रेक्षक खूष होतात.

संजीव कुमार आणि सुचित्रा सेन यांचा असामान्य अभिनय पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते. एका लालभडक टपोऱ्या गुलाबपुष्पावर कॅमेरा आणि गीत सुरू होते. किशोर कुमार यांची पहिली ओळ अन संजीव कुमार दोन्ही बाजूंनी फुलांनी सजलेल्या जागेतून चालत येतात. मग नयनमनोहर रंगांच्या डेलिया-गुलाबाच्या फुलांची जणू रेलचेलच ! एक घार आकाशात तरंगताना दिसते. आता लता मंगेशकर यांची ओळ अन सुचित्रा सेन चालत येतात तेव्हा कॅमेरा झूम आऊट होतो. केवळ अप्रतिम ! सुचित्रा सेन निळसर प्रिंटेड रेशमी साडीत कमालीच्या मोहक दिसतात. संजीव कुमार पिवळ्या रंगाच्या गुलाबाचे फूल तोडून त्यांच्या केसांत माळतात तेव्हाचा त्यांचा अभिनय लाजवाब ! राहुल देव बर्मन यांनी पहिल्या अंतऱ्यात गिटारचा तुकडा तर दुसऱ्या अंतऱ्यात सॅक्सोफोन व ग्रुप व्हायोलिनचा वापर केला आहे. दुसऱ्या कडव्याच्या आधी कॅमेरा झूम आऊट होतो तेव्हा कारंजे आणि इंद्रधनुष्य दिसते. गीत संपते तेव्हा पुन्हा लाल गुलाबावर कॅमेरा ! गुलजार यांचे गीतलेखन-दिग्दर्शन व नामवंत छायालेखक के. वैकुंठ यांचे दर्जेदार छायालेखन यांना त्रिवार सलाम ! या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

**तुम आ गए हो**
**नूर आ गया है**
**नहीं तो चरागों**
**से लौ जा रही थी**
**जीने की**
**तुमसे वजह मिल**
**गई है**
**बडी**
**बेवजह जिंदगी जा**
**रही थी**

जे. के. आरती देवीला म्हणतो, तू आलीस आणि सगळीकडे तेज पसरले आहे; नाही तर दिव्यांमधून ज्योती निघून चालल्यासारखे वाटत होते. यावर त्याला प्रतिसाद देताना ती म्हणते, तुझ्यामुळे आता जगण्याला कारण मिळाले आहे. आयुष्य विनाकारणच व्यतीत होत होते.

**कहां से चले कहां के लिए**
**ये खबर नहीं थी मगर**
**कोई भी सिरा जहां जा मिला**
**वहीं तुम मिलोगे**
**हम तक तुम्हारी दुआ आ रही थी**

तो म्हणतो, कोठून निघालो, कशासाठी चाललो आहे याची काहीच कल्पना नव्हती; पण एखादे टोक जिथे दुसऱ्या टोकाला जाऊन मिळते तिथे तू भेटशील असे वाटत होते. तुझी प्रार्थना माझ्यापर्यंत पोहोचली होती.

**दिन डूबा नहीं रात डूबी नहीं**
**जाने कैसा है सफर**
**ख्वाबों के दिये आखों में लिए**
**वहीं आ रहे थे**
**जहां से तुम्हारी सदा आ रही थी**

यावर आरती देवी म्हणते, दिवस मावळलेला नाही आणि रात्रही संपलेली नाही ! विलक्षणच प्रवास म्हणायचा हा ! जिथून तुझा आवाज येत होता तिथेच स्वप्नांचे दीप नयनांत घेऊन मी येत होते.

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# महान गायक मोहम्मद अझीझ



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**प्रख्यात गायक मोहम्मद अझीझ यांचा 27 नोव्हेंबर हा स्मृतिदिन. ज्याला मुन्ना (प्रख्यात संगीतकार अक्षया मोहंती यांनी दिलेले नाव) म्हणूनही ओळखले जाते, ते एक भारतीय बहुभाषिक पार्श्वगायक होते. ज्यांनी प्रामुख्याने बॉलीवूडसाठी गाणे गायले. बंगाली आणि त्यांनी सुमारे वीस हजार गाणी गायली, ज्यात भजने, सूफी भक्तीगीते आणि दहाहून अधिक भारतीय भाषांमध्ये इतर शैलींचा समावेश आहे. त्याने मोहम्मद मोहसीन दिग्दर्शित जगा हाथरे पाघा नावाच्या ओडिया चित्रपटात रुपा सगदी रे सुना कानिया या गाण्याने पहिली भूमिका केली.**

हे ओडिशातील सर्वात लोकप्रिय गाण्यांपैकी एक आहे आणि जवळजवळ सर्व विवाहांमध्ये गायले जाते. नंतर त्यांनी ओडियामध्ये आणि ऑलिवूड अभिनेता सिद्धांत महापात्रासाठी सर्वाधिक गाणी गायली . नंतर तो अंबर (1984) या हिंदी चित्रपटात दिसला आणि अनु मलिक यांनी संगीतबद्ध केलेल्या "मर्द टांगेवाला" यासह त्यांची दोन प्रमुख गाणी मर्दमध्ये सादर करण्यात आली.

त्यांनी 1980 आणि 1990 च्या दशकात लता मंगेशकर, आशा भोसले, के.एस. चित्रा, सुलक्षणा पंडित, विजया पंडित, उषा मंगेशकर, अनुराधा पौडवाल , कविता कृष्णमूर्ती, साधना अलका, अगं सल्का, याग सल्का या गायकांसोबत अनेक युगल गीते गायली होती. मलता, सपना मुखर्जी , चंद्राणी मुखर्जी, पौर्णिमा, सारिका कपूर, उत्तरा केळकर आणि अलिशा चिनाई. “मैं दीवाना ना जाना कब”, “तुने बेचैन इतना ज्यादा किया”, “मैं तेरी मोहब्बत में पागल हो जाऊंगा”, “लाल दुपट्टा मलमल का”, “माय नेम इज लखन”, “आप के आ” अशी त्यांची अनेक गाणी. जाने से, "आजकल याद कुछ" आणि "दिल ले गई तेरी बिंदिया" ही त्यांनी पार्श्वगायक म्हणून गायलेली प्रमुख गाणी ओळखली जातात. तो ७व्या सूर (सातवन सूर) वर गाऊ शकत होता. मूलतः एक रेस्टॉरंट गायक, तो 1984 च्या सुमारास मुंबईला गेला, जिथे त्याची ओळख अनु मलिकने हिंदी चित्रपटसृष्टीत केली. सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचे दोन अनिश्चित पुरस्कार प्राप्तकर्ता, काफिला हा त्याचा शेवटचा चित्रपट होता. याआधी त्याने करण अर्जुन या चित्रपटासाठी गाणे गायले आहे.



बालपणीच ते संगीताशी निगडित होते. नंतर त्याने आपल्या व्यावसायिक संगीत कारकिर्दीची सुरुवात ओडिया चित्रपटातील मानिनी (1979) ग्रेट ओडिया संगीतकार राधा कृष्ण भांजा यांच्या अंतर्गत चित्रपटातून केली आणि नंतर त्याने ओडिया आणि ऑलिवूड अभिनेता सिद्धांत महापात्रात सर्वाधिक गाणी गायली. नंतर तो बौमा (1986) नावाच्या बंगाली चित्रपटात दिसला. चित्रपटसृष्टीतील चांगल्या करिअरच्या संधींसाठी तो मुंबईला गेला, जिथे त्याची ओळख सपन-जगमोहन यांच्या बॉलीवूडमधील अंबर (1984) चित्रपटातून झाली; तथापि , संगीत दिग्दर्शक अनु मलिक यांच्या मर्द चित्रपटात त्यांची पहिली प्रमुख गायन भूमिका दिसली . या चित्रपटाचे ‘मर्द टांगेवाला’ हे शीर्षकगीत सुपरहिट ठरले. या गाण्याच्या यशानंतर त्याला 1985 मध्ये " जान की बाजी " मधील "आते आते तेरी याद आ गई" सारखे अनेक हिट चित्रपट मिळाले . तेव्हापासून, त्या दशकात बॉलीवूड फिल्म इंडस्ट्रीमध्ये तो सर्वाधिक मागणी असलेला गायक होता. नौशाद, शंकर-जयकिशन, ओ.पी. नय्यर, रवी, खय्याम, कल्याणजी-आनंदजी, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, आरडी बर्मन, बप्पी लाहिरी , राजेश रोशन, उषा खन्ना, अनु मलिक, आनंदिल, यांसारख्या अनेक प्रसिद्ध संगीत दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले. -ललित, रवींद्र जैन, रामलक्ष्मण, आदेश श्रीवास्तव, नदीम-श्रवण, विजू शाह, दिलीप सेन-समीर सेन आणि इतर. त्यांनी लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्यासाठी जवळपास २५०+ गाणी गायली आहेत जी त्यांनी गायलेल्या कोणत्याही संगीतकारांसाठी सर्वाधिक आहे. हिंदी भाषेतील चित्रपटांमध्ये पार्श्वगायक म्हणून ओळख होईपर्यंत त्यांनी भगवान जगन्नाथ, भजन, खाजगी संगीत अल्बम आणि ओडिया चित्रपट गाणी देखील गायली होती. त्यांनी 1997 च्या टीव्ही मालिका जय हनुमानचे शीर्षक गीत गायले. चित्रपटांमध्ये काम करण्यासोबतच त्यांनी भारत आणि इतर देशांतील स्टेज शोमध्येही भाग घेतला. आपल्या कारकिर्दीत, मोहम्मद अझीझ यांनी बॉलीवूड अभिनेते दिलीप कुमार, शम्मी कपूर, धर्मेंद्र, जितेंद्र, अमिताभ बच्चन, राजेश खन्ना, विनोद खन्ना, शत्रुघ्न सिन्हा, शशी कपूर, ऋषी कपूर, मिथुन चक्रवर्ती, नसीरुद्दीन पान्ये, नसीरुद्दीन शाहू , ऋषी कपूर यांच्यासाठी गाणी गायली आहेत. गोविंदा, संजय दत्त, कुमार गौरव, सिद्धांत महापात्रा, शाहरुख खान, नाना पाटेकर, रजनीकांत, कमल हासन, राज बब्बर, सनी देओल, अनिल कपूर, अक्षय कुमार, अजय देवगण, सुमीत सैगल, अद आणि इतर अनेक. महिला गायकांव्यतिरिक्त, तो किशोर कुमार, अमित कुमार, एसपी बालसुब्रह्मण्यम, सुरेश वाडकर, मनहर उधास, शैलेंद्र सिंग, नितीन मुकेश, कुमार सानू, विनोद राठोड आणि सुदेश भोसले यांच्यासोबत काही युगलगीतांमध्ये दिसला.

27 नोव्हेंबर रोजी ते कोलकाताहून मुंबईला येत होते आणि त्यानंतर ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर कोसळले आणि त्यांना वैद्यकीय उपचारासाठी नानावटी रुग्णालयात नेण्यात आले. 27 नोव्हेंबर 2018 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने, वयाच्या 64 व्या वर्षी या महान गायकाचे रुग्णालयात निधन झाले.



# खुलताबाद येथे तब्लीगी उमुमी इज्तेमाचा दुआने समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथे हजरत खाव्जा जर जरी जर बक्ष दर्गा उर्स मैदानावर आयोजित दि २३-२४ दोन दिवसीय तालुकास्तरीय तब्लीगी उमुमी इज्तेमाची दि.२४ रोजी संध्याकाळी नमाज ए मगरीब ते नमाजे इशा दरम्यान उमुमी बात झाल्यानंतर शेकडो मुस्लिम बांधवांच्या हजेरीत महाराष्ट्र राज्याचे अमीर मौलाना हाफीज मंजुर साहेब यांच्या दुआने समारोप झाला. दि.२३-२४ दोन दिवस इज्तेमात नमाजे फजर जोहर असर मगरीब इशा दरम्यान दिन दुनिया इमान नमाज इल्म जिक्र इक्राम इखलास दावत हज जन्नत दोजख बरोबरच अल्लाह हजरत आदम अलै सलाम ते नबी हुजूर मोहम्मद सल्ललाहो सल्लम, इतर नबी सहाबा यांचे कार्य दैनंदिन जीवन त्यांनी घेतलेला त्रास दिन ला घेवून केलेले कार्य बलीदान, केलेले दान नबी यांच्यासाठी सांगितलेले कार्या बद्दल दिलेली दावत व त्यासाठी घेतलेली मेहनत आदि यावर दोन दिवस अनेक मौलानांनी सविस्तर मार्गदर्शन केले.तर आई वडिल शेजारी लहान मोठे गाव देश या संदर्भात सर्वांनी मान समान करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले व अल्लाह व नबी हु.स.स. यांनी सांगितलेल्या कुरान हदिस वर चालून आपली दिनचर्या सतत सलग ठेवून मृत्यू ( मौत) पर्यंत कार्य करण्याचे व ते शिकण्यासाठी साल चार महा चाळीस दिवस तीन दिवस घर कुटुंब सोडून शिकवणी घेत पुन्हा घरी येवून मस्जिद चे पाच काम काम करण्या वर भर देत .त्या कार्यासाठीच इज्तेमाचे आयोजन होते व सविस्तर मार्गदर्शन करून इज्तेमाचे दुआने समारोप झाले.इज्तेमासाठी खुलताबाद शहर सह ग्रामीणांनी सेवा केली. इज्तेमात येणाऱ्यांसाठी स्वच्छता, पाणी, शौचालय, अंघोळव्यवस्था,दवाखाना,जेवण,बिछायत,लाईटिंग,वहान व्यवस्था, स्पिकर व्यवस्था,बाजार व्यवस्था, विविध नियोजन शहरवासीयांनी करुन मुस्लिम बांधवांचे मन जिंकून घेतले. खुलताबाद शहरात तब्लीगी उमुमी इज्तेमा प्रथमच झाल्याने शहरवासीयांत मोठी उत्सुकता पहाण्यास मिळला व शहर ग्रामीणमधून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित झाले होते.

# दिवाळी अंकरूपी फराळाचा नागरिकांनी लाभ घ्यावा : शृंगारे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, राधामोहन कॉलनी,खोकडपुरा,छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील दिवाळी अंकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन दि.२४/११/२०२३ रोजी श्री चं.रो.शृंगारे, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी,मानव विकास आयुक्तालय यांचे हस्ते संपन्न झाले. यावेळी त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना दिवाळी अंक रुपी फराळाचा नारिकांनी लाभ घ्यावा असे प्रतिपादन केले.

कार्यालयात विविध विषयांवरील दर्जेदार दिवाळी अंक उपलब्ध असुन नागरिकांनी ह्या दिवाळी अंक प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे प्रतिपादन जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री सुभाष साबळे यांनी केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री देवीदास राऊत,सेवा निवृत्त लघु लेखक, जिल्हाधिकारी कार्यालय हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री सुधाकर गायधनी, तांत्रिक सहाय्यक यांनी केले तर आभार श्री संजय कर्वे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय ठाकुर, श्रीमती नाटकर यांनी सहकार्य केले.




# स्वच्छ उरण सुंदर उरण, नगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियानाअंतर्गत साफसफाई

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :**मागील महिन्या प्रमाणे दिनांक २४/११/२०२३ रोजी उरण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.सदर अभियानात उरण शहरातील तहसील कार्यालय परिसर ते मशीद मोहल्ला ते महात्मा गांधी पुतळा ते हरीपांडवपथ पर्यंत परिसरात स्वछता अभियान घेण्यात आले . सदर अभियानात एकूण ३ टन कचरा उचलण्यात आला. या अभियानात उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, लेखापाल सुरेश पोसतांडेल, बांधकाम अभियंता झुंबर माने , आरोग्य निरीक्षक हरेश तेजी , प्रशासकीय अधिकारी अनिल जगधानी, कर निरीक्षक संजय डापसे, तसेच उरण नगर परिषदेचे सफाई कर्मचारी / मुकादम यांचे श्रमदानातून स्वछता अभियान पार पडले. तसेच उरण नगर परिषद शाळा क्र १,२,३ चे शिक्षक तसेच विद्यार्थी यांनी सदर अभियानात भाग घेऊन श्रमदान केले. या अभियानामुळे उरण नगर परिषद हद्दीतील परिसर स्वच्छ व सुंदर झाले. शहर स्वच्छ व सुंदर झाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त केला. नागरिकांनी नगर परिषदेचे आभार मानले.



# वेरूळ गुरुकुलमध्ये आज पिंच्छी परिवर्तनचा समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** ऐतिहासिक नामांकित वेरूळ येथील पार्श्वनाथ ब्रह्मचारी असून जैन गुरुकुल मध्ये परमपूज्य 108 आचार्य विद्यासागर महाराज यांचे प पू शिष्य 108दुर्लभ सागर महाराज व प पू 108संधान सागर महाराज यांचा मांगलिक चातुर्मास वेरूळ येथील पार्श्वनाथ ब्रम्हचारी आश्रम जैन गुरुकुल मध्ये आनंद संपन्न होत आहे.चातुर्मास समाप्ती निमित्ताने रविवार दिनांक 26 रोजी भव्यातीभव्य पिंछी परिवर्तनाचा समारंभाचे आयोजन वेरूळ येथील जैन गुरुकुल या ठिकाणी करण्यात आले आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमात सकाळी मंदिरात सकाळी सहा अभिषेक पूजन चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 7.30वाजता वेरूळ गुरुकुल मधून भव्य प्रभात फेरी काढण्यात येणार असून या प्रभात फेरीमध्ये पंजाब येथून भव्य बँड, डीजे, रथ, बैलगाडी, बग्गी व घोडे इ धर्म प्रभावक साधनचा समावेश असणार आहे. तसेच परमपूज्य 108 दुर्लभ सागर महाराज व संधान सागर महाराज यांच्या मयूर पिंछी ची बग्गी मधून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. तसेच अष्टाणिक पर्वामध्ये ज्यानी उपवास केले त्यांची देखील यावेळी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या कार्यक्रमात ज्या श्रावक श्राविकांनी संयमाचे पालन केले आहे अशा ना लकी ड्रॉ पद्धतीने परमपूज्य 108 दुर्लभ सागर महाराज यांची पिंछी दिली जाणार असून व अशाच प्रकारे नवीन मयूर पिंछी चे प्रदान करण्यात येणार आहे. पार्श्वनाथ ब्रह्मचारी आश्रम जैन गुरुकुल चे विश्वस्त मंडळा कडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेतर्फे विश्वस्त दिनेश गंगवाल डॉ प्रेमचंद पाटणी गौतम भाऊ ठोळे, सुमित ठोळे, नवीन पाटणी, मदनलाल पांडे, पाटोदी यांच्यातर्फे करण्यात आले आहे, अशी माहिती प्रसिद्धी विभाग प्रमुख राजकुमार पांडे अतुल बांदे पियुष गंगवाल यांच्यातर्फे देण्यात आली आहे.



# श्रीराम मंदिरात अन्नकोट उत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील श्रीराम मंदिर ट्रस्ट, गणपती चौक उरण शहर येथे श्रीराम मंदिरात अन्नकोट उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.अन्नकोट म्हणजे विविध पदार्थ तयार करून ते देवाला नैवेद्य दाखविणे होय.देव दिवाळी सणाच्या मुहूर्तावर अन्न कोटचे आयोजन अनेक ठिकाणी करण्यात येते. उरण शहरातील गणपती चौकातील श्रीराम मंदिरात 150 हुन अधिक पदार्थ अन्न कोट उत्सवा प्रसंगी ठेवण्यात आले होते. या पदार्थांचा नैवेद्य देवाला अर्पण करण्यात आला. आरती झाल्यानंतर, देवाला नैवेद्य अर्पण केल्यानंतर ते पदार्थ प्रसाद म्हणून भाविक भक्तांना वाटण्यात आले.



# सुरभीच्या पारायणाने, तर देशपांडे यांच्या निरुपणाने भावविभोर

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** गजानन महाराजांच्या जयजयकाराने अगदी पहिल्या अध्यायापासून तर सातवा अध्यायापर्यंत मुखोद्गत पारायण पुण्याच्या सुरभी ढगे हीने चंद्रपूरकरांसमोर सादर केले. सुरभी ढगे या आठ वर्षीय मुलीने आपल्या मुखोद्गत पारायणादरम्यान केलेले , हातवारे ,तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव या सगळ्यामुळे चंद्रपूरकर अक्षरशः मंत्रमुग्ध झाले तर सुनील देशपांडे यांच्या निरुपणाने भक्तीयोगाचा अर्थ समजावून घेतांना भावविभोर झालेत.

संत गजानन गौरवगाथा समिती द्वारे स्थानिक वडगाव स्थित गजानन महाराज मंदिरात तीन दिवसीय पारायण व निरुपण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमातील मुखोद्गत पारायणासाठी पुण्यावरून सुरभी ढगे तर अकोला येथील सुनिल देशपांडे यांना आमंत्रित करण्यात आले आहे. तिन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात सुरभीचे मुखोद्गत पारायण व नंतर सुनिल देशपांडे हे आपल्या निरुपणातून भक्तीयोगावर प्रकाश टाकणार आहेत. स्थानिक गजानन महाराज चौक येथून गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्याने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. टाळ मृदुंगाच्या गजरात भजन गात ही पालखी मंदिरात आणण्यात आली. प्रवेशद्वारावरच सुरभीचे औक्षवान करण्यात आले. मंदिरात दर्शन घेऊन सुरभी ने आपल्या ओघवत्या वाणीने गजानन महाराजांचा जयजयकार करीत पहिल्या अध्यायापासून सातव्या अध्यायापर्यंत चंद्रपूरकरांना खिळवून ठेवले. यादरम्यान तिच्या निरागस चेहऱ्यावरील हावभाव , तीची देहबोली आणि तीला मुखोद्गत झालेले सर्व अध्याय हे पाहून चंद्रपूरकर मंत्रमुग्ध झाले. सुनिल देशपांडे यांनी आपल्या निरुपणाला सुरवात करतांनाच सुरभीने सादर केलेल्या पारायणातून तिच्या चेहऱ्यावर भक्तीचे तरंग उमटलेले दिसतात हा गजानन महाराजांचा तिच्यावर असलेला आशिर्वाद आहे असे म्हणत तीच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आपल्या निरुपणातून त्यांनी आज भक्तीयोगावर प्रकाश टाकत भक्तीरसाचे विविध उदाहरण व दाखले दिले. कार्यक्रमाच्या शेवटी सगळ्यांना महाप्रसादाचे वितरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. महाप्रसादा दरम्यान प्रत्येकाच्या तोंडावर सुरभीचे वय , तिचे पाठांतर, तीचे सादरीकरण याचीच सर्वत्र चर्चा पाहायला मिळत होती. येत्या 26 तारखेपर्यंत सायंकाळी पाच ते आठ या वेळेत हा कार्यक्रम होणार असून चंद्रपूरकरांनी या पारायण व निरुपणाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन श्री संत गजानन गौरवगाथा समितीच्या वतीने जयंत मामीडवार यांनी केले आहे.

# मालमत्ता करात ५ टक्के सूटचा लाभ घ्या

## ३१ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन पद्धतीने भरणा केल्यास पुढील वर्षी विशेष सवलत

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** नियमित मालमत्ता कर भरणा करणाऱ्यांकरीता प्रोत्साहन म्हणुन ३१ डिसेंबरपर्यंत मालमत्ता कराचा एकमुस्त भरणा केल्यास चालू आर्थिक वर्षासाठी ५ टक्के सूट तसेच ऑनलाईन पद्धतीने कराचा एकमुस्त भरणा करणाऱ्यांना पुढील वर्षी विशेष सवलत देण्याचे मनपातर्फे जाहीर करण्यात आले आहे.

मालमत्ता कर हे मनपाच्या उत्पन्नाच्या प्रमुख स्रोतांपैकी एक आहे. शहरासाठी नियमित सोयी सुविधा पुरविण्यास मालमत्ता कराची अधिकाधिक वसुली होणे गरजेचे आहे. महापालिका क्षेत्रात जवळपास ८० हजार मालमत्ता असून, संपूर्ण मालमत्तांच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे मागणी नोंदवली जाते. करदात्यांना कराची नोटीस पाठवून कर भरणा करण्यासाठी विनंती करणे ही कर विभागाची पहिली प्रक्रिया मानली जाते. जास्तीत जास्त वसुली होऊन ती शहराच्या विकास कामांसाठी उपयोगी यावी या अनुषंगाने करवसुलीस प्राधान्य दिले जाते.

करभरणा हा प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन अथवा HTTPS://CHANDRAPURMC.ORG या लिंकवर मालमत्ता कराचा ऑनलाईन भरणा करता येणे शक्य आहे. ऑनलाइन युपीआय ॲप अर्थात फोन पे, गुगल पे,भीम ॲप ( भारत इंटरफेस फॉर मनी ) यांचाही पर्याय मनपाने उपलब्ध करून दिलेला आहे.तसेच व्हॉट्सॲप चॅटबॉटचा वापर करून सुद्धा मालमत्ता कर भरता येणार असुन याकरिता 8530006063 या क्रमांकावर वर "HI" टाईप करून आलेल्या उत्तरात ४ था क्रमांकाचा पर्याय निवडुन कर भरता येईल.

मालमत्ता करात देण्यात येत असलेली सुट ही औद्योगीक मालमत्तेस लागु राहणार नाही. एकुण मालमत्ता करात सदर सुट देण्यात येत असल्याने मालमत्ता कर त्वरित भरण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.



# शाळा मूल्यांकन आराखडा अंतिम टप्प्यात, डिसेंबर महिन्यात पायलट प्रोजेक्ट

आधुनिक केसरी न्यूज

> राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिकमधील शिक्षणाच्या सर्व टप्प्यांसाठी, सर्व शाळांसाठी खाजगी तसेच शासकीय शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी व मानांकन ठरविण्यासाठी आवश्यक गुणवत्ता मानके सुनिश्चित केली जातील असे म्हटले आहे . त्यानुसार आराखडा तयार करण्यासाठी एससीईआरटी पुणे येथे कार्यशाळा पार पडत आहे . आराखडा निर्मितीनंतर पायलट प्रोजेक्टही राबविण्यात येणार आहे . - **डॉ . जगदीश पाटील**

**भुसावळ :** राज्यातील शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी स्कूल क्वॉलिटी एशुरन्स ॲण्ड ॲक्रिडेशन फ्रेमवर्क निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आले असून त्यासाठी अंतिमीकरण कार्यशाळा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथे दि. 6 ते 7 नोव्हेंबर 2023 दरम्यान पार पडली. एससीईआरटीचे संचालक डॉ. अमोल येडगे, सहसंचालक डॉ. रमाकांत काठमोरे, उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित अंतिमीकरण कार्यशाळेत संकीर्ण विभाग प्रमुख तथा SQAAF चे राज्य प्रमुख डॉ. राजेंद्र वाकडे, एससीईआरटी विषय सहाय्यक सौ. भक्ती जोशी, शिक्षणतज्ज्ञ माजी प्राचार्य डॉ. ह. ना. जगताप सोलापूर, विद्या समीक्षा केंद्राचे राज्य समन्वयक असिफ शेख, शाळासिद्धीचे राज्य निर्धारक तथा बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील जळगाव, डॉ. नागनाथ येवले यांचा सहभाग होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी प्रत्येक राज्याने शाळा गुणवत्ता मूल्यांकनाचा आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार स्कूल क्वॉलिटी एशुरन्स ॲण्ड ॲक्रिडेशन फ्रेमवर्कची (SQAAF) निर्मिती करण्यात येत आहे. त्याअंतर्गत राज्यभरातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी मार्गदर्शक आराखडा विकसित केला जात आहे. त्यासाठी आतापर्यंत तीन कार्यशाळा पार पडल्या. चौथ्या कार्यशाळेत आराखड्याचे अंतिमीकरण करण्यात आले. यानंतर या आराखड्याची चाचपणी करण्यासाठी राज्यभरातील निवडक शाळांमध्ये येत्या डिसेंबर महिन्यात पायलट प्रोजेक्टही राबविण्यात येणार आहे.

# दिशादर्शक फलकास धडकून एक ठार, एक गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** चौका घाटाजवळ किलोमीटर दर्शवणाऱ्या फलकास दुचाकी धडकून एक जण ठार तर एक जण जखमी झाल्याची घटना शुक्रवारी दि. २४ रोजी घडली. गंगाधर अजिनाथ इघाटे (२३, रा. शेलगाव खु., ता. फुलंब्री) असे मृताचे तर अभिषेक अण्णा इधाटे (२०) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. गंगाधर इधाटे व अभिषेक इघाटे हे छत्रपती संभाजीनगर येथे राहून इलेक्ट्रिशियनची कामे करतात, परंतु दि.२५ पासून बीए, बीएस्सीच्या परीक्षा असल्याने ते गावी शेलगाव खु. येथे दुचाकी क्र. एम. एच. २० बी व्ही. ९६६५ वरुन जात असताना चौका घाटाजवळ दुचाकीस बाजूला जाणाऱ्या वाहनाने हुलकावणी दिल्याने त्याची दुचाकी किलोमीटर दर्शवणाऱ्या दगडी खांबावर धडकली. यात गंगाधर इधाटे यांच्या छातीला जबर मार तर अभिषेकही काही प्रमाणात जखमी झाला. दोन्ही जखमींना घाटी रुग्णालयात दाखल केले.




# फुलंब्री शहरात तब्लिगी इज्तेमा शांततेत

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात देवगिरी सहकारी साखर कारखाना परिसरातील मैदानावर 21-22 नोव्हेंबर रोजी तब्लिगी इस्तेमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये शांततेत इस्तेमाची सांगता करण्यात आली. फुलंब्री तालुका व औरंगाबाद जिल्ह्यातील भाविकांनी इस्तेमाला गर्दी केली होती.

या इस्तेमात ज्या स्वयंसेवकांना (साथीना) जबाबदारी देण्यात आली होती त्यांनी ती जबाबदारी चोखपणे चांगली बजावली. पार्कींग व्यवस्था, मोफत पाणी,चहा, खाण्या पिण्याची व्यवस्था ठेवण्यात आली होती.

सलग दोन दिवस संबंधित असलेल्या मौलानांनी उपस्थिती असलेल्या मुस्लिम बांधवांना सखोल मार्गदर्शन केले.

फजर,जोहर,असर,मागरिब व इशा या नमाज पठण (अदा) करण्यात आल्यानंतर संबोधित (बयान)करण्यात आले. इस्लाम धर्माचे पैगंबर मोहम्मद सल.यांची जीवन कहाणी सांगण्यात आली. कुणाची फसवणूक नका करा, खोटे बोलु नका, गोरगरीबांची मदत करा, नमाज पठण करा असे आवाहन करण्यात आले. दि.22 नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात ते आठ वाजेच्या दरम्यान विशेष दुआ मागण्यात आली. भारतातील नागरिकांच्या कल्याणासाठी दुआ मागण्यात आली. नंतर जनसमुदायाला सोडण्यात आले.काल पासून विविध जिल्ह्यांत व पर राज्य किंवा विदेशात एक वर्ष किंवा चार महिने, चाळीस दिवस जमात मध्ये भाविक रवाना झाले. दिन ए इस्लाम धर्मातील शिकवण शिकण्यासाठी घरे सोडून गेले. अशा रीतीने फुलंब्री तालुक्यातील इस्तेमा सांगत झाली.

# घरफोडी करणाऱ्यास एलसीबीने ठोकल्या बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तक्रारदार नामे मिलींद यशवंतराव देसले, वय ५५ रा. अनमोल नगर देवपुर धुळे यांनी तक्रार दिली की, पहाटे ०३.२० वा. चे दरम्यान अज्ञात चोरटयांनी फिर्यादी यांचे घराचे कुलूप लोखंडी गजने पुढील दरवाजाचा कडीकोंडा तोडून आत प्रवेश करुन वरच्या मजल्यावरील देव घरातील ९६०००/- रु कि.चांदीच्या देवाच्या मुर्त्या, पितळी गाय-बैल अयं फिर्यादीच्या संमतीशिवाय चोरुन नेल्या होत्या बाबत त्यांनी दि. २२ नोव्हेंबर रोजी पश्चिम देवपूर पो.स्टे.ला गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा गंभीर असल्याने मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांनी आरोपीतांचा तात्काळ शोध घेवुन कारवाई करण्याबाबत पो. निरी. श्री. दत्तात्रय शिंदे, स्थागुशा, धुळे यांना आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थागुशा कडुन सुरु असतांना आरोपीतांचा शोध घेत असता, पो.निरी. श्री. दत्तात्रय शिंदे, स्था.गु.शा. धुळे यांना गुप्त बातमीव्दारे माहिती मिळाली की१ ) साहील शरीफ बेग, रा. मोगलाई धुळे २ ) रुपम दिनेश सोनवणे, रा. नकाणे रोड देवपूर धुळे हे स्नेह नगर धुळे येथे उभे आहेत अशी माहिती प्राप्त झाल्याने पो.निरी.श्री. दत्तात्रय शिंदे, स्था.गु.शा.धुळे यांनी लागलीच स्थागुशा धुळे येथील पथकास सदर ठिकाणी रवाना केले.स्थागुशाचे पथक स्नेह नगर धुळे येथे गेले असता, दोन इसम हे खांडेल विप्र भवन स्नेह नगर धुळे येथे उभे असल्याचे दिसल्याने पथकाने सापळा लावुन दोन्ही इसमास पाठलाग करुन पकडले. नमुद गुन्हया संदर्भात विचारपुस केली असता, त्यांनी नमुद गुन्हयाची कबुली देवुन घर न.१५ अनमोल नगर सिध्दीविनायक कॉलनी



देवपुर धुळे येथे घरफोडी चोरी केल्याचे सांगुन आमचे सोबत चला आम्ही घरफोडीतील चोरी केलेला मुद्देमाल काढुन देतो असे सांगुन रुपम दिनेश सोनवणे याच्या राहते घरातून१ )६८०००/-रु. कि.चे चांदीच्या मुर्त्या त्यात महालक्ष्मी, गणपती, गुरुदत्त, विठ्ठल-रुक्माई, बाळकृष्ण असे एकुण ०६ चांदीच्या मुर्त्या.

२ ) ३०००/-रु. कि.ची एक पितळी गाय एकूण - ७१०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आला असुन त्यांना मुद्येमालासह गुन्हयाचे पुढील तपासकामी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. सदरची कारवाई श्री. श्रीकांत धिवरे सो, पोलीस अधीक्षक, धुळे, श्री. किशोर काळे सो, अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे स्थागुशा धुळे, पोसई.बाळासाहेब सुर्यवंशी,अमरजीत मोरे,श्याम निकम, प्रकाश सोनार, हेमंत बोरसे, संदीप जगन्नाथ पाटील, योगेश चव्हाण, सुरेश भालेराव, पोना.प्रल्हाद वाघ, मायुस सोनवणे, तुषार सुर्यवंशी, पोकॉ. योगेश साळवे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा धुळे अशांनी सदरची कारवाई केलेली आहे.



# घोडेगाव -शंकरपूरवाडी ग्रा.पं. बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे घोडेगाव -शंकरपूरवाडी ग्रुप ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीनंतर उपसरपंच पदीची निवड प्रक्रिया दि.२४ रोजी घेण्यात आली यात सुनंदा दादासाहेब पा जाधव हे थेट जनतेतून सरपंच तर उपसरपंच म्हणून सविता गणेश अधाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी ग्रामपंचायत सदस्य वैशाली जाधव,सुचिता घोडके,मंदा ठेंगडे,दगडु पवार, शिवाजी मोरे,गणेश जाधव,राजु आव्हाड,मा.सरपंच, पांडुरंग जाधव,माउस,दादासाहेब जाधव,गणेश अधाने, विनोद जाधव, जनार्दन चव्हाण,विलास जाधव, इस्माईल पटेल, अख्तर पटेल, अमीन पठाण,बादशाह पेहलवान, ज्ञानेश्वर मेटे, दत्तु जाधव,भाऊलाल जाधव,अशोक आधाने,शाम सोनवणे, अप्पासाहेब जाधव,केशव आव्हाड,डिगांबर जाधव, पांडुरंग जाधव सह नागरिक पदाधिकारी उपस्थित होते. निवड प्रक्रिया शांततेत पार पडली.तर निवड प्रक्रिया साठी मंडळ अधिकारी किशोर वाघ,ग्रामसेवक एफ ई सोनावणे,बिट जमादार खटके,पो पा कारभारी जाधव, ग्रापं कर्मचारी सुनील जाधव,अमोल वाघमारे आदीची उपस्थिती होती.

# आत्मा योजनेच्या शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमातून कृषिपूरक योजनाची माहिती

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात आकाश ॲग्री सोल्युशन्स लि.सिल्लोड येथे दिनांक - २४ नोव्हेंबर २०२३ रोजी सिल्लोड व सोयगाव येथील शेतकरी यांना आत्मा योजनेअंतर्गत जिल्हांतर्गत शेतकरी प्रशिक्षण या बाबीखाली प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते यात प्रामुख्याने डॉ.ओमप्रकाश कोहिरे माजी प्राचार्य कृषि महाविद्यालय जालना यांनी रब्बी पिकांचे नियोजन व व्यवस्थापन, डॉ.राजीव पाटील मास्टर ट्रेनर सेंद्रिय शेती NSDC दिल्ली यांनी सेंद्रिय शेती, डॉ.किसन घोरसड पाटील यांनी PMFME व AIF योजना, श्री. ज्ञानेश्वर बरधे ता.कृ.अ.सिल्लोड यांनी आत्मा योजना व कृषि विभागाच्या योजना, मदनकुमार शिसोदिया ता.कृ.अ.सोयगाव यांनी पोक्रा व महाडिबीटी योजना, श्री.आकाश गौर संस्थापक आकाश ॲग्री सोल्युशन्स, सिल्लोड यांनी कृषि विभाग व पणन विभागाच्या योजना याविषयी माहिती दिली. आजच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महालिंग कुंभार बी.टी.एम, सिल्लोड यांनी व आभार प्रदर्शन अमोल महाजन बी.टी.एम.सोयगाव यांनी केले. आजच्या कार्यक्रमास दोन्ही तालुक्यातील कृषि विभागाचे मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक तसेच प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी यांची मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

# जामनेरच्या तहसीलदारांची तत्काळ बदली करण्याची नागरिकांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तहसील कार्यालयाचे यापूर्वीचे तहसीलदार अरुण शेवाळे साहेब होते त्यावेळी त्यांच्या कार्यकाळ कारकीर्दीत त्यांनी कायदेशीर तसेच चांगली कामे केली आहेत , त्यांच्या हातून जनतेची व शेतकऱ्याची सर्व कामे वेळेवर होत होती कार्यालयातील कामे खोळबंत नव्हती त्यामुळे कोणाच्याही तक्रारी येत नव्हत्या , परंतु आताचे कार्यरत तहसीलदार नानासाहेब आगळे साहेब आले तेव्हापासून तालुक्यातील जनतेचे कोणतेही काम वेळेवर होत नाही तसेच कार्यालयातील अनेक कामे खोळंबली आहेत म. तहसीलदार आगळे साहेब हे आपल्या पदाचा दुरुपयोग करून कर्तव्यात कसूर करीत आहे. जामनेर तालुक्यातील जनतेचे १५५ प्रमाणे ऑनलाइन ७ /१२ उतारा दुरुस्तीचे कामे दोन दोन महिने होत नाही प्रत्येक विषयावर चर्चा करा असा रिमार्क मारल्या जातो , कार्यालयातील अनेक विविध प्रकारचे प्रकरणे आदेश यावर लवकर सह्या करीत नाही त्यामुळे कर्मचारी परेशान झाले आहेत कायदेशीर कामात देखील क्युरी काढली जाते एकाच वेळी योग्य सल्ला व मार्गदर्शन केले जात नाही प्रत्येक वेळी वेगवेगळा कागद मागितला जातो , कामे होत नसल्याने तहसील कार्यालयात लोक तलाठी तसेच मंडळ अधिकारी व कार्यालयातील कर्मचारी यांना वेठीस धरून त्यांच्याशी वाद घालतांना दिसून येतात शेवटी कंटाळून ना इलाजास्तव लोक तहसीलदार नानासाहेब आगळे यांना भेटतात आणि विचारतात की साहेब कागदपत्रे किलीयर असतांना कामे का होत नाही , साहेब सागतात त्यावर चर्चा करावी लागेल चर्चा होते पण काम काही होत नाही असा प्रत्यक्ष अनुभव तालुक्यातील लोकांना येत आहे . तसेच तक्रारी अर्जावर चौकशी होऊन कारवाही होत नाही परस्पर आर्थिक सेटिंग केली जात असल्याची माहिती मिळाली आहे व आर्थिक देवाण घेवाण करून कोणतीही चौकशी न करता शेतजमीन बिनशेती करण्याचे कामे होत आहे असल्याची तालुक्यात चर्चा आहे. . तहसीलदार नानासाहेब आगळे स्वतः ला जिल्हाधिकारी समजत असून तालुक्यातील गोर गरीब अनाडी जनतेला व शेतकरी लोकांना वेठीस धरून त्रास देत आहे एक किरकोळ कामासाठी किती तरी चकरा मारव्या लागतात जाणून बुजून हेतूपुरस्कर आर्थिक फायद्यासाठी प्रकरण लांबविले जाते त्यामुळे लोकांचे शारीरिक मानसिक व आर्थिक नुकसान होत आहे अशा जामनेर तहसील येथे अनेक समस्या असून म. तहसीलदार साहेब यांच्या मनमानी कारभाराने जनता त्रस्त झाली आहे म्हणून मंत्री ना. गिरीशभाऊ महाजन व जळगाव जिल्हाधिकारी आयुष प्रसाद साहेब यांनी म. तहसीलदार नानासाहेब आगळे याचेवर कारवाही करून त्यांची बदली करावी अशी मागणी जनतेकडून करण्यात येत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर